
त्रैमासिक

# श्रीवासुदेव निवास

प. पू. श्री. दत्तमहाराज कवीश्वर,
सौ. लक्ष्मीबाई कवीश्वर
यांना श्रध्दांजली


- वर्ष २२ वे
- चैत्र शुध्द पौर्णिमा
- ३१ मार्च १९९९
- अंक ८६ वा

॥ श्रीगणेशदत्तगुरुभ्यो नमः ॥





भक्त्या पारायणैरेव दत्तात्रेयो जगद्गुरुः ।
दत्त्वाच मस्तके हस्तं शक्तिपातं करोति हि ॥

द्विसाहस्त्री

# श्रीवासुदेव निवास

## (पंथराज सह)

महायोग चिंतनाचे सुबोध त्रैमासिक

"यत्र शक्तिर्न पतति – तत्र सिद्धिर्न भवति"

सूत संहिता

---

- संस्थापक : योगिराज श्रीसद्गुरु गुळवणी महाराज
- संवर्धक : ब्रह्मश्री ज्ञानयोगी श्रीदत्तमहाराज कवीश्वर

---

गुरो तुझी ही पदवारिधारा । धुवो सदा कायिक दोष सारा ॥
सदैव माझे मन वाणि शुद्ध । करो तुझे नाम पवित्र सिद्ध ॥

---

वर्ष २२ वे) चैत्र शु. १५ शके १९२१ – ३१ मार्च १९९९ (अंक ८६ वा

अंकाची किंमत रु. १६/-) आजीव सदस्य वर्गणी रु. ४०० (वा. व. रु. ६०/-

## प. पू. श्री. दत्त महाराज यांना श्रद्धांजली

श्रीवासुदेव निवास प्रकाशन, पुणे ४
पत्रव्यवहाराचा पत्ता : श्रीवासुदेव निवास, ४२/१७ एरंडवणे, कर्वे पथ,
पुणे ४११ ००४.

# अंतरंग


| | | |
|---|---|---|
| वंदे दत्तं कवीश्वरम् | वि. अ. दप्तरदार | ३ |
| उद्बोधक चिंतन | पू. श्रीदत्तमहाराज | ४ |
| संपादकीय | अ. सि. पोटभरे | ५ |
| शिव आणि शिवशक्तीला श्रद्धांजली | श्रीवासुदेव निवास परिवार | ६ |
| सौभाग्याचे लेणे लेवून निजधामी गमन | नीला कृष्ण जोशी | ७ |
| सौ आईसाहेब एक समर्पित जीवन | सौ. माधुरी पणशीकर | १० |
| सौ. लक्ष्मीबाई कवीश्वर – – निखळ मातृत्वाचे परिपूर्ण रूप | डॉ. शरदचंद्र कोपर्डेकर | १४ |
| प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराजांना श्रद्धांजली | मधुसूदन रा. खानविलकर | २० |
| ब्रह्मश्री दत्तमहाराज | नंदकुमार ज. प्रभुणे | २१ |
| येणे कारणे परब्रह्म | अजित कुलकर्णी | २२ |
| जन्मजन्मांतरीची मायमाऊली | डॉ. श्री. कृ. जामदार | २६ |
| साक्षात्कारी संत-ब्रह्मीभूत | पं. ल. पं. जांभोरकर | २९ |
| चालते बोलते ब्रह्म प. पू. दत्तमहाराज कवीश्वर | श्रीराम महादेव भातखंडे | ३१ |
| प. पू. ब्रह्मश्री ज्ञानयोगी (आरती) | हरिभाऊ जोशी निटुरकर | ३३ |
| अविस्मरणीय - अनुभव | सौ. भाग्यश्री मुसांडे | ३४ |
| एक वृत्त | सुरेश काळे | ३५ |
| थोर वेदांती युगपुरूष | डॉ. शरदचंद्र कोपर्डेकर | ३७ |
| मूर्तिमंत भागवतादर्श | डॉ. रा. ल. जोशी | ४० |
| श्रीदत्त कवीश्वर महाराजांचे अष्टक | हरिभाऊ जोशी निटुरकर | ४४ |
| सदा संतापासी जावे | नारायणराव दाते | ५० |
| मान्यवरांची भावपूर्ण श्रद्धा सुमने | देशपांडे, लेले | ६४ |



संपादक : **अच्युत सिद्धनाथ पोटभरे**, एम्. ए., बी. एड. सहकारनगर नं २, पुणे-९

कार्यकारी संपादक : **श्रीमती सुशीला मोडक**, सदाशिव पेठ, पुणे.

प्रकाशक : **श्री. नारायण यशवन्त ढेकणे**, B.Sc., ME (PH); AMIE, प्रधान विश्वस्त,
श्री वासुदेवानंदसरस्वती स्वामीमहाराज व
श्री लोकनाथतीर्थ स्वामीमहाराज ट्रस्ट, ४१/१७ एरंडवन, पुणे ४.

मुद्रण स्थळ : **रत्नाकर गो. जोशी. के. जोशी ॲन्ड को.**
ब्लॉक मेकर्स ॲन्ड ऑफसेट प्रिन्टर्स, १७४५/२ सदाशिव पेठ, पुणे ३०



(सर्व हक्क प्रकाशनाधीन)

# वंदे दत्तं कवीश्वरम्

विद्यावाचस्पतीरत्नं प्रज्ञाभास्कर भास्करम् ।
तपःपूतं परं पूज्यं वन्दे दत्तं कवीश्वरम् ॥१॥

ज्ञानशक्ति महामेरूं शांतिसागरगंभीरम् ।
वैराग्यं मूर्तिमंतं यो वन्दे दत्तं कवीश्वरम् ॥२॥

ऋषितुल्यमनासक्तं पारायण परायणम् ।
विनम्रता पराकाष्ठां वन्दे दत्तं कवीश्वरम् ॥३॥

निजानन्दास्थितं गूढं सात्त्विकं तत्त्वचिंतकम् ।
निरहङ्कारालङ्कारं वंदे दत्तं कवीश्वरम् ॥४॥

ब्रह्मनिष्ठं स्थितप्रज्ञमादर्शाचारधार्मिकम् ।
वेदवेदांग पारगं वन्दे दत्तं कवीश्वरम् ॥५॥

यदृच्छालाभसंतुष्टं नित्यतृप्तं पराङ्मुखम् ।
साक्षात्कार कृपा पात्रं वन्दे दत्तं कवीश्वरम् ॥६॥

लोकसङ्ग्राहकं श्रेष्ठं श्रीमद्‌भागवतप्रसारकम् ।
सर्व संकल्प संन्यासिनं वंदे दत्तं कवीश्वरम् ॥७॥

जीवन्मुक्तं विदेहीं वै विभूतीं विगतस्पृहम् ।
दीक्षागुरुं मुमुक्षोः वन्दे दत्तं कवीश्वरम् ॥८॥

शंकराचार्य सन्मानं प्राप्तारं स्वर्णकंकणम् ।
राष्ट्रीय पंडिततां कीर्ती वंदे दत्तं कवीश्वरम् ॥९॥

वि. अ. दप्तरदार, पुणे

# उद्‌बोधक चिन्तन

"एकमेकां सहाय्य करू । अवघे धरू सुपंथ" अशीच संतांची कार्यपद्धती आहे. तसे घडत राहिल्यास कार्याचा प्रसारही चांगला होतो. आणि त्यामुळे कार्यकर्ताही प्रसन्नचित्त असतो. परंतु एकाच कार्याबद्दलही 'पिण्डे पिण्डे मतिर्भिन्ना' अशी स्थिती दिसून आल्याने उत्साही कार्यकर्त्यालाही विषाद निर्माण होऊन आता येथेच थांबावे काय? असे वाटणे स्वाभाविक आहे.

अशाही प्रसंगी 'विघ्नैः पुनः पुनरपि प्रति हन्यमानाः । प्रारब्धमुत्तमजना न परित्यजन्ति ॥" अशी ईशदत्त धृतिशक्ती बाळगणारे कर्मयोगी ईशकृपेने अधिक उत्साहाने प्रसादसंपादक सत्कार्य करीतच राहतात.

कृतिप्रधान वृत्तीच्या माणसामध्ये निश्चय आणि अनिर्वेद उत्साह हे दोन महत्त्वाचे गुण असावे लागतात म्हणजे कार्यसाफल्य होते.

● ●

पूर्ण आत्मसाक्षात्कार दृढ होईपर्यंत द्वैतातच सर्वांना रहावे लागते. तरी श्रीगुरूमहाराजांनी दिलेली साधनाच चालू ठेवावी. तसेच त्यांनी सांगितलेला जप होईल तेवढा वाचिक व मानसिक चालू ठेवावा. गायत्रीमंत्राचा जप ब्राह्मणांना विशेष उपकारक असल्याने त्याचा यथाशक्ती जप अवश्य करावा. जसजशी तळमळ वाढेल तसतशी कार्यसिद्धी लवकर होऊ शकते.

● ●

अन्य शास्त्रानुसार कोणी काही सांगितले तरी हा महायोग संप्रदाय कल्याणकारक नाही असा सिद्धान्त ठरू शकणार नाही. पूर्ण विचार झाल्याशिवाय बुद्धिभेद करणे किंवा करून घेणही शास्त्रसंमत नाही.

– पू. श्री. दत्तमहाराज कवीश्वर

## जपयज्ञ

॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा ॥ आणि

या श्री. स्वयं सुकृतिनां भवनेषुलक्ष्मीः
पापात्मनां कृतधियां हृदयेषु बुद्धिः
श्रद्धा सतां कुलजन प्रभवस्य लज्जा
तां त्वां नतः स्म परिपालय देवि विश्वम् ॥

या महामंत्राचा आत्मकल्याण व लोककल्याण यासाठी
शुचित्वाने नित्य जप करावा.

# संपादकीय

**ध्यानमूलं गुरोर्मूर्तिः पूजामूलं गुरोः पदम् ।**
**मन्त्रमूलं गुरोर्वाक्यं मोक्षमूलं गुरोः कृपा ॥**

**— गुरुगीता**

नवे वर्ष फार मोठे दुःखाचा वज्राघात करून आले. ज्या विराट वटवृक्षाच्या शीतल छायेत विश्रांत शीतलता अनुभवीत होतो तो वटवृक्ष कालचक्राच्या मंद लहरीने उन्मळून पडला. त्या वटवृक्षांचे वसुंधरेचे नाते संपले. केवळ एक दशक कमी असा शतकाचा पुराण पुरूष काळाच्या पडद्याआड गेला. त्या पुराण पुरुषाच्या लक्षावधी स्मृती, वृक्षाच्या वज्राघाती कोसळण्याने, प्रचंड धुराळ्याप्रमाणे, सर्वव्यापी होऊन, अंतर्जगत धूलिधूसरित झाले. त्या पुराण पुरुषाशी जसा ज्याचा नातेसंबंध त्या त्या प्रमाणात सर्वांच्या अन्तःकरणातील दुःखावेग आतबाहेर जाऊन अस्वस्थतेची विषण्ण स्थिती आली. या महा दुःखाला सावरण्यास— शांत करण्यास शब्द निष्प्रभ ठरले. केवळ काळच हे दुःख हळू हळू कमी करण्यास समर्थ आहे.

पू. श्रीदत्तमहाराजांच्या निर्याणापूर्वी दीड महिना आधी पू. सौ. आईसाहेब सौभाग्याचे लेणे घेऊन गेल्या आणि लगेच पन्नास दिवसांनी त्यांनी त्यांचे सौभाग्य नेले. आम्ही सारे मात्र मातृ-पितृ छत्रविरहित झालो. पू. श्रीदत्त महाराजांच्या ऋणानुबंधाचा परिवार फारच मोठा आहे. हे ऋणानुबंध समाजातील सर्व थरांतून आहेत.

पू. श्रीदत्तमहाराज साक्षात् परब्रह्म होते. परब्रह्माला जाणे-येणे नसते — जन्ममृत्यू नसतो हे सत्य आहे. आमचे दुःख याबद्दलचे नाही आहे. निर्गुण निराकार ब्रह्माने ज्या देहमंदिरात वास्तव्य केले होते ते देहमंदिर कोसळले —आणि कायमचे दृष्टीआड झाले त्याचे अतीव दुःख होत आहे. या दिव्य मंदिराचा जीर्णोद्धार मानवी कक्षेतील नाही - येथे मनुष्य हतबल आहे याचे हे अनिवार्य दुःख आहे.

परब्रह्माचे मंदिराचा शिल्पकार मनुष्य नसतो. त्या मंदिरातील परब्रह्माचें दर्शनसुद्धा मनुष्य दृष्टीला घडत नाही. दर्शन घडते ते भावभक्तीच्या स्वसंवेद्य हृदयाला. ते भावभक्तीचे स्वसंवेद्य स्पंदन सुद्धा परब्रह्माच्या प्रेरणेने होते. असे दुर्लभ दर्शन अनंत जन्मांच्या पुण्याईने घडले, ते यापुढे नाही याचे दुःख आहे.

आमची या परब्रह्माला आर्त प्रार्थना आहे, आम्हा तुझ्या लेकरांना या वियोग-अवस्थेतून संतुलित ठेव आणि तुझ्या प्राप्तीला मार्गस्थ कर!

**— अ. सि. पोटभरे**

# शिव आणि शिवशक्तीला श्रध्दांजली

**अवघ्या ५० दिवसांत सात्त्विक अन्तःकरणांना व्यथित करणारे दोन धक्के बसले.**

प. पू. योगिराज वामनरावजी गुळवणी महाराज यांच्या २५ व्या पुण्यतिथी महोत्सव सांगतेनंतर दुसरे दिवशी दि. १० जानेवारी १९९९ रोजी सायंकाळी ६ वाजता सौभाग्याचे लेणे घेऊन पू. सौ. लक्ष्मीबाई कवीश्वर–सर्वांच्या आईसाहेब - श्रीदत्तचरणी लीन झाल्या.

त्यानंतर अवघ्या ५० दिवसांत अगाध ब्रह्मशक्तीचा नंदादीप– अद्वैत वेदांत शिरोमणी - श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांच्या कृपाकटाक्षांनी आणि करकमलांनी आपल्या अंकावर घेऊन वात्सल्याने कुरवाळिलेले - योगिराजांच्या शक्तिपात पीठाचे उत्तराधिकारी यांचे मोक्षयोगावर, उत्तरायणात, परमशांत स्थितीत, ब्रह्मशांतीमध्ये महानिर्याण झाले.

श्रीवासुदेव निवास परिवाराच्या या माता–पित्यांना त्यांच्या पुत्रपौत्रांची भावपूर्ण श्रद्धांजली.

# सौभाग्याचे लेणे लेवून निजधामी गमन

## नीला कृष्ण जोशी

रविवार दि. १०।१।९९ सायंकाळी ६ वाजता सूर्य आपल्या तेजस्वी किरणांबरोबर कवीश्वर घराण्यातील आणखी एक तेजस्वी किरण घेऊन त्याने आपला रथ उत्तर दिशेकडे वळविला. एका जीवाची – पुण्यात्माची संक्रांती केली.

" ज्याचा शेवट चांगला त्याचे सारेच चांगले " या उक्तीप्रमाणे स्नेह व गोडी यांचे मीलन असलेला हा क्षण ती. सौ. आई साहेबांच्या जीवनाचे सोने करून गेला यात शंकाच नाही. ती. सौ. आईसाहेबांचे व प. पू. दत्तमहाराजांचे आदर्श सहजीवन ६८ वर्षांचे होते. प. पू. दत्तमहाराजांचे श्री सरस्वतीच्या दरबारातील वैभव हाच ती. सौ. आईसाहेबांनी धारण केलेला मोलाचा अलंकार होता. आचार्यांकडून त्यांना मिळणाऱ्या विद्यावाचस्पती सारख्या अनेक पदव्या, दिल्ली दरबारी राष्ट्रीय पंडित म्हणून राष्ट्रपतींनी केलेला त्यांचा गौरव, प. पू. गुरूमहाराजांनी आपल्या दैवी संपत्तीचे केलेले वारसपुत्र याचा त्यांना खूप आनंद झाला.

प. पू. दत्त महाराजांचे सहस्त्र दर्शन शांती, रौद्रिशांती सारखे अनुपम सोहळे यांचा सुंदर साज त्यांचे जीवन सुशोभित करीत होता. शिवाय प. पू. दत्तमहाराजांनी त्यांची सहस्त्रचंद्रदर्शन शांती करून केलेला गौरव हे एक अभिमानाचे लेणे त्यांनी अंगावर घेतले होते.

वामन निवासासारखी वास्तू प. पू. दत्तमहाराजांचे हातून उभी राहिली याचा त्यांना सार्थ अभिमान होता. कवीश्वर घराणे वाडीचे. वाडीला प. पू. दत्तमहाराजांचा जन्म झाला. मुंज व विवाहही तेथेच झाला. सौ. लक्ष्मीबाईंचा लग्नानंतरचा काही काळ वाडीत गेला. त्यामुळे लक्ष्मीबाईंना वाडीबद्दल फार आपुलकी वाटे; ते आपले माहेरघर त्यांना वाटे. वाडीत आल्या की कृष्णामाईला हळदी-कुंकू लावून दिवा सोडीत व कृष्णाबाईत बुडी मारीत. कृष्णाबाई जणू त्यांना मंगल स्नानच घाली. वाडीला प्रदक्षणा घालताना त्यांचे मनात अनेक विचार येत. त्यातील एक म्हणजे " माझा तुझ्या कृपेने वाढलेला औदुंबरासारखा वंश असाच सुखात वाढू दे . व यांना दीर्घायुष्य लाभू दे. " श्री दत्त अमरेश्वराचे झालेले काम पाहून प. पू. दत्तमहाराजांच्या या दैवी सामर्थ्याने त्यांचा जीव आनंदाने भरून जाई. चौसष्ट योगिनींचे दर्शन आपणास व्हावे अशी त्यांची इच्छा होती. पण हा जीर्णोद्धार पाहिल्यावर त्या म्हणाल्या, देवतांनो मला अखंड सौभाग्य द्या. ' लग्नानंतरचा पहिला काही काळ त्यांनी अतिशय कष्टाचा काढला. प. पू. दत्तमहाराजांचा वैराग्यशील स्वभाव व

सारखे परिभ्रमण दोन्ही त्यांनी पेलून धरले. दैवी गुणसंपत्तीची माळा प. पू. दत्तमहाराजांनी धारण केल्यावर आपल्या "वरमालेचे" वैभव वाढले असे त्यांना वाटले. प. पू. वामनरावजी गुळवणीमहाराजांबद्दल त्यांना फार आदरभाव व जिव्हाळा होता. त्या नेहमी म्हणत, 'आमचे ते चालते बोलते देव आहेत. रु प. पू. दत्तमहाराजांचा साठी शांतीचा सोहळा प. पू. गुरूमहाराजांनी फार सुरेख संपन्न केला, त्याचे ती. सौ. आईसाहेबांना फार अपरूप वाटे. चढत्या वाढत्या श्रेणीने लौकिक व पारमार्थिक जीवन चालले होते. नातवंडापंतवंडांनी घर भरले होते. तीन मुलगे, तीन सुना, तीन लेकी, जावई, अशा या श्रीदत्तात्रेंयांच्या या तीनचे एक वैशिष्ट्य. या विशेषांनी त्यांचा परिवार बिल्वदलाप्रमाणे शोभत होता. अलीकडे त्यांची प्रकृती गेली तीन वर्षे ठीक नव्हती. प्रारब्धाचे भोग त्यांना भोगावे लागत होते. परंतु दत्तमहाराज आपली शक्ती देऊन ते भोग सह्य कसे होतील असे करीत होते. ते भोग त्यांनी भोगून संपविले. श्रवणापासून आठ प्रकारची भक्ती त्यांचे जीवनांत घडली होती. नववी आत्मनिवेदन भक्ती त्यांनी योगीराज श्री सद्गुरु वामरावजी गुळवणी महाराजांच्या पुण्यतिथीचा पर्वकाळ संपूर्ण साधून त्यांच्या चरणी सर्मपित करून आपला देह ठेवला हा एक विशेष योगायोग म्हणावयास हवा. प. पू. गुरूमहाराजांचा, प. पू. दत्तमहाराजांवर असलेला अकृत्रिम लोभ व ती. सौ. लक्ष्मीबाईबद्दल असलेले जिव्हाळा यामुळे त्यांची काळजी गुरू महाराजांनी शेवटपर्यंत घेतली. ती. सौ. आईसाहेबांना पुण्यदिवशी अहेवपण प्राप्त झाले हे एक अलौकिक सत्य आहे. आता सुरू असलेले पवित्र कार्य म्हणजे श्री दत्त अमरेश्वरच्या बाजूला कृष्णाबाईला घाट बांधणे. याही कामाची सुरवात श्री. दत्तजयंतीला झाल्याचे त्यांच्या कानावर होते व त्या म्हणाला होत्या, "सरिते तू लोकसेवा करतेस तुझी सेवा यांचे हातून झाली. यामुळे मी धन्य आहे. तू यांना दिर्घायुष्य दे."

साऱ्या सुनांनी, मुलींनी, मुलांनी त्यांची सेवा फार मनापासून केली. सौ. सरिता वहिनी मोठ्या. त्यामुळे जबाबदारी जास्त. पण सौ. अनितावहिनी व सौ जयश्रीवहिनी याही हाकेला ओ देत. नातवंडेही आजीवर प्रेम करीत. खास करून चि. सौ. रेणुका त्यांची जपणूक फार करी. चि. विद्याधर, प्रसाद अशी अनेकमुले ती. सौ. आईसाहेबांवर पुत्रवत प्रेम करीत. ती. सौ. ताईमहाराजांनीही ती सौ. आई साहेबांकडे जातीने लक्ष ठेवले.

अशा या भाग्यवती आईसाहेब आपल्या या सौभाग्यानिशी निजधामी गेल्या. ही आनंद यात्रा आहे, त्यासाठी दु:ख नको. आदराची निरंतर स्मृती हवी.

'झाले साधनांचे फळ, संसार झाला सफळ' असा त्यांचा परमार्थरूप संसार होता.

आज आपल्यासाठी कंकणे, मंगळसूत्र नथ, जोडवी या सौभाग्यवस्तू आपल्यासाठी मागे पाठविल्या आहेत. ते एक प्रकारचे आशीर्वादच आहेत. प. पू. दत्तमहाराजांची स्थितप्रज्ञता आपण पहात आहोत. त्यांचा विवेक, मनाचा समतोल साऱ्याचाच परिणाम आपणावार होतोच आहे. असे हे "पार्वती परमेश्वरू" असे जोडपे! यांच्या चरणी आपण विनम्र होणे हे आपले कर्तव्य आहे.

पूज्य सौ. आईसाहेब! आम्ही सर्व भक्तमंडळी व आपला हा सर्व परिवार आपले चरणी ही भावफुलांची ओंजळ अर्पण करीत आहोत, त्याचा आपल्या नेहमीच्या प्रसन्न वृत्तीने स्वीकार करा व आम्हास आपले आशीर्वाद द्या ही विनंती आहे.

✤ ✤

# श्रीवासुदेवनिवास (पंथराज सह)

## प्रकटन फॉर्म नं. ४

### रूल नं. ८ रजिस्ट्रेशन ऑफ न्यूजपेपर्स सेंट्रल रूल्स १८५३ अन्वये


**प्रकाशित** : श्रीवासुदेव निवास

**स्थळ** : कर्वे पथ, ४२/१७ एरंडवन, पुणे ४.

**संपादक** : **अच्युत सिद्धनाथ पोटभरे,** राष्ट्रीयत्व : भारतीय

**पत्ता** : "श्री सिद्धनाथ निवास"
२१६ सहकारनगर नं. २ पुणे ९

**मुद्रक** : **रत्नाकर ग. जोशी,** राष्ट्रीयत्व : भारतीय

**स्थळ** : के. जोशी ॲन्ड को.
ब्लॉक मेकर्स ॲन्ड ऑफसेट प्रिन्टर्स,
१७४५/२, सदाशिव पेठ, पुणे ३०.

**प्रकाशक** : **श्री नारायण यशवन्त ढेकणे** : भारतीय

**पत्ता** : श्रीवासुदेव निवास ४२/१७ एरंडवन, पुणे ४.

**मालक** : श्री. प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वती टेंबे स्वामी महाराज व
श्री. प. प. श्रीलोकनाथतीर्थ स्वामी महाराज ट्रस्ट

**पत्ता** : श्रीवासुदेव निवास कर्वे पथ, ४२/१७ एरंडवन, पुणे ४.

**मी नारायण यशवन्त ढेकणे** असे जाहीर करतो की वर दिलेला तपशील माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे खरा आहे.

**ना. य. ढेकणे,** प्रकाशक

# सौ. आईसाहेब एक समर्पित जीवन

## सौ. माधुरी पणशीकर



श्री ज्ञानदेवांनी एका विरहिणीत विरहभावाने अत्यंत व्याकुळ झालेल्या स्त्री-मनाचं उत्कट चित्रण केलं आहे. तिचं विरहार्त मन आपल्या दैवताच्या ध्यासाने त्याच्याशी असं एकरूप झालं आहे की, ती जेव्हा आरशात बघते तेव्हा 'दर्पणी पाहता रूप न दिसे वो आपुले' अशी तिची स्थिती होते. म्हणजे श्रीकृष्णाच्या रूपाचा - विचार करता करता– ती स्वतः 'श्रीकृष्ण रूप' होते.

श्रीज्ञानदेवांनी रंगवलेले हे चित्र अलौकिक तर खरेच, पण ती. सौ. आईसाहेब, प. पू. दत्तमहाराज कवीश्वरांच्या जीवनाशी ज्या पद्धतीने एकरूप झाल्या होत्या, त्याचा विचार करता ह्या चित्राची अर्थपूर्णता ध्यानात येते. गंगा समुद्राला सर्वस्व समर्पण करते-स्वतःचं गंगापण विसरून ! मिठाची बाहुली सागरात लय पावते - स्वतःचं अस्तित्व त्याला प्रदान करून ! तद्वतच ती. सौ. आईसाहेबांनी स्वतःला प. पू. महाराजांच्या जीवनरेखेत समर्पित केलं स्वतःचं 'मी' पण अर्पण करून !

सौ. आईसाहेब ह्या बार्शीच्या भगवंतराव पाठकांच्या सातवीपर्यंत शिकलेल्या कन्या. त्यांचे नाव 'सुंदर'. सुंदर नावाप्रमाणेच सुंदर होती. इतकी की त्यांच्या सासूबाई कौतुकाने म्हणत, "तिला काय जाडभरडं नेसलं तरी छानच दिसतं!" पाठकांचं घराणं सहृदय भक्ताचं होतं. त्यांनी प. पू. श्रीधुंडिराज महाराजांकडून मंत्रोपदेश घेतला होता. ते नाते अधिक दृढ व्हावे हा ईश्वराचा संकल्प होता. परमेश्वरी कृपाशक्तीचा वरदहस्त लहानग्या सुंदरच्या पाठीशी होता. एकदा श्री धुंडिराजशास्त्रींच्या पत्नी सौ. सरस्वतीबाईंनी बाजारातून घरी जाणाऱ्या सुंदरला हाक मारली. परकराच्या ओट्यात भरलेले सामान सांभाळत सुंदर कवीश्वरांच्या घरात गेली- तेव्हा खुर्चीवर प. पू. दत्तमहाराज वाचनात दंग झाले होते. सुंदरची नजर अभावितपणे त्यांच्याकडे गेली. त्यावेळी ह्या व्यक्तीच्या विवेक-विचार-संपन्न सावलीत आपले आयुष्य जायचे आहे, ह्याची तिला कल्पनाही नव्हती. तो दिवस

तिच्या जीवनात नितान्त भाग्याचा ठरला. धुंडिराजशास्त्री गावाहून येणार होते. त्यांना घ्यायला पाठक स्टेशनवर गेले आणि तिथून आदरपूर्वक आपल्या घरी घेऊन आले. चि. सुंदर आणि प. पू. महाराजांची पत्रिका जुळली आणि माघ वद्य चतुर्थी १९३० रोजी त्यांचा शुभविवाह झाला. कु. सुंदर, सौ. लक्ष्मीबाई दत्तात्रेय कवीश्वर झाली. आणि मग नवनवोन्मेषाने सारखी बहरतच राहिली. त्यावेळी तिचं वय होतं अवघं बारा वर्षांचं जाणत्यानेणत्या उंबरठ्यावर रेंगाळणारं, आजूबाजूच्या जगाकडे कुतूहलमिश्रित आनंदानं बघणारं, किलकिल्या नजरेनी भविष्यात डोकावणारं!

विवाहानंतर ५ वर्षे त्या वाडीत होत्या. प. पू. महाराजांच्या सांगण्याप्रमाणे प्रदक्षिणा घालून, दत्तमाहात्म्य वाचून ईशसेवा करत होत्या. भक्तिविजय, हरिविजय त्यांच्या वाचनात होतेच पण शिवरात्री पूर्ण शिवलीलामृताचे पारायण त्या करत असत. १९३७ पासून कवीश्वरांचे बिऱ्हाड पुण्याला आले. तिथून आयुष्यातल्यां सुखदुःखाच्या अनेक क्षणांना त्या प. पू. महाराजांच्या बरोबरीने सामोऱ्या गेल्या. योगिराज गुळवणीमहाराजांचा आशीर्वाद त्यांना मिळाला. प. पू. गुळवणीमहाराज त्यांना 'सूनबाई' म्हणत. रोज सकाळी नित्यनियमाने महाराजांची फेरी त्यांच्या घरी असे. ते आले की हातातली सर्व कामं बाजूला ठेवून सौ. आईसाहेब त्यांना पाट मांडत, दूध देत. १९५७ मध्ये इन्फ्लुएन्झाच्या साथीत सौ. आईसाहेबांची कन्या चि. शोभा हिचा मृत्यू झाला. तेव्हा प. पू. दतमहाराज बाहेरगावी गेलेले होते. सौ. आईसाहेबांना अनावर शोक झाला. प. पू. दत्तमहाराज गावाहून आल्यावर त्यांना ही हकीगत समजली. काही काळ अस्वस्थता त्यांच्या मनी दाटून आली पण विवेक आणि संयम हे त्यांच्या स्वभावाचे मोठेच गुणधर्म ! त्यांनी दुःख बाजूला केले. सौ. आईसाहेब म्हणत असत, 'कठीण प्रसंगीही ते मनाने स्थिर आणि खंबीर असतात. त्यांच्या सहवासात मला हे खूप शिकायला मिळालं.'

प. पू. दत्तमहाराज भागवत सप्ताहाच्या प्रवचनांच्या निमित्ताने सतत बाहेर गावी जात असत. घर सौ. आईसाहेब फार भक्कमपणे सांभाळत. कुळधर्म कुळाचार व्यवस्थित पार पाडत. एकदा त्या सांगत होत्या, "अशा मंगल प्रसंगी पुष्कळ पदार्थ करावे लागत. आजच्यासारख्या सोयीही त्या काळी नव्हत्या. एकटीने सर्व करायचे. मग रात्री दोन अडीचला उठून अंघोळ करून पुरण शिजत घालायचं. एकीकडे भाज्या धुवायच्या, चिरायच्या. असं करत काम सुरूच रहायचं. दुपारी १२ वाजता देवाचा नैवेद्य होऊन पगंती बसायच्या" जुन्या काळच्या पद्धतीप्रमाणे दळण-कांडणही त्यांना करावे लागे. सासूबाई, आजेसासूबाईंना घरी केलेले पोहे लागत. मग सकाळी ५/६ पायली साळी भिजत घालून, कांडून सौ. आईसाहेब पोहे करत असत. हा सर्व भूतकाळ सांगताना कुठलीच वेदनेची छटा त्यात दिसत नसे. उलट परमेश्वराने आपल्याकडून हे करवून घेतले हा कृतार्थतेचा स्वरच त्यात दिसे.

प. पू. महाराजांना तीन वेळा राष्ट्रपतीच्या हस्ते पुरस्कार मिळाले. वेळोवेळी त्यांच्या विद्वत्तेचा शास्त्रीपंडितांकडून गौरव झाला. सौ. आईसाहेबांना त्यांच्याबरोबर जावं वाटे, पण प्रपंचाची जबाबदारी असल्याने जाता आले नाही. यावर त्यांची प्रतिक्रिया विचारली तर, 'मला कुठे काय त्यातलं कळतंय. हे विद्वान आहेत, त्यांचा खूप गौरव होतोय, ह्यातच मला आनंद आहे' असं त्या समाधानाने म्हणत.

गृहिणीपद त्यांनी मोठ्या हौसेने सांभाळले. घरात हळदीकुंकू, डोहाळजेवणं, केळवणं चालतंच. येणाऱ्या सर्व पै- पाहुण्यांचे त्या हसमुखाने स्वागत करत. सुवासिनींची खणानारळाने ओटी भरत. घरादारात पूर्णपणे रममाण झालेल्या सौ. आईसाहेबांजवळ जन्मजात–कवित्वशक्ती होती. त्यांच्या प्रतिभेचे उन्मेष वेळोवेळी कवितेतून प्रगट झाले. एकदा चातुर्मासात प. पू. महाराजांचे चरणतीर्थ घेण्याचा नेम त्यांनी केला. हा नेम, व्रत पूर्ण झाल्यावर माहेरच्यांनी आहेर द्यायचा असतो. पण सौ. आईसाहेबांना माहेरचे असे कुणी नव्हते. तेव्हा **'चरणतीर्थ घेतले, उपकृत जाहले'** अशी कविता त्यांनी लिहिली. त्यात शेवटी प. पू. महाराजांविषयी कृतज्ञतापूर्वक त्या लिहितात–

**'तुमचेच घेणे तुम्हासीच देणे। परि अल्प पाकळी स्वीकारणे'**

प. पू. महाराजांच्या एकसष्टी समारंभातही त्यांनी एकसष्ट सुंदर उखाणे घेतले. त्या उखाण्यांमधली सहजता लक्षात घेण्याजोगी आहेच, पण ते अर्थाकडे लक्ष ठेवून घेतले गेले हे विशेष आहे. त्यांतला एक वानगीदाखल सांगते.

**'अध्यात्माची आवड, भागवत आहे तोंडपाठ**

**दत्तोपंतांच्या जीवावर आहे सौभाग्याचा थाट'.** सौ. आईसाहेबांच्या जीवनात प्रपंच आणि परमार्थ यांची एकरूपता दृष्टीला पडते. त्यांची कन्या सौ. सुमनताई यांनी सांगितले की, 'तिला कामाचा उरक मोठा दांडगा होता. आणि सर्व गोष्टींची हौसही विलक्षण होती. मी बाळंतीण होते तर ती पहाटे २। २।। – उठून स्नान-नक्षत्रवात करून, माझ्या अंगाला लावत असे. अंग चांगले रगडून, मला आंघोळ घालून, खीर देऊन ती पहाटे ५।। ला काकड आरतीला जात असे. तिकडून आली की धुणं असायचं. सतत काम करणं आणि ते आनंदानी करणं हा तिचा स्वभावच होता. ह्या त्यांच्या आनंदी वृत्तीनेच लौकिक उपाधीतून निर्माण झालेली दुःखं सोसायला त्यांना बळ मिळालं असावं ! भारतीय परंपरेनुसार 'स्व'ची ओळख पटणं महत्त्वाचं असतं. ही ओळख त्यांनी प. पू. महाराजांच्या कर्तृत्वाच्या पार्श्वभूमीवर करून घेतली. पण कशी ! तर लाट पाण्याशी एकरूप होते; त्याप्रमाणे ! ह्या त्यांच्या 'स्व' चा एक पदर म्हणजे दुसऱ्यावर नितान्त प्रेम करणे. प. पू. महाराजांकडे जे जे साधक भक्त येत त्यांना सौ. आईसाहेब आंतरिक जिव्हाळ्याच्या नात्याने बांधून टाकत. एकीकडे पार्थिव पातळीवर अनेक प्रश्नांना सामोऱ्या जाणाऱ्या आईसाहेबांची दुसऱ्यावर अलोट प्रेम करण्याची शक्ती त्यांच्या अपार्थिव रूपाचे दर्शन घडवते.

कित्येक भक्त त्यांच्याजवळ आपल्या मनातल्या व्यथा बोलून दाखवत; सौ. आईसाहेबांच्या नजरेत त्यांना आधार मिळत असे. त्या सर्वांवर आपल्या मातृत्वाची शाल पांघरत. त्यांच्या स्नुषा सौ. जयश्रीवहिनींनी एक प्रसंग सांगितला, की त्यांच्याकडे एक मुलगी येत असे. तिला आई नव्हती. सौ आईसाहेबांनी आईच्या मायेने तिचे किती करावे ? तिचे लग्न लावून दिलेच, पण लग्नानंतर काही महिन्यांनी ती त्यांना भेटायला आली तेव्हा सौ. आईसाहेबांनी आपल्या हातातल्या हिरव्या बांगड्या तिला घातल्या. घरातल्या सर्वांनाच आश्चर्य वाटलं. तेव्हा त्या म्हणाल्या, 'अग तिला आई नाही, तिची चोरओटी कोण भरणार ?' तिला दिवस गेले होते ते तोवर तिने कोणालाच सांगितले नव्हते पण सौ. आईसाहेबांनी ते ओळखून तिचं माहेरपण केलं.

प. पू. महाराजांसारख्या श्रेष्ठ पुरुषाची पत्नी होणं भाग्याचं खरंच. पण त्या पत्नीपदाची धुरा वहाणं मोठं कठीण. कारण प. पू. महाराजांकडे येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या मनात, 'महाराज फक्तआपलेच आहेत' ही भावना असते.! घरी भक्तीचा अखंड राबता असल्याने अशा श्रेष्ठांच्या घरात खासगी आणि सार्वजनिक जीवनामधली सीमारेषा फारच पुसट झालेली असते. पण सौ. आईसाहेब ह्या प्रकारच्या जीवनप्रवाहाशी एकजीव झाल्या होत्या. 'हा आपला, हा परका' हा भावच त्यांच्या मनात नव्हता. प. पू. महाराजांकडे शिकायला विद्यार्थी येत त्यांना त्या मनसोक्त वाढत असत. वाढण्यात त्यांनी हात कधीच आखडता घेतला नाही. कित्येकदा सर्वांना वाढल्यावर त्यांना फक्त भाताची खरवड उरत असे पण त्याबद्दल कधीच त्यांनी तक्रार केली नाही, असा अनुभव सौ. सुमनताई आणि सौ. सुलभाताईंनी सांगितला. प. पू. महाराजांनीही त्यांच्याबद्दल, 'आम्हाला त्यांनी संसारात पूर्ण समाधान दिले, जे काही केलं ते स्वतःचा स्वार्थ न बघता केलं. आज हे जे घर उभं आहे ते त्यांच्या त्यागावर उभं आहे' असे गौरवोद्गार मुलांजवळ काढले. अध्यात्मातलं पुस्तकी पांडित्य पुष्कळांना अवगत असतं. निरनिराळ्या दर्शनातले सिद्धान्त आणि प्रमेयं तोंडपाठही असतात. पण ही तत्त्वं आचरणात आणायची असतात, प्रत्यक्ष कृतीतून सिद्ध करायची असतात हे साधत नाही, त्यामुळे मग आचार आणि विचार ह्यात विसंगती निर्माण होते. तथापि सौ. आईसाहेबांचे वैशिष्ट्य हे की जे भागवतपुराण प. पू. महाराजांचा जणू प्राणच आहे, त्या भागवतातील मूलतत्त्वं त्यांनी जगण्यातून सिद्ध केली. '**जे जे भेटिजे भूत। ते ते मानिजे भगवंत,** ह्या उच्च, उदात्त आणि व्यापक भूमिकेवरून कृती करत राहिल्या. अध्यात्म कसं जगावं ह्याचा वस्तुपाठ त्यांनी आपल्या जगण्यातून दाखवून दिला.

**सौ. माधुरी पणशीकर.**
११, गुडविल बिल्डिंग,
मनमाला टँक रोड, माहीम, मुं. १६,

# सौ. लक्ष्मीबाई कवीश्वर - निरवळ मातृत्वाचे परिपूर्ण रूप

## डॉ. शरदचंद्र कोपर्डेकर

थोर वेदांती श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांच्या धर्मपत्नी सौ. लक्ष्मीबाई आईसाहेब यांना देवाज्ञा झाली ही वार्ता ऐकून सर्वांनाच हळहळ वाटेल. श्रीदत्तमहाराज हे ज्ञान, भक्ती व कर्म यांच्या सर्वोच्च पातळीवर असलेले महायोगी. भारतीय संस्कृतीचे जिवंत प्रतीक. भारतातील सर्व पीठांच्या शंकराचार्यांनी त्यांचा गौरव केलेला. विसाव्या शतकातील थोर संत म्हणून सर्वजण त्यांना जाणतात. या थोर धर्मपुरुषाला ६८ वर्षे सौ. आईसाहेबांनी सहधर्मचारिणी म्हणून साथ दिली. श्रीदत्तमहाराजांचा प्रपंचही सांभाळला आणि त्यांच्या परमार्थ कार्यालाही प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरीत्या मोठाच हातभार लावला. श्रीदत्तमहाराजांचा प्रपंच आणि परमार्थ सौ. आईसाहेबांनी समर्थपणे पेलला. श्रीदत्तमहाराज नव्वदाव्या वर्षात पदार्पण करीत असतानाच ''नव्वदाव्या वर्धापन दिना'' च्या अगोदर काही दिवस सौ. लक्ष्मीबाई आईसाहेबांनी आपला स्थूल देह ठेवला ही घटना सर्वांच्या मनाला चटका लावून जाणारी वाटली.

'श्रीदत्तमहाराज कवीश्वर हे आपल्या धर्मकार्यामुळे अखिल भारताचे भूषण ठरले आहेत' असा गौरव करवीर पीठाच्या शंकराचार्यांनी केला आहे. धर्मपत्नीची सर्वप्रकारे साथ असल्यामुळेच श्रीदत्तमहाराज असे धर्मजागरणाचे कार्य करू शकले. परिवारातील सर्वजण त्यांना आईसाहेब म्हणतात. त्या खरोखरीच परिवाराच्या व श्रीदत्तमहाराजांच्या शिष्यवर्गाच्या मातोश्री झाल्या होत्या. श्रीदत्तमहाराजांचा प्रपंच तर त्यांनी समर्थपणे सांभाळलाच पण त्यांचा परमार्थाचा प्रपंचही त्यांनी सहजतेने पेलून धरला. बहिणाबाई म्हणतात, ''**प्रपंच परमार्थ चालवी समर्थ । तिनेच गगन पेलियले।।**'' आईसाहेब अशा कोटीतील होत्या. श्रीदत्तमहाराजांच्या महान कार्यात सौ. लक्ष्मीबाई आईसाहेबांनी जी साथ दिली ती अनेक दृष्टिने वैशिष्ट्यपूर्ण आहे.

आईसाहेबांचे माहेर बार्शीचे. तेथील प्रतिष्ठित पाठक घराण्यात त्यांचा जन्म झालेला. त्यांचे वडील श्री. भगवंतराव पाठक यांनी श्रीधुंडिराजमहाराज यांचेकडून मंत्रोपदेश घेतलेला होता. भगवंतरावांचे घराणे साधे व बाळबोध होते. घरातील सर्वांचे श्रीधुंडिराजमहाराजांच्या घरी नेहमी येणे-जाणे होत असे. सौ. सरस्वतीबाई आईसाहेब यांच्या नजरेखालून भगवंतरावांची सुकन्या गेली. हुशार, तरतरीत व

देखणी मुलगी पाहून आईसाहेबांना मुलीबद्दल आपलेपणा वाटला. एकदा मुलगी बघून ठेवावी असा जणू आईसाहेबांचा संकल्प झाला आणि त्याप्रमाणे घडले. १९३० साली श्रीदत्तमहाराज आणि श्री. भगवंतराव पाठक यांची सुकन्या 'सुंदर' यांचा विवाह झाला.

सौ. लक्ष्मीबाई आईसाहेबांची माता त्या एक वर्षाच्या असतानाच स्वर्गवासी झाली होती. त्यांच्या आजीने त्यांना अत्यंत प्रेमाने व लाडाने वाढविले होते. म्हणून विवाहाच्या वेळी श्री. भगवंतराव पाठक सौ. सरस्वती आईसाहेबांना म्हणाले, "मुलीला आई नाही. आपण तिला आई झालांत. भाग्य आहे तिचे. आपल्यासारखे ईश्वरी कृपाप्रसाद असलेले कुळ तिला मिळाले ही आमच्यावर झालेली केवढी मोठी गुरुकृपा आहे!"

सौ. लक्ष्मीबाई आईसाहेबांच्या माहेरी धार्मिक उपासनेचे वातावरण कवीश्वरांच्या घरासारखे नव्हते. त्यामुळे काही वेळा सौ. लक्ष्मीबाई आईसाहेबांचे मन गोंधळून जाई. घरात अनेक लोक पाहुणे म्हणून येत असत. धार्मिक चर्चा सतत चालू असत. अनेक व्रतांचे पालन नियमाने केले जात होते. अनेक नित्यक्रम ठरलेले होते. सर्वांचे आचरण शास्त्रनिष्ठ होते. कवीश्वर घराण्यातील जीवन म्हणजे एकप्रकारे परमार्थ यात्राच. सौ. लक्ष्मीबाई आईसाहेबांना नव्या घरामध्ये असे जीवन पहिल्यांदाच पहायला मिळत होते. त्यांच्या पतीची म्हणजे श्रीदत्तमहाराजांची मानसिक बैठक तर फारच वरच्या दर्जाची अशी होती. श्रीदत्तमहाराजांचा स्वभाव पहिल्यापासून काहीसा अबोल असा होता. ते नेहमी वाचनात मग्न झालेले असत. अत्यंत साध्या पद्धतीने ते रहात असत. वृत्तीने ते गंभीर होते. या गोष्टी सुरुवातीच्या काळात सौ. लक्ष्मीबाई आईसाहेबांना काहीशा वेगळ्या वाटल्या असतील, परंतु सौ. लक्ष्मीबाई आईसाहेब यांनी सर्व जुळवून घेतले. त्यांनी स्वतःला कवीश्वर घराण्याची परंपरा आणि धर्मजीवन यांच्या चौकटीत बसवून घेतले. कवीश्वर घराण्यातील वातावरणात आणि संस्कारात त्या घडत गेल्या. आपल्या घरातील सर्वांचे व्यवस्थित करणे आणि पतीची जास्तीत जास्त सेवा करणे या वृत्तीने त्यांनी गृहिणी म्हणून या काळात स्वतःचे व्यक्तिमत्त्व परिपूर्ण बनवलेले होते असे दिसून येते.

सौ. लक्ष्मीबाईंनी सासूबाईच्या बरोबर रोज १०८ प्रदक्षिणा घलण्याचा नेम धरला. वाडीला मुक्काम असेपर्यंत हा प्रदक्षिणेचा नेम सौ. लक्ष्मीबाई आईसाहेबांनी अखंडपणे चालविला. तसेच श्रीदत्तमहाराजांनी सांगितल्याप्रमाणे रोज दत्तमहात्म्याचा एक अध्याय वाचणे आणि श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराजांच्या पादुकांचे जे देवालय आहे त्याच्या ओवरीत संध्याकाळी थोडा वेळ दिगंबराची धून सांगणे हे दोन नेम त्यांनी पहिल्यापासून चालविले. कवीश्वर घराण्यामध्ये ईश्वराच्या

उपासनेचे बाळकडू प्रत्येकाला मिळत गेल्यामुळे प्रत्येक व्यक्ती ईश्वराची उपासक होत गेलेली दिसते. सौ. आईसाहेबही या घरात आल्यानंतर पूर्णतया ईश्वराच्या उपासक झाल्या. वयाच्या १२ व्या वर्षी देवाला रोज १०८ प्रदक्षिणा घालणे, दत्तमाहात्म्याचा एक अध्याय वाचणे आणि दिगंबराची धून नियमित सांगणे हे नियम सुरू झालेले पाहिले म्हणजे खरोखरीच सौ. लक्ष्मीबाई आईसाहेबांच्या भाग्याची धन्यता वाटते. वाडीच्या घरात अग्निहोत्र चालू होते. आईसाहेबांनी अग्निहोत्र अतिशय निष्ठेने सांभाळले.

आईसाहेबांचे घरातील सर्वांशी वागणे अतिशय मर्यादशील असे. आपल्या सासूबाई या केवळ एक गृहिणी नाहीत तर फारच मोठ्या शिष्यपरिवाराच्या त्या मातोश्री, गुरुपत्नी आहेत हे सौ. लक्ष्मीबाई आईसाहेबांच्या लक्षात आहे. त्याही सौ. सरस्वतीबाई आईसाहेबांकडे केवळ सासूबाई यादृष्टीने न पाहता गुरुमाऊलीकडे पहावे तसेच पाहू लागल्या असे सांगतात. सरस्वतीबाई आईसाहेबांचा साध्या संभाषणातील प्रत्येक शब्दही त्यांनी वेदवाक्यासारखा प्रमाण मानला आणि त्याप्रमाणे वागून त्या सदैव सौ. सरस्वतीबाई आईसाहेबांच्या आज्ञेत राहिल्या. घरातील वडीलधाऱ्यांशी कसे वागावे याचा आदर्श म्हणून लक्ष्मीबाई आईसाहेबांचे वागणे सांगावे असेच सर्वांना वाटत असे.

विवाहानंतर काही वर्षांनी आईसाहेब पुण्यात आल्या. श्रीदत्तमहाराजांनी शंकराचार्यांच्या मठात अध्यापनाचे काम स्वीकारले. काही काळ नातूवाड्यात राहिल्यानंतर श्रीदत्तमहाराज व आईसाहेब यांनी नारायणपेठेत तिसऱ्या मजल्यावर जागा घेतली. श्रीदत्तमहाराजांचा प्रपंच सांपत्तिक सुस्थितीत नव्हता, तेव्हा त्या घरांतील सर्व कामे स्वतः करीत. रात्री दोन वाजता उठत. तिसऱ्या मजल्यावर रहांयाच्या खोल्या होत्या. वर पाणी येत नव्हते. पहाटेच त्या अंगणातून स्वतः पाण्याच्या घागरी वर घेऊन जात व पाणी भरीत. भांडी धुणे पहाटेच स्वतः करायच्या. इतरांनी अशी कामे करताना त्यांना बघितले तर श्रीदत्तमहाराजांची सांपत्तिक स्थिती उघड होईल, कदाचित् त्यांना कमीपणा येईल. तसे होऊ नये ही भावना त्यांच्या मनांत असे. गुरुकुलपद्धतीने अनेक विद्यार्थी शिकायला त्यांच्या घरी रहात. सौ. आईसाहेब स्वतः सर्वांचा स्वयंपाक करीत व आईच्या मायेने त्यांना जेऊ घालत, त्यांची काळजी घेत. स्वतःची मुले व असे शिष्य यांत कणभरही भेद त्यांनी केला नाही. कोणता मुलगा पोटचा आणि कोणता शिष्य शिकायला राहिलेला हे बाहेरच्या अनोळखी माणसाला कळणारच नाही असे त्यांचे वागणे असे. तेही मनापासून करी तोच त्यांचा स्वभाव होता. निखळ मातृत्व हाच त्यांचा स्थायीभाव होता. या अर्थाने त्या सर्वांच्याच आदर्श माता आहेत असेच सर्वजणांना वाटे.

श्रीदत्तमहाराज अबोल व संकोची, सदैव मौनात वावरणारे, फक्त ज्ञानदानास

तोंड उघडणारे. म्हणूनच आईसाहेब स्पष्ट बोलणाऱ्या, परखड स्वभावाच्या, मनात असेल ते लगेच बोलून टाकणाऱ्या. पण त्या परखड बोलल्या तरी पोटात परिपूर्ण मायाच असे, मुलाला वळण लागावे म्हणून स्पष्ट सांगणाऱ्या मातेची भूमिकाच असे. तोंडातून कडक शब्द बाहेर पडले तरी काही क्षणांतच त्या पुन्हा सौम्य शब्दांत समजूत काढीत व मायेने जवळ घेत. स्वतःच्या अपत्यांनाही त्यांनी कधी शिक्षा केली नाही. कितीही चूक केली तरी समजावून सांगायच्या. मुलाने ऐकले नाही तर अबोला धारण करणे एवढीच शिक्षा त्या करायच्या. पण तो अबोला मुलांना चाबकाच्या फटक्यासारखा वाटे. म्हणूनच त्यांची सर्व अपत्ये, त्यांच्या सहवासात आलेले सर्व शिष्य, साधक आणि सर्व नातलग यांच्यावर कळत न कळत आईसाहेब उत्तम संस्कार करू शकल्या. भारतीय संस्कृतीचे संस्कार करणारी निखळ प्रेमळ माता, आदर्श माता हेच त्यांचे रूप होते. आदर्श स्त्री ही मातारूपातच मानणारी भारतीय संस्कृती आईसाहेबांच्या जीवनात पूर्णपणे अवतरली, प्रत्यक्ष आचरणात प्रतिबिंबित झाली. हे त्यांचे मातृरूप ज्यांना ज्यांना अनुभवता आले त्यांना सर्वांनाच त्या पूजनीय वाटल्या, वंदनीय वाटल्या. सकाळी उठल्यावर त्यांचे स्मरण करावे, त्यांच्या पायाचे तीर्थ घ्यावे आणि मगच दिनक्रमाला सुरुवात करावी अशा योग्यतेच्या वाटल्या. "स्मरे नित्यं महापातकनाशन्" अशा कोटीच्या वाटल्या. थोर संत श्रीदत्तमहाराज जसे परमेश्वररूप म्हणून पूजनीय तशाच आईसाहेबही जगदंबास्वरूप म्हणून पूजनीय वाटल्या. "शंकर आणि पार्वती" या ईश्वरी रूपांनी कसा संसार केला असेल याची कल्पना श्रीदत्तमहाराज व सौ. आईसाहेब यांचा संसार पाहून पुरेपूर येते.

श्रीदत्तमहाराज प्रथमपासूनच वैराग्यशील मनोवृत्तीचे. तत्त्वज्ञानाच्या अभ्यासात रमलेले. तत्त्वचिंतनात असले की सगळे जग विसरून जाणारे. अंतर्मुख मनोवृत्तीचे. कीर्ती, धन, यश या लौकिक गोष्टींबद्दल पूर्णपणे उदासीन असलेले. संसारात असूनही मनाने पूर्णपणे असंग असलेले. मनात संसार शिरू नये म्हणून दक्ष असलेले. अशा संतांचा प्रपंच करणे सोपे नाही. एक प्रकारे हे असिधाराव्रत आहे. तलवारीच्या पात्यावर चालण्यासारखेच आहे. पण आईसाहेबांनी ते सहजगत्या करून दाखवले. श्रीदत्तमहाराजांचा प्रपंच व परमार्थ दोन्ही त्यांनीच सांभाळला आणि तेही पानामागे लपणाऱ्या फुलाप्रमाणे मागे राहून, स्वतःला पूर्णपणे झाकून घेऊन. सर्व श्रेय श्रीदत्तमहाराजांच्या पदरात टाकून. मला काय येतं, मला त्यांतले काय कळतं असं तोंडाने म्हणत, उंबरठ्याच्या आतच दारामागे उभे राहून ! हे सोपे नाही. सामान्य स्त्रीला हे अशक्यप्रायच वाटेल. पण आईसाहेबांचा पारमार्थिक अधिकार फार मोठा होता. जगदंबामातेचे दैवी गुण, अधिकार व थोरवी त्यांच्यांत सामावलेली होती. म्हणूनच त्या सर्वांच्याच माता झाल्या. केवळ त्यांच्या पोटी जन्म घेतलेल्या अपत्यांच्या त्या माता राहिल्या नाहीत, त्यांच्या परिवारांतील सर्व लहानथोरांच्या त्या माता झाल्या

श्रीदत्तमहाराजांच्या सर्व शिष्यपरिवाराच्याही त्या माता झाल्या आणि सर्व शिष्य परिवार ज्यांची परमेश्वररूपाने पूजा करतो, त्या श्रीदत्तमहाराजांच्याही आईसाहेब स्वतः माताच बनल्या. हे त्यांचे मातृत्वाचे रूप खरोखरीच अतुलनीय आहे, विलोभनीय आहे.

श्रीदत्तमहाराज अतिशय संकोची स्वभावाचे, सोशिक वृत्तीचे. सर्वांचे अपराध पोटात घालणारे, सहनशील तितिक्षेचे जणू ते मूर्तिमंत रूपच होते. कितीही गैरसोय झाली त्रास झाला वेदना सहन कराव्या लागल्या मानसिक क्लेश देणारे प्रसंग घडले तरी पूर्णपणे शांत राहणारे. तोंडातून शब्दही न काढणारे, पूर्ण जलाने भरलेल्या अथांत सागराप्रमाणे गंभीर आणि शांत. सागराच्या पोटात किती आणि काय दडलेले आहे, अगदी पेटलेला वडवानल सुद्धा दडलेला आहे याची कल्पना कोणालाच बाहेरून येणार नाही. श्री दत्तमहाराजांचे तसेच, त्यांच्या चेहऱ्यावर अंतरंगातील कोणतीच भावना उमटणार नाही. अंतरंगात वादळ, असले तरी दत्तमहाराज शांत, तृप्त, प्रसन्न, हसतमुखच दिसणार. पण इतरांना कांही कळले नाही तरी सौ. आईसाहेबांना दत्तमहाराजांचे अंतरंग ताबडतोब जाणता येई. अतींद्रिय पातळीवरून त्या श्रीदत्तमहाराजांच्या मनातील अगदी छोटासा विचारही जाणून घेत व तत्परतेने त्यांच्या हातून त्याप्रमाणे कृती घडून जाई. श्रीदत्तमहाराज व सौ. आईसाहेब हे दोन देह पण या दोघांचेही मन मात्र एकच होते. पती व पत्नी यांचे हे अद्वैत भारतीय संस्कृतीने आदर्श संसाराचे गमक म्हणून सर्वोच्च मूल्य मानले आहे. श्रीदत्तमहाराज व सौ. आईसाहेब यांच्यात हे अद्वैत परिपूर्णरूपात साकार झाले होते. म्हणूनच भारतीय संस्कृतीने आदर्श मानलेली धर्मपत्नी परिपूर्णरूपात सौ. आईसाहेबांच्या जीवनात प्रत्यक्ष पहायला मिळते. खऱ्या अर्थाने त्या सहधर्मचारिणी आहेत असे सर्वांना जाणवत राहिले.

सौ. आईसाहेबांनी आपला पारमार्थिक अधिकार नेहमीच झाकून ठेवला. परंतु जाणकारांच्या लक्षात त्यांचा अधिकार लगेच येत असे. समोर आलेल्या माणसाच्या मनातील भाव व श्रद्धा त्यांना लगेच उमगत असत. श्रद्धापूर्वक भक्तिभाव मनांत ठेवून जेव्हा एखादा शिष्य दत्तमहाराजांकडे येत असे तेव्हा सौ. आईसाहेबांनाही मनापासून आनंद होई. त्याचे त्या अत्यंत मायेने स्वागत करीत. नमस्कारासाठी तो वाकला की त्या आईच्या मायेने आपले पाय पुढे करीत आणि त्याला भरभरून आशीर्वाद देत. काही श्रद्धावंत, उच्च कोटीच्या साधकांना त्या जवळ करीत.त्यांच्या मस्तकावर हात ठेवत आणि त्यांच्या पाठीवरूनही हात फिरवून त्यांच्या पारमार्थिक साधनेला सहाय्य करीत. दत्तमहाराजांसारखाच त्यांचाही स्पर्श साधकाचे उन्नयन करणारा होता असे अनेक उच्च कोटीच्या साधकांना सतत जाणवत राहिले. अशा साधकांच्या घरगुती अडचणी त्या समजून घेत व त्यांना मार्गदर्शन करीत. कौटुंबिक जीवनात साधकांना मार्गदर्शन करणे, मदत करणे हा त्यांच्या

आवडीचा छंदच होता. परंतु केवळ देखावा करण्यासाठी मनात दंभ ठेवून दर्शनाला आलेल्या शिष्याच्या मनात कोणते भाव आहेत हे त्या पटकन ओळखत. अशा साधकांशी त्या फारशा बोलतही नसत. नमस्कारासाठी तो साधक पुढे आला तर पाय मागे घेऊन त्याचा नमस्कार घेण्याचेही टाळत. जणू काही काचेच्या पेटीत ठेवलेल्या वस्तू स्पष्टपणे दिसाव्यात तसेच समोरच्या माणसाचे अंतरंग त्यांना स्पष्टपणे दिसत असे. त्यांच्या संकल्पाने आणि आशीर्वादाने अनेक साधकांना मोठेच उन्नयन झाल्याचा अनुभव आला ही वस्तुस्थिती आहे. म्हणूनच सौ. ताईमहाराज म्हणतात की, "आईसाहेब म्हणजे जगदंबेचे परिपूर्ण रूपच आहे. कोल्हापूरच्या अंबामाईचे दर्शन घेणे आणि सौ. लक्ष्मीबाई आईसाहेबांचे दर्शन घेणे, दोन्हीचे फळ एकच." आईसाहेबांचा हा पारमार्थिक अधिकार जाणून ताईमहाराज नेहमीच त्यांच्याशी लीनतेने वागत आणि आईसाहेबांचा साध्या संभाषणातील शब्दही वेदवाक्याप्रमाणे आज्ञा आहे असे मानून त्याचे पालन करीत.

आईसाहेबांनी स्थूल देह ठेवला असला तरी त्या कोठे गेल्या आहेत? सूक्ष्म रूपांत, अव्यक्त रूपात त्या आपल्यांत आहेतच. श्रीदत्तमहाराज नेहमी सांगतात की, ज्या स्थानांत संत दीर्घकाळ रहातात ते स्थान संतरूपच धारण करते. म्हणूनच वाडीला जाणाऱ्या प्रत्येक श्रद्धावंत साधकाला स्वामीमहाराज तेथे आहेतच हे जाणवते व वाडी म्हणजेच स्वामीमहाराजांचे रूप आहे याचा प्रत्यय येतो. वाडी म्हणजे स्वामीमहाराज अशी अनुभूती असंख्य भाविक आजही घेत आहेत. आईसाहेबांचे तसेच आहे. ज्या रेणुका निवासमध्ये आईसाहेबांनी दीर्घकाळ वास्तव्य केले ते आईसाहेबांचे रूपच झाले आहे. रेणुका निवासाच्या रूपाने त्या आजही आपल्याला भेटू शकतात. आजही त्या श्रीदत्तमहाराजांच्या धर्मजागरणाच्या कार्यात तशीच तितकीच साथ देत आहेत आणि ही अशीच साथ भविष्यकाळात त्या देत रहाणार आहेत. आईसाहेब स्थूल शरीराच्या सीमा ओलांडून अव्यक्त रूपांत गेल्यामुळे त्यांचे धर्मकार्य अधिक व्यापक प्रमाणावर होत रहाणार आहे असाच सर्व श्रद्धावंतांचा पूर्ण विश्वास आहे. मग श्रद्धांजली कशाला वहायची? त्या आहेतच आपल्यात. मनोमल दूर करणारे त्यांचे पवित्र दर्शन भक्तांना रेणुकानिवासात केव्हाही मिळतच रहाणार आहे.

**डॉ. शरदचंद्र कोपर्डेकर**
६०१, मेरीलॅन्ड कॉर्नर,
डॉ. आंबेडकर रोड,
सायन, मुंबई - ४०० ०२२

# प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराजांना श्रद्धांजली

मधुसूदन रा. खानवेलकर, कोथरूड - पुणे.

काय ऐकिले कानी, गेले निजधामी गेले ।
जे व्हायचे ते झाले, सद्गुरु दत्तमहाराज गेले ॥धृ.॥
नव्वद वरुषे झाली, काया जीर्ण, जीव थकला ।
धर्मपत्नीला जाऊनि केवळ, अल्प काळ लोटला ।
शिव-शक्ति वा दत्त-लक्ष्मी, सहप्रवासी झाले ॥१॥
ध्यानमग्न अन् अंतर्लक्षी, ऋषीतुल्य मुद्रा ।
शांतस्वभावी, मितभाषी अन् प्रसन्न मुद्रा ।
नम्रत्वाने जणू वाकले,—अनंतासी कोंदले ॥२॥
धोतर खाली, वरी उपरणे गौरवर्ण कांती ।
काखोटीला, एकचि पिशवी, अनवाणी जाती ।
जगा धाकुटे होण्यामागे, मोटेपण लपले ॥३॥
मुकलो आता त्या रूपाला, प्रासादिक वाणी ।
भक्तिरसाने ओथंबलेली, मृदु मधुर-वाणी ।
जन्मभरी तर 'श्रीमद्भागवत', ओटावरी रुळले ॥४॥
नाही परिसणे वाणी, झालो श्रवणासी पारखे ।
कोण आम्हाला सांगे महिमा, भक्तीचा कवतुके ।
स्वाध्यायाला - व्यासंगाला एकनिष्ठ राहिले ॥५॥
नैय्यायिक अन् वेदान्ती ते धर्मशास्त्रवेत्ते ।
योगपीठावरी आरूढ झाले, पावशतक होते ।
सत्कर्मांचा सद्धर्माचा धडा घालुनी गेले ॥६॥
जरी जाणते होता आपण गर्व न शिवला कधी ।
सिद्ध योगी असूनि आपण भ्रष्ट न झाला कधी ।
सदाचार अन् भक्ति - ज्ञाने, खूप सांगूनि गेले ॥७॥

तिलांजली दिन
१०.३.९९

# ब्रह्मर्षि दत्तमहाराज

नंदकुमार ज. प्रभुणे, कोथरूड - पुणे २९

वासुदेवाश्रमी सुखे नांदती दत्तात्रेय ब्रह्मर्षि
विषाद सोडुनी, प्रज्ञाचक्षुंनी पहा तया अहर्निशी ॥१॥

डोळ्याने जरी दिसली नाही तनुः स्मूक्षरूपे
वंदन करिता चरणकमलांना, अहंकार लोपे ॥२॥

साधक स्तविती 'दिगंबरां'चा होतो जयघोष
भजनी तिष्ठती, ब्रह्मा, विष्णू ही गीता साक्ष ॥३॥

तुझ्या कृपेने सन्मती धरिते सत्संगाची वाट
भवसागरी या तारुन नेई विचारधनाची लाट ! ॥४॥

संसारामध्ये दोष काय आहेत हे समजलं म्हणजे वैराग्य निर्माण होऊ लागले. संसारातील दोषांची दृष्टी उत्पन्न झाली म्हणजे मला. हे नको आहे असे वाटू लागते हीच खरी निवृत्ती आहे. संसारात सुख नाही. टिकणारा एकही विषय नाही हा विचार दृढ होणे आवश्यक आहे. म्हणजे चित्तवृत्ती निरोध होऊ लागतो आणि वैराग्याचे बळ वाढत जाते.

— श्रीदत्तमहाराज कवीश्वर

# ' येणे कारणे परब्रह्म '

## पू. दत्तमहाराज कवीश्वरांचे महानिर्वाण

### अजित कुलकर्णी

पू. दत्तमहाराजांचे महानिर्याण, सोम. दि. १ मार्च ९९ रोजी झाले. एक महान अलौकिक घटना !

दत्तसंप्रदायी व शक्तिपात दीक्षेचे पू. गुळवणी महाराजांचे उत्तराधिकारी असणाऱ्या दत्तमहाराजांचा मृत्यूही असामान्य ठरला.

दत्तमहाराज पू. गुळवणी महाराजांप्रमाणे मंत्रदीक्षा, स्पर्शदीक्षा, व स्वप्नदीक्षा देते असत. हा योगमार्ग सर्व साधकांसाठी सोपा करून समाजात रूढ झाला आहे. त्याला आचारविचारांची मर्यादा असते. शक्तिपात दीक्षा हा अभ्यासाने दृढ होतो व तो फलद्रूपही होऊ शकतो.

देवी भागवतात ऋषी असे म्हणतात –

**न योगो नभसः पृष्ठे न भूर्मो न रसातले**
**ऐक्यं जीवात्मनोराहुर्योगं योग विशारदः ॥**

हा योग म्हणजे स्वर्ग, भूमी, किंवा पातळात कुठेही नाही तरी योगाच्या ज्ञानाने, अभ्यासाने, आत्मा व परत्स्याचे मीलन होणे हा योग. ही चितूशक्ती आत्मास्वरूपात गतीमान होते. त्यामुळे महापुरुषांच्या प्राणोत्क्रमणाचे वेळी ही शक्ती अत्यंत गतिमान होते. त्या गतीचा वेग, परिणाम मोजणे अवघड असते.

मी आत्तापर्यंत दोन महापुरुषांचे देह ते जीव अनंतात विलीन झाल्यावर पाहिले. त्या देहांचे दर्शन घेतले आहे. एक पू. भगवान श्रीधरस्वामीमहाराज व दुसरे कांची कामकोटीचे परमाचार्य चंद्रशेखरेंद्र सरस्वती स्वामी महाराज. या दोघांची व पू. दत्तमहाराज यांच्या देहाची अवस्था एकच होती.

जीवात्मा व शिवात्माचे मीलन होताना, ज्याप्रमाणे सूर्योदय काली किंवा अस्तकाली जी सुर्वणप्रभा - कांती या विश्वावर पसरलेली असते, ती या मीलनाची असते बरं ! त्यामुळेच दिवसा प्रातःकाली प्राणोत्क्रमाचे वेळी रेणुका निवासात काही काळ या प्रभेची अनुभूती होती तर अस्थिविसर्जनाचे वेळी सूर्याच्या अस्तमान समयाची वेळ, याच प्रभेची होती. यातच आम्ही सर्व ' यतो वाचानि वर्तते ।' प्रमाणे एक क्षणभर ' स्तब्ध होतो ! शांत होतो ! कृष्णा- पंचगंगा संगमातील नदी प्रवाह

क्षणभर कसा निरामय शांत होता. जणू काही त्या कृष्णामाईला आनंद वाटत होता. जे बाळ, मी ती. सौ. सरस्वतीच्या उदरी स्थापन केले तेच, ज्ञानदेवी सरस्वतीने भक्ती लक्ष्मीच्या लेकरांच्या हस्ते पुन्हा आपल्या उदरी घेताना, साऱ्यांची एक उन्मनी अवस्था व सुवर्णकांति युक्त सूर्यप्रभेत नारायण नामाच्या नौकेत अगदी मूक होते बरं !

**उपजे ते नाशे।**
**नाशे ते पुनरपि दिसे।**
**ऐसे हे घटिका यंत्र। परिभ्रमे गा ॥**

ज्ञानेश्वर माउली म्हणतात, ' जे जे निर्माण झाले आहे, त्याचा नाश निश्चित आहे व ज्याचा नाश झाला त्याची ही पुन्हा निर्मिती होते. हे काळाचे यंत्र अव्याहत सुरू आहे. याचे प्रतीक म्हणजे, सूर्योदय व अस्तकाळी सुवर्णकांतीची प्रभा सूर्यनारायण विश्वावर उधळत असतात. त्याची साक्ष म्हणजे, पंचमहाभौतिक देहातून चैतन्यरूपी तेजोभास्कर अंनताकडे झेप घेत असताना, त्याची सुवर्णकांतीयुक्त प्रभा देहावर प्रगट होत असते. हीच एक अलौकिक घटना म्हणावी लागेल.

पातंजली योगसूत्र - विभूतीपाद सूत्र - ४४, मध्ये व्यक्त केल्याप्रमाणे - प्रातःकाळी महाराज अनंतात, ' द्यु ' लोक, - ब्रह्मलोकांस गेले. लौकिक दृष्टीने व शास्त्रधर्माने सर्व गोष्टींचे पालन आपण सामान्य माणसांनी केले तरी, या कोणत्याही बंधनात महाराज राहिलेले नाहीत अशी आमची धारणा आहे.

योगाभ्यासामुळे, संतकृपा, ईशकृपेमुळे ईश्वरी अवतारी पुरुषांच्या ठिकाणी

**रागद्वेषवियुक्तैस्तु विषयानिन्द्रियैश्चरन् ।**
**आत्मवश्यैविधेयात्मा प्रसादमधिगच्छति ॥**

महापुरुषांच्या ठिकाणी निर्विकल्प अवस्था येते, तेव्हा त्यांच्या चित्तातून, मनातून रागद्वेष इ. गोष्टींचा नाश होतो. मन आत्मरूप राहून सदा प्रसन्न अवस्थेत राहते. हे स्फुरण ' तेजस या गुणातून व्यक्त होत असताना, ' तेजस ' चे प्रतीक सुवर्ण कांतीची प्रभा आहे.

**सदा सत्त्वे प्रबुध्दे तु प्रलयं यति देहभृत् ।**
**तदोत्तमविदाँल्लाकानमप्रतिपद्यते ॥**

मनुष्यदेह धारणा करणाऱ्या आत्म्याची जेव्हा सत्त्वगुणांची वृध्दी झाली असते, देहत्यागरूपी प्रलयाप्रत जातो, तेव्हा महादित्यादि उत्तम तत्त्वास जाण्याचा शुध्द अशा ( द्यु वा ब्रह्म ) लोकास प्राप्त होतो, अशा सत्त्वगुणांचे महत्त्व भगवान

गोपाळकृष्ण गीतेत सांगतात. सत्त्वगुणांच्या अंगीकाराचे फळ कसे असते हे महाराजांच्या जीवन चरित्रात दिसून येते.

सत्त्वगुणांच्या परिपूर्ण अंगीकाराने अमानित्वादि ज्ञान गुणांनी व अभयादिक दैवी गुणसंपत्तीने आयुर्वेदातील रसायन प्रकरणात (कोल्टकर यांचे पांतजली योगदर्शन - पान ४३२ -४३३ ) मध्ये सांगितल्याप्रमाणे –

**दीर्घमायुः स्मृतिं मेधाऽरोग्यं तरुणं वयः ।**
**प्रभावर्णस्वरौदार्यं देहेन्द्रिबलं परम् ।**
**वाक्सिध्दीं प्रणतिं कांतिं लभते ना रसायनात् ॥**

दीर्घ आयुष्य, स्मृती, मेधा, आरोग्य, तारुण्य, प्रभावर्ण ( सुर्वणकांती ), उत्तम स्वर, स्वभावाची उदारता, इंद्रिय सामर्थ्य, वाक्सिध्दी, विलक्षण नम्रता, कांती (तेज ) हे प्राप्त होतात . तसेच,

**सत्यवादिनमक्रोधं निवृत्तं मद्यमैथुनात ।**
**अहिंसकं प्रशांतम्, जपशौचपरं, धीरं तपस्विनं**
**गो - ब्राह्मणाचार्यं गुरुवृध्दार्चनरतं आनृशंस्यपरं**
**अनहंकृतं शास्त्राचारं अध्यात्मप्रवणेंद्रियं**
**धर्मशास्त्रवरं विद्यान्नरं नित्यरसायनम् ॥**

नेहमी खरे बोलणारा, क्रोधवश न होणारा, मद्यापासून निवृत्त, बह्मचर्यव्रत पालन करणारा ( गृहस्थाश्रमात पतिपत्नीनी एकनिष्ठ राहणे हेही ब्रह्मचर्यपालन केल्यासमान असते. )

अहिंसक, शांतवृत्तींचा, जपशौचादिकांत तत्पर असलेला, धैर्यवान, तपस्वी, देव - गायी, ब्राह्मण, आचार्य गुरुजन आणि बृध्द यांना मान देणारा, कोणाचा घातपात न करणारा, निरभिमानी, सदाचरणी, अध्यात्माकडे ओढा असणारा धर्मशास्त्र परायण असा मनुष्य नित्यरसायन पूर्ण असतो. हेच रसायन सुवर्ण क्रांतीचे रसायन म्हणता येईल.

पू. श्रीधरस्वामी, पू. परमाचार्य, व पू. दत्तमहाराज नित्यपणे या रसायनातच होते. दत्तमहाराजांची ही कांतिप्रभा, तेजस्विता देह ठेवताना विलक्षण स्वरूपात प्रकट झाली होती.

योगवाणी अथवा सिध्दीयोगोपदेश पुस्तकात अनाहतचक्राचे वर्णन ( पान ५५ ) मध्ये केले आहे. त्यामध्ये सुवर्णसमान प्रकाशान होणारी ही तेजोमयता महाराजांच्या देहावर प्रकट झाली होती.

याला अध्यात्मशास्त्र, योगशास्त्र व वैद्यकशास्त्र या तिन्ही शास्त्रांची एक वाक्यता आहे. या काया सपंत्तीचा उपयोग योगाभ्यासाने होऊ शकतो. तेव्हा खऱ्या कैवल्याचा साक्षात्कार घडत असतो.

पू. दत्तमहाराज केवळ तुमच्या - आमच्यातील सामान्य नव्हते तर, अनेक संत महात्म्ये, ईश्वरकृपेमुळे साकार झालेले चालते बोलते परब्रह्म होते. जीव व शिव दोन्ही एकच असते. या बोधवर जे अखंड राहतात ते परब्रह्म ! म्हणून '' येणे कारणे ते परब्रह्म म्हणावे लागते. 'तुम्ही, आम्ही जे सामान्यपणे जीव बोधावर राहतो

तो जीवात्मा सामान्य मानव होय. म्हणून महाराजांना ''साकार झालेले परब्रह्म '' म्हणतोय बर !

**निर्विचारवैशारद्ये ऽ ध्यात्मप्रसादः ॥**
**( पाताजंली योग सूत्र, समाधीपाद सूत्र ४६ ) ॥**

वैशारद्य म्हणजे पक्कावस्था. निर्विचार समार्थात वैशारद्य प्राप्त झाले असता, तो जीवात्मा समाधी अवस्थेत पोहचतो हाच अध्यात्मप्रसाद आहे. व प्रज्ञाशक्ती ( बुध्दी ) ही ऋतंभरा होते. या सर्व गोष्टी पू. महाराजांच्या ठिकाणी दिसून येतात.

या सर्व गोष्टींचा परिपाक म्हणजे उध्दवजी स्वरूप असलेले ज्ञानयोगी दत्तमहाराज, '' श्रीकृष्ण गोविंद... हरे मुरारे .... भजनात चिंब झाले. ज्ञानाला भक्तिरस प्राप्त झाला, शेवटी शेवटी, ''दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरात'' रमून गेले. कवणा ठाया जावे '' व कृष्णादयार्णव स्वामींच्या मानसा ऽऽ नारायण भज रे ... पूर्णपणे रंगले होते. केवळानंदात होते !

अशा एका उत्तुंग, विशाल व महामानवाच्या सान्निध्यात आपण सारे होतो तीच भाग्याची परिसीमा आहे हं ! तेव्हा अशा पू. दत्तमहाराजांना अनंत कोटी प्रणाम ऽ ऽ ऽ !!!

केवळ प्रार्थना करू या ...

**माझे चित्त तुझे पायी**
**राहो ऐसे करी काही**
**धरोनिया बाही**
**भव हा तारी दातार ॥ ....**

# "जन्मजन्मांतरीची मायमाउली...."

### डॉ. श्री. कृ. जामदार व श्री गुरुमाउली परिवार - अकलूज.

तत्त्वज्ञानाच्या सांप्रदायिक भूमिकेत श्रीगुरू ही व्यक्ती नसून शक्ती आहे हा वेदांतदेखील कोरडा ठरावा एवढी प्रेमाची ओली माया लावून आमचे परम श्रद्धास्थान सर्वोपसर्वा, श्री समर्थ सद्गुरू, एक व्यावहारिक मार्गदर्शक, आदर्श शिवशक्तीतत्त्व नुकतंच आपल्या मूळ स्वरूपात विलीन झालं !

ते सगुणरूपाचं तेजोवलय, आदर्श गृहस्थाश्रम, प्रदीप्त व्यक्तिमत्त्व, प्रसन्न मुद्रा, त्या आठवणी म्हटलं त्या या दिनकराबरोबरच किरणांच्यासहित स्वरूप स्थित झाल्या, पण आम्हा भक्तांना मात्र त्यांच्या चिन्मय शक्तीची अनुभूती त्यांनी दिली, देत आहेत व पुढेही ते देत रहाणार हे निश्चित ! असं शाश्वत सहवासाचं प्रेमसुख हे भक्तिसुखच होय.

एके काळी पंचवीस वर्षांपूर्वी श्रीसद्गुरु माउलीस्वरूप श्री गुळवणी महाराजांचा तेजोदीप मालवला व आम्हाला उदास, पोरकं वाटलं पण ती उणीव या मावशीने मायेनं, कौतुकानं-प्रसंगी परिश्रमपूर्वक आमच्या लेकरांवरील अपार, अहेतुक करुणेने व प्रेमछत्राने भरून काढली. परिचय देखील नसणाऱ्या या माउलीस्वरूप श्रीसद्गुरूंनी किती प्रचंड प्रेमपान्हा पाजविलाय यास असावी सीमा तर त्यास द्यावी उपमा. त्यांच्या जीवनचरित्राचे सिंहावलोकन केले कीं, हे सर्व उमजतं व नकळत डोळे पाणावतात !!!

एक ज्ञानी, महान शास्त्रीपंडित, आपल्या श्रीगुरुमहाराजांचे उत्तराधिकारी आहेत तेवढेच त्याकाळी ऐकले होते. प्रत्यक्ष दर्शन घडले नव्हते. कधी पूर्वपरिचय देखील नव्हता पण अकलूज येथे श्रीगुरुदेवांचे कृपाशीर्वादिकरून " श्री गुरुमाउली साधना मंदिर' या नांवाचा एक आश्रम उभारतोय हे आपण ऐकलं होतं ! समक्ष दर्शनभेटीत आपल्या प्रसन्न व आपुलकीच्या दर्शनानं आम्ही तृप्त झालो. त्यातूनच आपल्या कूर्मदृष्टीचा आम्हास प्रत्यय आला आणि ' श्री गुरुमाउली साधना मंदिराच्या उद्‌घाटनाच्या निमित्ताने १९७४ साली महाराजांचे येणे घडले व ते अकलूजकरांचेच झाले. प्रसन्न मुद्रेनं येण्याचे आश्वासन देऊनच माउली पुण्यास परतली.

प. पू. श्री. मामा देशपांडे यांचे प्रयत्नाने ' श्री गुरुमाउलीत' १९७६ साली साधनाशिबीर साधकांसाठी संपन्न झाले. भरपूर साधक, साधना, प्रवचने अन्नदान झाले. पू. श्री दत्तमहाराजांना या शिबिरात आणण्याचे सर्व श्रेय पू. श्री मामांना आहे व असा सार्थ अभिमानही वाटतो कीं या दोन थोर विभूति पुढे श्री गुरुमाउलीच्याच

व्यासपीठावर एकत्र आल्या व हे एक साधकांनी भरगच्च असं शक्तिकेंद्र बनलं !

इ. सं. १९८२, १९८५ व १९८८ या वर्षी अकलूज येथे पू. श्री दत्तमहाराजांचे मुखातून श्रीमत्‌भागवत श्रवणाचे भाग्य अकलूजकरांना लाभले. श्रीमत्‌भागवताचे श्रवणमहत्त्व निमंत्रण पत्रिकेत छापणेसाठी स्वतः श्रीगुरुमहाराजांनी आम्हास लिहून दिले ते आमच्या संग्रही प्राणपणाने जपले आहे.

"श्रीगुरुमाउली साधना मंदीरच्या" उभारणी–उद्‌घाटनानंतर तेथे दर तीन वर्षांनी श्रीगणेशयाग, श्रीदत्तयाग, श्री शतचंडीयाग, श्री विष्णुयाग, श्री अतिरुद्र संपन्न झाला. ही सर्व या माउलीचीच कृपा की, त्यांची उपस्थिती, मार्गदर्शन, पूर्णकृपाछत्र याचा लाभ आम्हास होऊन आम्ही या काळात जन्मलो हे किती भाग्यवंत, हीच पुर्वपुण्याई, जीवनसार्थकता वाटली.

पुढील वर्णिलेले प्रसंग अनेक गोष्टी शिकवून जातात व त्यांच्या जीवनपैलूंच दर्शन घडवितात.

१) 'श्री गुरुमाउलीतील प्रत्येक कार्यक्रम नियोजनबद्ध असे. आमची मोटार आपणास नेण्यास व आणण्यास येईल असे सांगितले की ते म्हणायचे, " कशाला खर्च ? आम्ही एस टी ने येऊ" आमच्या आग्रहामुळेच ते वहानाने येथे यायचे. किती विनम्रता! किती दूरविचार !! किती दुसऱ्याचा विचार !!!

२) श्रीमतभागवत सप्ताहाचे वेळी आम्ही दरवेळी सौ. आईसाहेबांना देखील येण्याचे निमंत्रण देत असू. एकदा ते सौ. आईसाहेबांना म्हणाले, "ऐकलत का ? आपल्याला अकलूजला भागवत श्रवणाला जायचय" त्यांचे ओठावर मिस्किल हास्य असायचे.

३) आतिथ्य हा तर त्यांचा आत्मीभूत पाया. प्रत्येक वेळी चहा, दूध, जेवण याची सतत चौकशी व्हायची व सर्व अकलूजकरांची नावा निशावार आस्थेने चौकशी करायचे. केवढा प्रचंड जनसंपर्क!

४) श्रींच्या निवासाच्या वेळी सर्व अकलूजकर नियोजनपूर्वक पाद्यपूजा, भोजन आयोजित करायचे. कितीतरी घरी या निमित्ताने श्रीगुरुमहाराज आपले दर्शन अनेकांना देत व पावन करीत. कधीच प्रकृतीची काळजी नाही. अशा वेळी श्रीक्षेत्र नीरानरहसिंहपूर जवळची उत्तम बाग देखील त्यांनी पाहिली व समाधान व्यक्त केले.

५) भोजनप्रसाद घेताना काही शिल्लक असल्यास सकाळचे वाढा असे म्हणत केवढी अन्नावर परब्रह्माची संकल्पना ! भोजनास पू. श्री मामा देशपांडे यांचेबरोबर श्री ज्ञानेश्वरी ओव्यांवर सहाव्या अध्यायावर चर्चा होई. भोजनोत्तर लगेच पाट उचलून ठेवायचे. केवढी शास्त्रनिष्ठा !

६) श्रीगुरुमहाराजांना त्रास होऊ नये म्हणून त्यांचे सेवक श्री. रघुनाथराव अनेकांना दर्शनलाभ घेऊ देत नसत. अशा वेळी त्यांची तक्रार श्रीगुरुमहाराजांचेकडे केली की म्हणायचे. 'आपण उपेक्षा करावी' केवढा व्यवहार सांभाळणे !

७) तीन भागवत सप्ताहांची सांगता श्रीविष्णुयागाने होऊन त्याचाच प्रसाद म्हणजे श्री 'गुरुमाउलीच्या प्रतिष्ठान' चा अन्नदान सेवा शुभारंभ अकरा वर्षांपूर्वी त्यांचे हातून झाला श्रीदत्तमहाराजांची पूजा करून त्यांच्या पात्रात ५१ सुवासिनींनी प्रथम एकएक पदार्थ वाढून त्यांना ओवाळले व हाच ताटातील प्रसाद उपस्थित सर्व सत्पुरुषांना वाटला व मग सर्व सत्पुरुषांनी तो उपस्थितांना वाटला. अशा हृदयंगम कार्यक्रमाचे आम्ही वर्णन करू लागलो की तो किती चांगला झाला म्हणून ते आमचेच कौतुक जास्त करायचे व आमच्या अंगावर आणखी मूठभर मांस चढायचे. सर्व संकल्पाचा दाता ते स्वतः असून कोण आमचे कोड कौतुक!

८) श्रीक्षेत्र कारंजा येथे श्री गुरुमहाराजांचा "श्रीदत्तमाहात्म्य ग्रंथांवर सप्ताहनिमंत्रण निश्चित झाले. आम्हालाही श्रवणाचे भाग्य लाभले व श्रीगुरूमहाराजांशी मनमोकळे भरपूर बोललो. आम्ही ब्राह्मणेतर हे त्यांना माहीत होते आम्ही श्रीगुरुचरित्र वाचावे का ? असा नाजुक प्रश्न त्यांना विचारलेवर त्यांनी त्वरित उत्तर दिले, "आपण ऐकावं" केवढी शास्त्रनिष्ठा !

येथील चर्चेत आपलं संपूर्ण जीवनच श्रीगुरूमय व्हावं ! असाच त्यांचा बोलण्याचा सूर होता. तेथून पुढे शेगांवक्षेत्री निघताना आम्ही गाडीत बसून निघालो तेही खोलीच्या बाहेर आले व दोन्ही हात उंचावून आम्हास दोन्ही हात उभारित भरगच्च आशीर्वाद दिले. तो क्षण अजूनही डोळ्यांपुढे येतो.

तेथील ट्रस्टीजना आमची व्यवस्था उत्तम करण्यासाठी मुद्दाम सांगत व आस्थेवाईकपणे चौकशी करीत. केवळ शिष्यांवर माऊलीची माया !

९) महाराज मला छातीत धडधडते, डॉक्टरांनी सांगितले आहे एक्स्ट्रासिस्तोस्य. महाराज म्हणाले, या मंत्राचा जप करा आणि खरंच पुनः तो त्रास नाही.

१०) पू. श्री. गुरुमहाराजांना विचारले, 'महाराज आपली व सौ. आईसाहेबांची पाद्यपूजा व्हावा अशी इच्छा आहे.

आपले सर्व कुटुंबीय, प्रसादभोजनासाठी यावेत. पांच वर्षांपूर्वी मंगलमय वातावरणात देवाला नैवेद्य व उभयतांची पाद्यपूजा व महाप्रसाद झाला. त्यांना बोटात तोळ्याची आंगठी घालताना महाराज म्हणाले, कशाला एवढा खर्च ! मी मनात म्हटले, महाराज, हे वैभव तरी आम्हाला कोणी दिले? तुमचीच ही पूर्ण कृपा. ना ?

त्यांच्या अखंड कृपाछत्राखाली आमची साधना अखंड निर्विघ्नतेने, आनंदाने चालू आहे. 'श्रीगुरुमाउलीचा रौप्यमहोत्सवही त्यांच्याच कृपेने उत्तम झाला व शेवटचे प्रसन्न दर्शन पू. श्री गजानन महाराज आश्रम व पू. श्री काळे महाराज यांचे समवेत झाले ते अखेरचेच ! पू. श्री. गुरुदेव आपलं कृपाछत्र आम्हांवर अखंड आहेच, ते आणखी वाढावं एवढीच या निमित्ताने आपल्या चरणी विनम्र प्रार्थना.

# साक्षात्कारी संत-ब्रह्मीभूत पं. दत्तमहाराज कवीश्वर

पं. ल. पं. जांभोरकर

परमपूजनीय ब्रह्मर्षी दत्तमहाराज कवीश्वर, आम्हा सर्व विद्यार्थ्यांचे पू. कवीश्वर गुरुजी. टिळक महाराष्ट्र विद्यापीठात आम्हाला न्याय, वेदान्त शिकवीत होते. प्रत्यक्ष अभ्यासापेक्षा जीवनविषयक तत्त्वज्ञान ऐकण्यातच आम्ही कृतकृत्य समजत होतो. गोपिकांना रासक्रीडेच्या वेळी व इतरही वेळी जसे कृष्णाचे माझ्यावरच प्रेम आहे असे, वाटत असे तसेच मीही असे म्हणतो, गुरुजींचे माझ्यावरच खूप प्रेम होते. शिकत असताना त्यांच्या मातामहींना (वय ८०) सांगलीवरून आणण्यासाठी गुरुजींनी मलाच पाठविले होते. तसेच सौ. सुमनताईंचे लग्नात मीच सर्वाधिकारी होतो.

तसेच आपल्यामुळे इतरांना यत्किंचितही त्रास होऊ नये म्हणून वेळप्रसंगी आपला कर्मठपणा ते बाजूला ठेवीत असत. कन्याशाळेच्या समोरच्या वर्तकांच्या वाड्यात गुरुजी प्रथम राहत असत. कोणत्यातरी निमित्ताने आईसाहेब व इतर सर्वजण बाहेरगावी गेले होते. ही कुणकुण माझ्या व मित्र दिवाकरच्या कानी आली. आम्ही दोघे घरी गेलो. ते नको नको म्हणत असताना आम्ही स्वयंपाकाच्या तयारीला लागलो. तेव्हा गुरुजी म्हणाले, सोवळे नेसण्याची आवश्यकता नाही. धूतवस्त्र असले तरी चालेल. बहिरंगापेक्षा अन्तःकरणाची शुध्दता श्रेष्ठ असते. बहिरंगाचे अवडंबर विनाकारणच माजवू नये.

जाता जाता **"सहज बोलणे हाचि उपदेश"** हा संतांचा स्वभाव तेथे प्रकट झाला. अतिशय शांत स्वभाव, माउलीची कनवाळू दृष्टी, राग कधी माहीतच नाही ते विद्यार्थ्यांना कधीही अरे कारे म्हणत नसत. घरी मंडळींना देखील ते अहोकाहो असेच म्हणायचे. दत्तमहाराज प्रत्यक्ष दत्ताचेच अवतार होते, याचा पदोपदी अनुभव आला. एकदा विद्यापीठातील सर्वचजण गुपचुप गणपतीचे देवळात यज्ञासाठी गेले होते, मीच या ना त्या कारणाने विद्यापीठात एकटाच होतो—म्हणजे मलाही जाण्यास उशीर झाला होता. इतक्यात विद्यापीठात पोस्टमन आला व त्याने तार आणली. ती कर्मधर्म योगाने माझीच होती. माझी आई अत्यवस्थ होती व ताबडतोब निघून येणे. असा तारेत मजकूर होता. जवळ तर एक पैसाही नव्हता मी धावतच गुपचुप गणपतीचे देवळात गेलो. पाहतो तो काय, तुडुंब गर्दी! देवळात शिरकाव होईना. काय करावे? कसे करावे ? डोळ्यावाटे अश्रुपूर वाहत होता. थिजून जागचे जागी

उभा राहिलो. पाहतो तो काय प्रत्यक्ष गुरुजी माझेसमोर उभे! त्यांनी माझ्या हातात शंभर रुपयाची नोट ठेवली. एका विद्यार्थ्यास मला गाडीत बसवून देण्यास सांगितले व ताबडतोब निघ म्हणाले. वाटेल बरे आईला. मी गुरुजींच्या चरणावर मस्तक ठेवले व निघालो. गावी गेलो. गुरूजींनी 'वाटेल बरे आईला' असे म्हटले होते, पुढे आईला खरोखरच बरे वाटले वास्तविक ती अत्यवस्थ झाली होती. पण गुरुजींनी आशीर्वाद दिला होता ना. आई बरी झाली. मी विचार केला. तार आलेली कोणालाही माहीत नव्हती. फक्त मला व पोस्टमनला. मग गुरुजींना कळाले कसे ? गुरूजी म्हणजे साक्षात दत्तावतार साक्षात्कारी संतच होते.

**" परगुणपरमाणून् पर्वतीकृत्य नित्यं निजहृदि विकसन्त सन्ति सन्तः कियन्तः ।"** अहं सामान्यः । मी अत्यंत सामान्य माणूस पण माझ्या ठिकाणी केवढा मोठेपणा त्यांनी निर्माण केला. माझ्या हातून संस्था स्थापण्याचे कार्य घडविले. ती संस्था त्यांच्या कृपेने वाढली शिशुवर्गापासून ते दहावीपर्यंत सुमारे दोन हजार विद्यार्थी इतर विषयांबरोबर संस्कृतचाही अभ्यास करीत आहेत. माझ्या गावाजवळील हिंगोली येथील धर्मालंकार ओमप्रकाश देवडाजींनी त्यांच्या नावाचा प्रस्ताव पाठविला संस्कृत पाठशाळेला 'ब्रह्मर्षी पं. दत्तमहाराज ढुंढिराजमहाराज कवीश्वर संस्कृत पाठशाळा' हे नाव पाठशाळेला देण्याचा त्यांच्या प्रत्यक्ष भेटीत गुरुजींनी मान्यता दिली. त्याकरिता श्री. देवडाजी पाठशाळेच्या नावाने दोन लाख बँकेत ठेव ठेवणार आहेत व दरवर्षी पाठशाळेच्या खर्चासाठी तीस हजार रुपये पाठविणार आहेत. **'सज्जनानां जीवनं परोपकाराय एव ।**

**गंगा पापं शशी तापं । दैन्यं कल्पतरु स्तथा ।**
**पापं तापंच दैन्यं च घ्नन्ति सन्तो महातपाः॥**

सज्जनानां जीवनं परोपकारार्थमेव । लोकांच्या उध्दाराकरिताच अशा सज्जनांचा जन्म होत असतो. माझ्या जीवनाचे तर त्यांनी सोनेच केले. विद्यापीठात शिकत असताना धर्मवीर विश्वासराव डावरे सतत विद्यापीठात येऊन मला लग्नाची गळ घालू लागले, पण मी त्यांना दाद देईनासा झालो तेव्हा ते पू. कवीश्वर गुरुजींच्याकडे गेले व माझी नात लक्ष्मीकांताला द्यायचा मी निश्चय केला आहे तेव्हा आपण हे घडवून आणावे, तेव्हा गुरूजींनी मला घरी बोलाविले व माझ्याकडून होकार वदवून घेतला व आईवडिलांना तार करून बोलाविले व माझे शुभमंगल घडवून आणले. असे एक ना अनेक प्रसंग सांगता येतील.

उपदेशाबद्दल मी अनेक वेळा त्यांना बोलून दाखविले पण त्यांनी प्रत्यक्ष गुरुमंत्र दिला नाही. "सहज बोलणे हाचि उपदेश" हेच ब्रीदवाक्य खरे ठरले. असे होते माझे व साऱ्या जगाचे गुरुजी. ते शरीराने जरी आमच्यातून निघून गेलेले असले तरी त्यांचा वरदहस्त साऱ्या जगावर रहाणारच आहे, माझ्यावरही त्यांची कृपा सतत रहावी हीच त्यांना श्रध्दांजली. ●●

# चालते बोलते ब्रह्म प. पू. दत्तमहाराज कवीश्वर यांच्या चरित्राचे अवलोकन

**श्रीराम महादेव भातखंडे**

भारतभूमी पुण्यभूमी आहे, संताची भूमि आहे. या पुण्यभूमीत पुणे येथे वास्तव्य असलेले सत्पुरुष आहेत, परमपूज्य दत्तमहाराज कवीश्वर. त्यांच्या दर्शनाने साधकांना तात्काळ मनःशांती मिळते. महाराज ईश्वरीशक्तीचे परिपूर्ण रुप आहेत. अध्यात्मशास्त्राने त्यांच्या रुपाने मूर्तिमंत स्वरुप धारण केले आहे. ब्रह्मानंद हा त्यांचा स्थायीभाव असूनही ते साधकांसाठी केव्हाही उपलब्ध होतात.

भक्तांच्या कल्याणाचीच केवळ कामना असणारे आणि कृपेचा वर्षाव करणारे दत्तमहाराज त्यांच्याकडे आलेल्या भक्तांचे अंतःकरण शुध्द करतात आणि त्यांना पुढील मार्ग दाखवतात. प्रकांड पंडित असूनसुध्दा ते सामान्य माणसाला समजेल अशाच सोप्या भाषेत बोलतात आणि अशाच सोप्या भाषेत डॉ. कोपर्डेकर यांनी हे चरित्र लिहिले आहे. महाराजांशी बोलत असताना मनातील शंका दूर होतात. सदैव शांत, संतुष्ट, प्रसन्न आणि तृप्त आणि तरीही अलिप्त असे हे आगळेवेगळे व्यतिमत्त्व **''आता उरलो उपकारापुरता''** या तुकाराम महाराजांच्या उक्तीप्रमाणे सार्थ जीवन जगत आहेत, आणि जीवन्मुक्त या परम पदवीला पोहोचले आहेत.

जो श्रोत्रिय आणि ब्रह्मनिष्ठ आहे अशा गुरुकडे ज्ञान संपादण्यासाठी जावे असे उपनिषद्-वचन आहे. दत्तमहाराज श्रोत्रिय म्हणजे श्रुतिपारंगत आहेत आणि ब्रह्मनिष्ठ आहेत. सत् तत्त्वाशी सदैव अनुसंधान असलेले ते सद्गुरु आहेत. ते **''गुरुः साक्षात् परब्रह्म''** आहेत.

दत्तमहाराजांचे घराणे हे पुण्याईचे भांडारच आहे आणि पुष्कळ पिढ्यांपासून संस्कृत विद्येचे माहेरघर आहे. त्यांचे आजोबा वक्रतुंड महाराज. त्यांच्या जिभेवर सरस्वतीचा निवास होता. त्यामुळे त्यांना प्रवचनाची कधी तयारी करावी लागली नाही. सरस्वतीचा पूर्ण वारसा धुंडिराज महाराजांकडून दत्तमहाराज यांच्याकडे आला आहे. धुंडिराज महाराजांवर पूज्य टेंबे स्वामींच्या रुपाने दत्तप्रभूंची कृपा झाली आणि म्हणून धुंडिराज महाराजांनी आपल्या मुलाचे नाव दत्तात्रेय ठेवले. हेच दत्तात्रेय म्हणजे दत्तमहाराज कवीश्वर. धुंडिराज महाराज साक्षात्कारी होते आणि पंडित होते, तरीपण ते साधेपणाने रहात. दत्तमहाराजसुध्दा सामर्थ्यसंपन्न असून

कमालीचे साधेपणाने राहतात. प. पू. गुळवणी महाराज कवीश्वरांचा उल्लेख नेहमी दत्तमहाराज असाच करीत असत. या दोघांचे आध्यात्मिक संबंध फार उच्च स्थानावरचे होते. दत्तमहाराज यांचा सत्कार वेळोवेळी शंकराचार्यांनी केला आहे. अनेक विद्वत्‌सभा त्यांनी पांडित्याने आणि त्याचबरोबर सौजन्याने जिंकल्या आहेत. भारत सरकारने त्यांची योग्यता जाणून विद्यावाचस्पति ही पदवी देऊन राष्ट्रपतींच्या हस्ते त्यांचा सत्कार केला आहे.

भगवद्गीतेमधील स्थितप्रज्ञाची सर्व लक्षणे महाराजांच्या ठिकाणी आहेत. एकनाथ महाराजांप्रमाणे त्यांनी प्रपंच आणि परमार्थ उत्तम रीतीने केला आणि करीत आहेत. महाराज चालते बोलते ब्रह्म आहेत. प. पू. गुळवणी महाराजांचे उत्तराधिकारी म्हणून दत्तमहाराज सर्वांना ज्ञात असले तरी ते स्वतःच आपल्या गुरुप्रमाणे पूर्णाधिकारी आहेत. तरीपण त्यांची गुरुवर पूर्ण श्रध्दा होती हे त्यांचे मोठेपण आहे.

डॉ. कोपर्डेकर यांनी एका विशाल व्यक्तिमत्त्वाची यथार्थ ओळख या चरित्रातून करुन दिली आहे. त्यांच्यावर महाराजांची कृपा आहे म्हणूनच हे कार्य पार पडले. त्यांच्या या चरित्राने अनेक मुमुक्षूंच्या जिज्ञासा तृप्त होतील आणि साक्षात्कारी पुरुष कसा असतो हे समजेल. सर्व मुमुक्षुंना हे चरित्र म्हणजे त्यांच्या अध्यात्ममार्गावरील वाटचालीत पाथेय म्हणून उपयोगी पडेल. चरित्राच्या शेवटी असलेल्या प्रश्नोत्तरांतून तत्त्वज्ञानाची ओळख होते आणि व्यावहारिक जीवनात प्रत्यक्ष कसे जगावे हे समजते. त्यानंतर असलेल्या भक्तांच्या अनुभवांतून साधकाला आपले अनुभव पडताळून पाहता येतील. अध्यात्माची आवड असलेल्या माणसाने हे चरित्र अवश्य वाचले पाहिजे. त्यामुळे त्याला कसे आणि कोठे जायचे आहे हे समजेल. डॉ. कोपर्डेकर यांनी या चरित्रलेखनाने संतवाङ्मयामध्ये अनमोल भर घातली आहे. डॉ. शरच्चंद्र कोपर्डेकर यांचे हार्दिक अभिनंदन.

**गृहस्थाश्रम न सांडिता । कर्म रेखा न ओलांडिता ।**
**निजव्यापारी वर्तता । आत्मबोध न मळीये ।।**

**श्रीदत्तमहाराजांचे जीवन दर्शन या ओवीतून होते.**

# प. पू. ब्रह्मश्री ज्ञानयोगी
# श्री दत्त कवीश्वर महाराज यांची आरती

शरणजनाश्रय प्रेमसुखालय करुणामृत सुघना
करुणासागर भवभयदु:खहर जनतारण करणा
कामक्रोध मद मोह लोभ हे षड्रिपु वन दहना
योगिराज श्री समर्थ गुरुवर वामन मनरमणा ॥१॥

श्री गुरु जय गुरु जयजय गुरु हे जय श्रीगुरुनाथा
श्रीमत्सद्गुरु दत्त कवीश्वर चरणी मम माथा ॥धृ.॥

दीन जनांच्या कल्याणाची ठेउन आर्त मनी
युगायुगामधी अवतरतां प्रभु अनेक रूपांनी
अत्रिनन्दनु, श्रीपादवल्लभ, नृसिंह अभिधानी
वर्णू जाता महिमा तुमचा शिणलीसे वाणी ॥२॥

अनन्य भावे येता चरणी शरण कोण भक्त
शक्तिपात ही दीक्षा देउन करिता की मुक्त
नेत्र झाकुनी बसता साधक उन्मनि उन्मत्त
आई पराम्बा कुंडलिनी ती नाचत देहात ॥३॥

पंचप्राणाच्या या वाती घेउनिया हाती
या भिजविल्या सुमति धेनुच्या सद्भावाच्या घृती
सोऽहं अग्नि जागउनीया पेटविली ज्योती
सद्गुरु किंकर दास हरी हा ओवाळित आरती ॥४॥

**हरिभाऊ जोशी निटूरकर**
२-१७-११९, एस. बी. एच. कॉलनी,
उप्पल, हैद्राबाद - ५०० ०३९
फोन :- ०४० - ७१७४१२४

# अविस्मरणीय - अनुभव

## सौ. भाग्यश्री खंडेराव मुसांडे

परम पूज्य गुरुवर्य

श्री दत्तमहाराज कवीश्वर यांची दीक्षा आम्हा उभयतांना दोन वर्षांपूर्वी मिळाली. ही शक्तिपात दीक्षा आम्हाला मिळाल्यापासून आम्ही त्यांच्याच आशीर्वादांची फुले वेचीत वेचीत संसारनौका पार करीत आहोत. तसे आमच्या जीवनात भरपूर प्रसंग महाराजांच्या कृपेने येऊन गेले. पण अगदी फक्त गेल्याच महिन्यातील एका प्रसंगाने माझं मन एकाच ओवीचा ध्यास घेत. **" सद्गुरू सारीखा आसता पाठीराखा, इतरांचा लेखा काय वानू"**. या ओवीत जो अर्थ भरून येतो. त्या अर्थानी हृदय सारख आनंदानी भरून जात असा हा प्रसंग.

माझ्या भाचीचे लग्न होऊन सहा वर्ष झाली, एक मुलगा पण झाला. दृष्ट लागेल असा संसार होता. पण माणूस हा जन्माला येताच कर्माचे गाठोड सोबत घेऊन येत असतो. त्याप्रमाणे अचानकच तीन महिन्यापूर्वी तीचे पती घरातून निघून गेले, त्यांना कोणत्याही प्रकारे व्यसन वगैरे काहीही नव्हत. त्यामुळे आमच्या पूर्ण कुटुबांची मानसिक परस्थिती खूपच बिघडली होती. त्या अगोदर माझ्या भाचीने महाराजांना शक्तिपात दीक्षा मिळण्यासाठी विनंतीचं पत्र पाठवल होत. व महाराजांनी पण कृपा करून तीला दीक्षा दिली. अशाप्रकारे आमचे. आई वडीलापासून पूर्ण महाराजांचेच दीक्षाधारी असल्यामुळे सर्वांनी याचा भार गुरूचरणावर ठेवला, महाराजांना फोनवर हा सर्व वृत्तांत आम्ही सांगितला. महाराजांनी जप वाढवा सर्व ठीक होईल सांगितले – त्याप्रमाणे आम्ही त्यांचे आशीर्वाद घेऊन जप वाढवला त्या प्रमाणे थोड्याच दिवसांत तिचे पती स्वतः होऊन घरी परत आले. औरंगाबादला बजाजमधे सर्विस पूर्वीचीच होती पण, या चार महिन्यांच्या कालावधीचा कांहीही त्रास न देता त्यांना रेग्युलर ड्युटी मिळाली. हा प्रसंग केवळ दत्तमहाराजांच्याच कृपेनी घडला कर्माचे गाठोडं सोडून महाराजांनी त्यांच्या जीवनात विझत असलेली ज्योत पून्हा लावली.

परमेश्वराजवळ प्रार्थना या प्रसंगावरून कितीही लिहिलं तरी शब्द अपुरेच पडतील. अशीच आशीर्वादांच्या फुलांची बरसात सद्गुरूंनी करावी. हीच गुरूचरणी प्रार्थना.

अवधूत चिंतन श्री गुरुदेवदत्त.

# एक वृत्त

## सुरेश श्री. काळे

दिनांक ५/२/९९ रोजी श्रीवासुदेव निवासमध्ये प. पू. सद्‌गुरू महाराजांच्या वाढदिवसाकरिता साधक–भक्त येण्यास सुरूवात झाली. प. पू. ती.सौ.आईसाहेब यांचे नुकतेच दि.१०/१/९९ रोजी निर्वाण झाले असल्याने प. पू. महाराजांचा ९० वा वर्धापनदिन पुण्यात होणार नाही अशा बातम्या असतानाही प. पू. महाराजांवरील अपार श्रद्धेमुळे त्यांचे दर्शनाकरिता काही निवडक साधकभक्त पुण्यात येतच गेले. ५ तारखेस सायंकाळी मुंबईहून काही साधक आले. दुपारी काही जण आले होतेच हैद्राबादेहून १० साधक भक्त दुपारीच आले होते. प. पू. ती. सौ. आईसाहेबांच्या निर्वाणानंतरच्या धार्मिक कार्यक्रमांमुळे प. पू. महाराजांच्या प्रकृतीवर खूपच ताण पडला होता. तसेच घरातही प. पू. ती. सौ. ताई महाराज व अन्य पण आजारी असल्याने प. पू. महाराजांच्या वर्धापन दिनाचा कोणताही कार्यक्रम घरी करावयाचा नाही व दर्शनाकरीता येऊन प. पू. महाराजांच्या प्रकृतीस त्रास हाईल म्हणून कोणीही येऊ नये असे कळकळीचे आवाहन विश्वस्त मंडळ श्रीवासुदेव निवास व श्री तांबोळी यांनी, संध्याकाळी दर्शनाकरिता गेलेल्या साधकांना केले. त्या दिवशी पण १०२ पर्यंत अंगात ताप होता.

दिनांक ६/२/९९ पहाटे ३.३० पासून साधक उठण्यास सुरूवात झाली. हैद्राबादच्या साधक भगिनींनी आश्रमात झाडलोट करून सडा टाकला व दारासमोर रांगोळी काढली. स्नान करून सर्व भक्तगण ५.३० च्या आधी हॉलमध्ये हजर झाले. मुंबईच्या जेष्ठ सद्‌गुरूभक्त श्रीमती नीलाताई जोशी यांनी 'आपण श्री सदगुरुंची प्रार्थना येथे बसूनसुद्धा अंतःकरणापासून केल्यास त्यांना पोहोचते. श्री दत्त प्रभूंच्या कृपेमुळे व आपल्या प्रार्थनेमुळे प. पू. महारांजांचे प्रकृतीस आराम वाटेल व संध्याकाळी आपणां सर्वांना दर्शनाचा लाभ होईल.' असे सांगितले. आणि त्या प्रमाणे श्री प. पू. महाराजांच्या प्रकृतीस आराम वाटून प. पू. महाराजांनी सर्व भक्तांना सायंकाळी दर्शनाचा लाभ दिला. आपल्या शारीरिक व्याधी दूर ठेवून प्रसन्न मुद्रेने सर्वांना दर्शन झाले व प्रसाद मिळाला.

प. पू. नारायण काका ढेकणे यांनी ५.३० वाजता " दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा " ची धून सुरू केली. ५-३० ते ८.३० पर्यंत ही धून चालू होती.

ह्यामुळे वातावरण मंगलमय झाले होत. ६.०० वाजता प. पू. महाराजांच्या जन्म वेळेस सर्वांनी पुष्पवर्षाव केला व प. पू. नारायण काकांनी ''नाम हेच परब्रह्माचे व्यक्त स्वरूप असून चैतन्य हे अव्यक्त स्वरूप असल्याचे सांगीतले ५.३० ते ९.३० नाश्ता व चहा झाला.

९.३० नंतर प. पू. श्री. हरिभाऊ निटूरकर जोशी - हैद्राबाद - यांचे प्रवचन झाले. त्यानी आपल्या प्रवचना मध्ये ज्ञानेश्वरीतील ' जय जय ओ शुद्धे ' या ओवीवर प. पू. सदगुरू नाथांचे स्तवन आणि वर्णन केले. व आज आपणां सर्वांचे परम भाग्य असून प. पू. महाराजांची कृपा आपणा सर्वांना प्राप्त झाली असल्याचे सांगितले. यानंतर श्रीमती आशाताई धारप, सौ. वसुधाताई जोगळेकर, श्री. प्रभाकर आंबेकर, अंबेजोगाईच्या सौ. सिंधुताई कुलकर्णी, पुण्याचे श्री. वसंतराव नखाते, अकोल्याचे श्री कुलकर्णी, हैद्राबादचे श्री हरिभाऊ निटूरकर, राजापूरचे श्री. शेट्ये, सौ. माधुरीताई पणशीकर व प. पू. श्री शहापूरकर यांनी आपणांस आलेले सद्गुरु कृपेचे दिव्य अनुभव कथन केले. प्रत्येक अनुभवानंतर साधकांनी भक्तिगीतं म्हटली. त्यात हद्राबादचे श्री. सुरेश काळे, श्रीमती पार्वतीबाई कवठाळे, कु. मानसी पणशीकर, श्रीमती बापट, श्री. बोरगांवकर, सौ. रेखाताई यांनी आपली गायनाची सेवा केली. आश्रमातील वेदमूर्ती श्री कोडणीकर यांचे पठण झाले. त्यानंतर महाप्रसादाचा कार्यक्रम झाला. प्रसादानंतर साधकांनी दिवसभर भजने व सतसंगांमध्ये वेळ घालविला. भजनांमध्ये प. पू. योगिराज श्री गुळवणी महाराज यांच्या ज्येष्ठ शिष्या श्रीमती नीलाताई जोशी यांनी प. पू. ती. सौ. आईसाहेब (ती. सौ. लक्ष्मीबाई) यांच्या व प. पू. योगीराज गुळवणी महाराज यांच्या हृद्य आठवणी सांगीतल्या. त्यानंतर सौ. मिराताई लेले, सौ. माधुरी पणशीकर कुमारी मानसी पणशीकर सौ. रेखाताई, श्री. सुरेश काळे व सौ. सुप्रिया काळे यांनी भक्ती रसांनी ओथंबलेली गुरू भक्तीपर भजने म्हटली व रात्रीच्या भोजनानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

दुस-या दिवशी सकाळी ७.०० वाजता सामूहिक साधना झाली. प. पू. नारायणकाका व प. पू. अच्युतराव पोटभरे यांच्या सानीध्यात साधना झाली. त्यानंतर प. पू. श्री. हरिभाऊ निटूरकर यांनी, प. पू. नारायणकाकांची व प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज यांची आरती म्हटली. प. पू. नारायण काकांनी साधकांच्या शंकांचे निरसन केले.

कळावे. ही विज्ञापना.

सद्गुरु कृपाभिलाषी
**सुरेश काळे**
हैद्राबाद

# श्रीदत्तमहाराज कवीश्वर
# थोर वेदांती युगपुरूष

## डॉ. शरदचंद्र कोपर्डेकर

श्रीदत्तमहाराज कवीश्वर विसाव्या शतकातील थोर संत आहेत. भारतातील सर्व पीठांच्या शंकराचार्यांनी त्यांचा वेदान्ती म्हणून गौरव केलेला आहे. पूर्वायुष्यात त्यांनी जवळजवळ सर्व प्रमुख शास्त्रांचे आलोचन केलेले असले तरीही भारतवर्ष त्यांना थोर वेदान्ती म्हणूनच ओळखतो. आपले सर्व आयुष्य त्यांनी वेदान्ताच्या प्रसारातच व्यतीत केले आहे. धर्मजागरणाच्या कार्यासाठीच ते अवतीर्ण झालेले आहेत. ९० व्या वर्षात प्रवेश केल्यानंतर काही दिवसांतच म्हणजे १ मार्च १९९९ रोजी रात्री स्थूल देह ठेवला याची हळहळ वाटते. परंतु सूक्ष्म रूपात ते आहेतच. जसे ज्ञानेश्वर महाराजांचे कार्य अनेक शतके चालू आहे तसेच श्रीदत्तमहाराजांचे धर्मजागरणाचे कार्यही अनेक शतके चालू राहाणार आहे. देहाच्या मर्यादा ओलांडल्यानंतर संतांच्या कार्याला व्यापक स्वरूप येते आणि त्यांच्या कार्याचा विस्तार अधिक मोठ्या प्रमाणावर होत राहातो असे दिसून येते. श्रीदत्तमहाराजांच्या बाबतीतही हेच घडून येईल असा विश्वास वाटतो.

**बाळपणीच सर्वज्ञता। वरी तयाते।**

या ज्ञानदेवांच्या ओवीत सांगितलेल्या कोटीतीत श्रीदत्तमहाराज हे विभूति ब्रह्म आहे. त्यामुळे ज्ञान आपोआपच त्यांच्या बुध्दित उमलत गेलेले दिसते. परंतु श्रीदत्तमहाराज केवळ शब्दज्ञानी कधीच नव्हते. आध्यात्मिक अनूभूतीही आपोआपच त्यांच्या विभूतिमत्त्वामध्ये उमलत आलेल्या दिसतात. वेदांतात सांगितलेल्या सर्व अनुभूती श्रीदत्तमहाराजांनी स्वतः घेतलेल्या असल्यामुळे त्यांच्या शास्त्र विवेचनालाही एक वेगळेच परिमाण लाभलेले दिसते.

श्रीदत्तमहाराज शिक्षण पूर्ण झाल्यावर पुण्याला येऊन स्थाईक झाले आणि त्यांचे दीक्षागुरू योगीराज श्री गुळवणीमहाराज यांच्या प्रभावाचा कालखंड सुरू झाला. श्रीगुळवणी महाराजांच्या कृपेमुळे श्रीदत्तमहाराजांचे आध्यात्मिक जीवन सर्वांगानीं फुलून आले आणि वेदांत प्रसाराच्या कार्याला मोठाच बहर आला. श्रीदत्तमहाराजांच्या विभूदीमत्त्वाचे पैलू श्रीगुळवणी महाराजांनी अचूकपणे पारखले

होते म्हणूनच त्यांनी आपली सर्व शक्ती श्रीदत्तमहाराजांच्या मागे उभी केली आणि श्रीदत्तमहाराजांना सदैव बोलते ठेवले. श्रीगुरूमहाराजांनी आपले सर्वस्व श्रीदत्तमहाराजांना दिले आणि मूकपणे त्यांच्या मागे उभे राहून त्यांच्या शक्ती प्रवाहित केल्या. आपला अधिकार व सामर्थ्य श्रीदत्तमहाराजांच्या मागे उभे करून श्रीगुरुमहाराज अध्यात्म विद्येच्या अमृताचा वर्षाव करीत राहिले आहेत. श्रीज्ञानदेवांना पुढे करून श्रीनिवृत्तिनाथ जगावर अमृताचा वर्षाव करीत आहेत तसेच येथे घडत असलेले दिसते. श्रीगुरूमहाराजांनी श्रीदत्तमहाराजांना आपले उत्तराधिकारी म्हणून नियुक्त केल्यामुळे श्रीगुरूमहाराजांच्या कार्याला मोठाच बहर आलेला दिसतो. श्रीगुरूमहाराज आणि श्रीदत्तमहाराज म्हणजे अद्वैताचे मूर्तिमंत उदाहरण आहे. या गुरुशिष्य जोडीत अद्वैत खऱ्या अर्थाने अर्थपूर्ण झाले आहे. म्हणूनच श्रीगुरूमहाराजांनी सुरू केलेले धर्मजागरणाचे कार्य श्रीदत्तमहाराज एवढे पुढे नेऊ शकले. हे कार्य अनेक शतके असेच प्रकर्षाने होत राहणार आहे. श्रीदत्तमहाराज प्राचीन भारतीय अध्यात्मशास्त्राचे व्युत्पन्न द्रष्टे आहेत. वेद, उपनिषदे,पुराणे त्यांना अवगत आहेत. न्याय, मीमांसाशास्त्र, वेदांत आणि सहा वेदांगे यांचा त्यांनी सखोल अभ्यास केलेला आहे. तत्वज्ञान, मानसशास्त्र, परमानसशास्त्र, गूढानुभव विद्या व मंत्रशास्त्र यांचाही गाढा व्यासंग त्यांनी केलेला आहे. म्हणूनच या सर्व विषयांतील तज्ज्ञ, श्रीदत्तमहाराजांना प्रकांड पंडित किंवा महापंडितच मानतात. ऋतंभरा, प्रज्ञा, सखोल चिंतन, गाढा त्यासंग व प्रतिभेची उत्तुंग झेप यामुळे श्रीदत्तमहाराजांच्या अध्यात्म विवेचनाला उत्तुंगत्त्व प्राप्त झाले आहे.

आपल्या विवेचनातून श्रीदत्तमहाराज प्राचीन भारतीय अध्यात्मशास्त्रातील मंत्र, सूत्रे व मूल्ये यांचेच विवेचन करतात. परंतु हे विवेचन आधुनिक विचार प्रणालीच्या स्वरूपात असते. सोप्या आणि स्पष्ट भाषेत असते. त्यामुळे त्यांचे विवेचन श्रोत्यांना अत्यंत आकर्षक वाटते. कुशाग्र बुध्दी असल्यामुळे श्रीदत्तमहाराज कोणत्याही विषयात अगदी खोलवर, मुळापर्यंत जाऊ शकतात. तर्कशुध्द विचार पद्धती, सखोल चिंतन, स्वानुभव यांचा खंबीर पाया श्रीदत्तमहाराजांच्या अध्यात्म विवेचनाला लाभला आहे. त्यामुळे श्रीदत्तमहाराजांचे अध्यात्म विवेचन आधुनिक काळांतील सुशिक्षित तरुणांनाही मोहून टाकते. त्यांनाही श्रीदत्तमहाराजांचे अध्यात्म विवेचन वस्तुनिष्ठ वाटते, तर्कसंगत वाटते, मूलगामी वाटते.

परमार्थ करण्यासाठी संसार सोडावा लागत नाही किंवा वनात जाऊन राहावे लागत नाही. नगरामध्ये राहात असतानाच आपला आत्मविकास करून घेता येतो आणि अद्वैत अनुभूतीपर्यंत जाता येते. वेदांतात सांगितलेले तत्त्वज्ञान आजही

आपल्या दैनंदिन व्यवहारातही पूर्णपणे आचरणांत आणता येते असे श्रीदत्तमहाराज सांगतात. ते जे काही सांगतात ते त्यांनी आपल्या स्वतःच्या जीवनात पूर्णपणे आचरणांत आणलेले आहे. त्यांची शिकवण स्वानुभवावर आधारलेली आहे आणि म्हणूनच त्यांचे जीवन व त्यांची शिकवण एकरूप आहे.

वैदिक काळात ऋषी स्वतःचे जीवन ज्ञानसाधनेत कसे व्यतीत करीत असतील, त्यांच्या मनांतून ऐहिक कामना पूर्णपणे नाहीशा झाल्यामुळे वेदांतात निवेदन केलेली चिरंतन सत्ये त्यांच्या हृदयात कशा आविर्भूत होत असतील आणि मंत्ररूपाने लोकांपुढे प्रकटत असतील हे श्रीदत्तमहाराजांचे जीवन पाहून समजून येते. वैदिक संस्कृती कशी असेल आणि वैदिक ऋषींच्या आश्रमांतील सांस्कृतिक वातावरण कसे असेल हे रेणुका निवास या श्रीदत्तमहाराजांच्या निवासस्थानी प्रवेश केल्यावर प्रत्यक्ष पहायला मिळते.

✤ ✤

---

**श्रीदत्तमहाराज यांचे जीवन दर्शन**
**खालील ओवीत मिळते.**

**पूज्यता डोळा न देखावी ।**
**स्वकीर्ति कानी नायकावी ।**
**हा अमुका ऐसी नोहावी ।**
**से चि लोकां ॥१३.१८८॥**

**वाचस्पतीचेन्ति पाडे ।**
**सर्वज्ञता तरी जोडे ।**
**परिं वेडिवे माजि दडे ।**
**महिमे भेणे ॥१३.१९०॥**

हे अमानित्व पू. श्रीदत्तमहाराजांच्या जीवनातील प्रत्येक क्षणी प्रत्येकास त्यांच्या सत्संगातून स्पष्ट अनुभवता आले आहे.

॥ श्री दत्त प्रसन्न ॥

कवीश्वर गुरून्वन्दे दत्तात्रेयाभिधा परान् ।
येषां कटाक्ष पातेन कृतार्थो जायते नरः ।

# मूर्तिमन्त भागवतादर्श

## डॉ. रा. ल. जोशी

प्रातःस्मरणीय परमश्रद्धेय कृपाकटाक्षमात्र – भक्तजनोध्दार – समर्थ पूजनीय श्रीदत्तमहाराज यांच्या अन्तरंग सागरात उतरावयाचे झाल्यास एकाच शिडीचा उपयोग होऊ शकेल. ती शिडी म्हणजे श्रीमद्भागवत. या शिडीचा उपयोग करून महाराजांच्या अन्तरंगभावांचा कार्यकारण भावाधिष्ठत शोध घेतल्यास सदाचाररत्नांचा बोध झाल्याशिवाय राहणार नाही. अन्य शिड्यांचा उपयोग करून या अथांग सागरात प्रवेश केल्यास शंखशिंपले याशिवाय दुसरे काय हाती लागणार ?

पूज्य ब्रह्मर्षी श्रीदत्तमहाराजांनी वयाच्या सोळाव्या वर्षी परमसद्गुरु श्रीनृसिंहसरस्वती श्री दीक्षित स्वामीमहाराज यांच्या उपस्थितीत श्रीमद्भागवत सप्ताह संपन्न केला. त्यानंतर अव्याहतपणे सुमारे सत्तर वर्षे श्रीमद्भागवताचा व्यासंग केल्यामुळे त्यांचे संपूर्ण जीवन भागवतमय झाले असल्यास आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. अर्थात दीर्घकाल भागवत सांगितल्यावरही अशी वृत्ति निर्माण होत नसल्याची उदाहरणे कमी नाहीत. परंतु त्याचा विचार करणे हे श्रीमद्भागवताच्या सिध्दान्ताच्या व पूजनीय श्रीदत्तमहाराजांच्या वृत्तिविशेषाच्या विरुध्द असल्याने ते टाळणेच अधिक योग्य होय.

श्रीमद्भागवताच्या शिडीचा आधार घेऊन पूज्य श्रीदत्तमहाराजांच्या अन्तरंगसागरात उत्तरल्यावर अनुभवाला येणाऱ्या गुणविशेषांचे भागवत– कथाकार सूतांच्याच शब्दांत सांगावयाचे झाल्यास, ‘‘यथाधीतं यथामति ’’ विवेचन क्रमशः करू.

पूज्य श्रीदत्तमहाराजांनी कोणालाही एकेरी हाक मारल्याचे गेल्या पन्नास वर्षात मी कधी ऐकले नाही. नातू, नाती यानाही ते अहो म्हणतानाच कोणालाही ऐकावयास मिळायचे. यामागची भूमिका एकाच भागवत सिध्दांतावर आधारलेली आहे तो म्हणजे ‘‘ यत्किंच भूतं प्रणमेदनन्यः ’’ याचा मराठी स्वैर अनुवाद – ‘‘ जे जे भेटे भूत ।ते ते मानिजे भगवंत’’ या शब्दात संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांनी केला

आहे. आपली योग्यता; दुसऱ्याची योग्यता किती, त्याला अभिवादन आपण करावे का न करावे याचा विचार त्यांना कधीही शिवलाच नाही.

श्रीमद्भागवतात एक प्रसंग असा आला आहे की, श्रीपरशुरामांनी कार्तवीर्यार्जुनाचा वध केला व आपल्या पराक्रमाचे निवेदन पिताश्री जमदग्नींना केले. त्यावेळी जमदग्नींनी उग्दार काढले –

**" राम राम महाबाहो भवान् पापमकारणीत् ।**
**अवधीन्नरदेवं यत् सर्वदेवमयं वृथा ।**
**वयं हि ब्राह्मणास्तात क्षमयाऽर्हणतां गताः ।**

( हे महापराक्रमी परशुरामा, तू फार मोठे पाप केले आहेस. कारण सर्व देवस्वरूप असलेल्या राजाला तू कारण नसताना ठार मारलेस. बाबारे ! आपण ब्राह्मण क्षमा या गुणामुळेच पूजनीय बनलो आहोत.) अशा सारख्या प्रसंगामुळे क्षमा गुणाची परमावधी परमपूजनीय श्रीदत्तमहाराजांच्या ठिकाणी दिसून येते. अकारण द्वेष–शत्रुत्व करणाऱ्यांविषयीसुध्दा क्षमाभाव धारण केल्याची अनेक उदाहरणे त्यांच्या जीवनात घडलेली आहेत. 'शत्रुबुध्दि विनाशाय ' याचा अर्थ सांगावा तर महाराजांनीच ! " शत्रूची बुध्दी नाहीशी व्हावी" असा स्वाभाविक वाटणारा अर्थ न करता "शत्रू अशी बुध्दी वा भावना नाहीशी होण्यासाठी " असा अर्थ सहजपणे महाराज बोलून जात. षष्ठी तत्पुरुष समास न करता कर्मधारय समास करावा ! या क्षमा गुणाच्या पराकाष्ठेमुळेच महाराजांच्या ठिकाणी अत्यंत वैशिष्ट्य पूर्ण रीतीने तळपणारा प्रसन्नतेचा प्रशान्ततेचा गुण होय. या गुणामुळेच पूजनीय महाराजांची गणना महापुरुषांमध्ये करावीच लागेल. हे विधानही श्रीमद्भागवताच्याच आधारे करणे योग्य आहे. 'महान्तस्ते समचिन्ताः प्रशान्तः'। (ज्यांच्या चित्तात कमालीची शान्तता असून ज्यांच्या मनाला ऐश्वर्याच्या किंवा विपन्नतेच्या काळात सुखदुःखांच्या लाटांनी स्पर्श केलेला नसतो त्यांनाच महापुरुष म्हणावे.) हे महापुरुषांचे भागवत प्रतिपादित लक्षण पूज्य श्रीदत्तमहाराजांना सर्वांशाने लागू पडते. महापुरुषांची लक्षणे वाचून ती आपल्या अंगी उतरवण्याचा प्रयत्न करून लोक महापुरुष बनतात, की महापुरुषांना पाहून त्यांचे स्वभावविशेष ग्रंथात निविष्ट केले जातात असा प्रश्न उत्पन्न होणे शक्य आहे. दोन्ही विकल्प संभवतात. सतत भागवत चिंतनाने समचित्तत्व व प्रशान्तत्व त्यांच्या ठिकाणी येणे हे जितके स्वाभाविक तितकेच जन्मतःच हे गुण महाराजांच्या ठिकाणी होते या विषयीही तिळमात्र शंका नाही.

महापुरुषाची एक व्याख्या श्रीमद्भागवतात सूचित केली आहे असे वाटते. भगवान् गोपाळकृष्णां च्या 'सुधर्मा' या राजसभेचा उल्लेख करताना ' यत्र प्रविष्टानां न सन्त्यङ्ग षड्र्मयः' (जिथे प्रवेश केला असता मनुष्याच्या ठिकाणी कामक्रोधादि

सहा विकार रहात नाहीत) असे म्हटले आहे. पूज्य श्रीदत्तमहाराजांच्या सान्निध्यात सर्व विकार नाहीसे होऊन मनाला एक प्रकारची शान्ती प्राप्त होत असे. हेच सत्पुरूष किंवा महापुरुष ओळखण्याचे चिन्ह होय. याच कारणामुळे किंवा गुणविशेषामुळे महाराजांच्या सांनिध्यात राहण्यासाठी, त्यांचा कृपाकटाक्ष अनुभविण्यासाठी डॉक्टर, इंजिनियर, उद्योगपती बाल, तरुण, वृद्ध–सर्व क्षेत्रांतील, सर्व वयोगटांतील लोक अत्यंत उत्सुक असत.

पूज्य श्रीदत्तमहाराजांचा उपदेश करण्याचा प्रकार वेगळाच असे. 'तुम्ही अमुक एक करा' अशा शब्दात तो उपदेश कधी नसे. 'यास्तेषां स्वैरकथास्तान्येव भवन्ति शास्त्राणि' (त्यांच्या स्वच्छंद बोलांनाच शास्त्राचे स्वरूप प्राप्त होते) गायत्री अनुष्ठानाचे महत्त्व विशद करताना ते म्हणत "गायत्री पुरश्चरण तसे अवघड नाही; रोज चोविसशे जप केला म्हणजे एक हजार दिवसात पुरश्चरण होते !" हे म्हणताना त्यांच्या स्मितहास्यपूर्वक विशिष्ट ध्वनीचा अर्थ लक्षात आल्याशिवाय रहात नसे. वेळ नाही म्हणणाऱ्यांना 'सवड काढता येते' असे म्हणत. तुम्ही सवड काढा असे कधीही म्हणत नसत. त्यांच्या संकल्पातच असे सामर्थ्य होते की आपले संशय नाहीसे होऊन आपले कार्य पूर्ण होईल असा विश्वास आपल्याला वाटू लागतो.

श्रीमद्भागवतातील 'गुणदोषद्दशिर्दोषः' (गुणदोषांचा विचार करणे हाच दोष) हा अतिपराकोटीचा सूक्ष्म सिद्धान्त 'नाहं निन्दे न च स्तौमि स्वभावविषमं जनम्' (प्रकृति भेदाप्रमाणे विभिन्न बनलेल्या व्यक्तींपैकी कोणाची निन्दा किंवा स्तुति मी करीत नाही) हा आजगर मुनींच्या आपल्या आत्मानंदाचे कारण विशद करणारा सिद्धान्त 'विष्णोर्मायामिदं पश्यन्' (ही सर्व भगवंताची माया आहे) ही दुर्योधनाने अपमान केला असता विदुराने समाधान धारण केलेली वृत्ति 'मनसो वृत्तया नः स्युः कृष्ण पादाम्बुजाश्रिताः' ही नन्दादि गोपांची प्रार्थना, याचा मूर्तिमंत आविष्कार म्हणजेच पूज्यतम श्रीदत्तमहाराज होत. थोडक्यात श्रीमहाराज म्हणजे साक्षात् भागवतादर्श.

ब्रह्मभूत पूजनीय श्रीदत्तमहाराजांचा अंतकाल पाहिला म्हणजे त्यांच्या योगसाधनेची कल्पना येऊ शकते. परीक्षिताच्या अन्तकालाचे वर्णन वाचले असता महाराजांच्या अन्तकालाचा उलगडा होतो. परमभगवद्भक्त, गुरुभक्त, स्निग्ध शिष्योत्तम, राजा परीक्षित मृत्युकाल अगदी नजिक आला असता सर्वार्थाने आपली कृतज्ञता व्यक्त करून म्हणतो, "वाचं यछाम्यधोक्षने" "अनुजानीहि मां ब्रह्मन्" (मी माझी वाणी भगवान कृष्णांच्या ठिकाणीच नियंत्रित करतो; ब्रह्मर्षि शुक देवा, मला परवानगी द्या.) बोलायचे किंवा ऐकायचे म्हणजे देहभान आवश्यक आहे. 'अहं' आणि 'मम' असा अभिमान असल्याशिवाय बोलण्या–ऐकण्यासारखे

देहव्यवहार संभवत नाहीत. (अहं ममाभिमान रहितस्य प्रमाण प्रवृत्त्यनुमपत्तेः। ध्या भाष्य; शंकराचार्य) शिवाय देहभान म्हणजेच अहंममाभिमान असेतोपर्यंत कोणी ब्रह्मस्वरूप होऊ शकत नाही म्हणून योग्याला अंतकाली ब्रह्मभाव प्राप्त होण्यासाठी देहभान सोडावे लागते. देहभाव सोडण्यासाठी सर्व इंद्रियांचे व्यापार थांबले पाहिजेत–नव्हे ते व्यापार बंदच होत असतात. त्या प्रक्रियेला अनुसरून पूज्य श्रीदत्तमहाराजांनी सर्व इंद्रिय–व्यापार हळूहळू पूर्ण बंद करण्यास प्रारंभ केला होता. मौन धारण केले होते. आमच्या दृष्टीने पूज्य महाराजांनी संपूर्ण आयुष्यात हीच एक आमच्याशी न बोलण्याची कठोरवृत्ति धारण केली होती. तिचे आध्यात्मिक कारण समजल्यावरच मनाचे समाधान होते व महाराजांची योगसाधनाक्षेत्रातील योग्यता कळून येते.

आमच्या हृदयाच्या कोंदणातून कधीही दूर होऊ न शकणाऱ्या ब्रह्मभूत श्रीदत्तमहाराजांना विनम्र भावाने अर्पण केलेली ही श्रद्धांजली. त्यांनी आचरण केलेल्या सत्पथाचे अंशतः जरी आपण अनुकरण केले तर तीच त्यांना वाहिलेली खरी श्रद्धांजली ठरणार आहे.

## श्रीदत्तमहाराज जीवन दर्शन

आता निर्वाळुनी कनके । भरला गांगे पीयुखे
तया कलशाचिया सारिखे । शौच असे ॥१६.१९७॥

का फेडित पाप ताप । पोखीत तीरीचे पादप ।
समुद्रा जाय आप । गंगेचे जैसे ॥१९९॥

तैसी बांधली सोडीत । बूडाली काढीत ।
साकडी फेडीत । आर्ताचिया ॥२०१॥

किंबहुना दिवस राती । पुढीलांचे सुख उन्नती ।
आणित आणित स्वार्थी । प्रवेशिजे ॥२०२॥

– ज्ञानेश्वरी

# श्री दत्त कवीश्वर महाराजांचे अष्टक

## ( वृत्त - शार्दूला विक्रीडित)

हरिभाऊ जोशी, निटूरकर

ज्यांचे दर्शन सौख्य दे सकळिका, भक्तास आनन्दवी
ज्यांचे मंगल नाम नित्य जपता सायुज्यता भोगवी
ज्याचे पावन पादयुग्म भजता पापास हो बोहरी
श्रीमद्दत्त कवीश्वरांघ्रियुगुला भावे स्मरा अंतरी ॥१॥

'सप्तर्षी' कुल पुण्यपावन यजुःशाखीय माध्यंदिनी
गोत्री त्या उपमन्युच्या प्रकटले 'श्री धुंडिराजे' मुनी
त्यांच्या थोर तप-प्रभाव सुफळे आले त्रिमूर्ती घरी
श्रीमद्दत्त कवीश्वरांघ्रियुगुला भावे स्मरा अंतरी ॥२॥

नाही ज्या अघ त्यास माघ म्हणती, षष्ठी तिथी वद्य ती
बुद्धीचा बुधवार सूर्य उदयी आनंदली ही क्षिती
आले दत्तप्रभू पुनश्च जगती त्या सौम्य संवत्सरी
श्रीमद्दत्त कवीश्वरांघ्रियुगुला भावे स्मरा अंतरी ॥३॥

बाल्यत्वी घडला सुसंग बरवा टेंबे यतींचा जया
स्वामी दीक्षित सद्गुरू करविती प्रारम्भ भक्ती तया
योगीराज पदारविन्द युगली सर्वस्व सेवा करी
श्रीमद्दत्त कवीश्वरांघ्रियुगला भावे स्मरा अंतरी ॥४॥

विद्यावंत सभेत श्रेष्ठ गणता, 'वाचस्पती' शोभला
राज्ञे गौरविला, बुधे विनविला, श्रीशंकरे पूजिला
तो श्रीदत्त जगी पहा विलसला, मार्तंड जै अम्बरी
श्रीमद्दत्त कवीश्वरांघ्रियुगला भावे स्मरा अंतरी ॥५॥

वाणीचे मधुरत्व अमृत झरे, शांती कदा ना ढळे
साही शत्रु जिथे कदा न वसती, अद्वैत ते पाजळे
धर्माचा ध्वज उंचवी दूहजनी, कल्याण विश्वा करी
श्रीमद्दत्त कवीश्वरांघ्रियुगला भावे स्मरा अतंरी ॥६॥

धर्माचा क्षय होत पाहुन जगी, रक्षावया धर्म हा
श्रीमत्सद्गुरु दत्तराज भगवन्, तो राजयोगी महा
दीक्षा देवुन जागवी बहुजना, भक्तास जो उध्दरी
श्रीमद्दत्त कवीश्वरांघ्रियुगला भावे स्मरा अंतरी ॥७॥

सद्भावे रतले पदास गुरुच्या, ते मान्य सर्वेश्वरी
यावज्जीव सुखे वसोन जगती सायुज्य ठेवा करी
या लागी गुरुच्या पदास रत व्हा, प्रार्थीतसे हा हरी
श्रीमद्दत्त कवीश्वरांघ्रियुगला भावे स्मरा अंतरी ॥८॥

२/१७/११९, एस्. बी. एच्. कॉलोनी
उप्पल, हैदराबाद - ५०० ०३९
(फोन : ०४० - ७१७४१२४)

चित्ताच्या शांत अवस्थेत - मन स्थिर झाल्यावर.
आत्मानंद प्रभावित होतो.
प्रतिबिंबित होतो.
बाह्य साधनांनी मिळणारा आनंद न टिकणारा
असतो. म्हणून खरा, टिकणारा, आत्मानंद
आतच आहे.

— श्री दत्तमहाराज

# प. पू. दत्त महाराज कवीश्वर यांचे १ मार्च १९९९ रोजी देहावसान झाल्याचे वृत्त ऐकून आश्रमात विविध संस्थाचेकडून आलेल्या पत्रावरून गोषवारा खालील प्रमाणे :

(१) वेदाचार्य घैसास गुरुजी, वेदपाठशाळा वेदभुवन, पौड रस्ता, कोथरूड पुणे २९. फोन ३३२५६८ श्री मोरेश्वर विनायक घैसास प्र. विश्वस्त दि.१६/३/९९ भारतातील प्राचीन शास्त्र परंपरेतील महान विद्वान , या संस्थेचे प्रधान विश्वस्त श्रीदत्तमहाराज यांचे वृध्दपकाळामुळे दुःखद निधन झाले. भारतातील शास्त्र परंपरेतील उच्च स्थानावरील एक तपस्वी तारा निखळला. वेदाचार्य घैसास गुरुजी यांचे कार्यास त्यांचे बहुमोल्य सहकार्य होते. त्यांच्या अमोल सहकार्यामुळेच वेद पाठशाळेतून वे. मू. कृष्णाजी आर्वी व वे. मू. राजारामपंत कुलकर्णी हे वेद पाठशाळेमध्ये अध्ययन पूर्ण करू शकले. प. पू. महाराज यांच्या आत्म्यास शांती लाभो अशी ईश्वर चरणी प्रार्थना.

(२) **श्रीसद्गुरु सेवा प्रतिष्ठान, फलटण. दि.११/३/९९**

श्री. प्र. ना. दीक्षीत अध्यक्ष यानी थोर तपस्वी ज्ञानमहर्षी दत्तभक्त ब्रह्मश्री श्री दत्तमहाराज कवीश्वर यांचे निधनाने आश्रमाचेच नव्हे तर महाराष्ट्रातील सर्व धार्मिक संस्था पोरक्या झालेल्या आहेत. इति शम्.

(३) **देवात्म शक्ती सोसायटी** - नवाली दहीसर व्हाया मुंब्रा जि. ठाणे स्वामी नित्य बोधानंद तीर्थ यांचेकडून : प. पू. श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांच्या दुःखद परलोक गमनाची वार्ता समजली. श्रीदत्तमहाराज एक महान जीवनमुक्त संत महात्मे होते. अध्यात्म मार्गातील सर्वाचीच कधीही भरून न येणारी हानी झालेली आहे. आपण सर्वांनी धैर्य ठेवून त्यांच्या आदर्श जीवनाचा अंगीकार करावयाचा आहे. कार्य महान असून त्यासाठी श्रीसद्गुरु महाराजांचे शक्तीचीच आराधना करावयाची आहे. प. पू. श्री १००८ सद्गुरु महाराज पुढील कार्यासाठी प्रेरणा व मार्गदर्शन करतील यात शंका नाही. असो.

(४) **महायोग मंडळ** - मुंबईमधील साधकाचे, द्वारा गोगटे, ६९ इस्माईल बिल्डिंग दादर, मुंबई १४ दि. ७/३/९९:

आपल्या सर्वाचे भक्तवत्सल, भक्तभिमानी, राष्ट्रीय पंडित ब्रह्मश्री दत्तात्रेयशास्त्री कवीश्वर महाराज ९० वे वर्षी सोमवारी १-३-९९ श्री दत्तचरणी ब्रह्मलीन झाले. आपल्या सर्वांना कुंडलिनी शक्तीच्या हातात सुपूर्त करुन शिवस्व रूपात विलीन झाले. त्यांच्या चिर वियोगाचा हा दुखःद प्रसंग समोर असला तरी त्यानी दिलेल्या उपदेशास

आपल्या जीवनास प्राधान्य द्यावे लागेल. प. पू. गुळवणी महाराजांचे कार्य पुढे चालवले. श्रीवासुदेव निवास कार्य पूर्ववत चालवले पाहिजे. उदात भावनेने हे कार्य सर्व गुरुबन्धू करतीलच असा विश्वास आहे.

७ मार्च ९९ रोजी सायं. ५ वा. महायोग मंडळात डॉ. केशवराव रामचंद्र जोशी यांच्या उपस्थित शोकसभा घेण्यात आली. त्यांना उत्तम गती मिळो ही श्रीचरणी प्रार्थना. श्री. गोगटे, केशवराव जोशी आणि अनेक भक्त मंडळींनी भाग घेतला.

५) **साधक संगम**, श्रीकृष्णा सदन कंपाउंड पी. बी. रोड, धारवाड श्री. यादी यांचेकडून सर्व साधकांची बैठक घेऊन श्रीकवीश्वर यांना श्रध्दांजली देण्यात आली. भारतीय सस्कृंतीतल्या उच्च परंपरेतील महान विभूतीला आपण मुकलो व पारखे झालो आहोत.

६) श्री. अनिल नारायण पुजारी सांगली काव्यात्मक आरती रुपात श्रध्दांजली.

श्री पू. गुळवणीमहाराज अनिष्ठान सांगली

ब्रह्मश्री प. पू. श्री. दत्तमहाराज कवीश्वर शास्त्री श्रीदत्तप्रभूचरणी लीन झाल्याचे वर्तमान ऐकून श्री प. पू. गुळवणी महाराज प्रतिष्ठान सांगली मधील सर्व साधक, भक्त, हितचिंतक मंडळी, कवीश्वर परिवारांतील मंडळीमध्ये समवेदनेने सहभागी आहोत.

आम्ही सर्व बंधू-भगिनी त्यांच्या पवित्र, मंगल चरणी ही भावनोत्कट श्रध्दांजली अर्पण करितो.

ता. २ मार्च ९९ कार्यकारी मंडळ

श्री प. पू. गुळवणी महाराज प्रतिष्ठान सांगली

---

॥ श्री ॥

प. पू. दत्तमहाराज कवीश्वर यांचेच अनुग्रहीत शिष्य व १९७७ ते १९८३ या कालावधीत श्री वासुदेव निवास येथे श्री वे. भू प्रभाकर द. कोडणीकर यांचेकडे वेदाभ्यास करून १९८५ पासून आमचे प. पू. गुळवणी महाराज प्रतिष्ठान सांगली येथे सेवारत असलेले श्री. अनिल नारायण पुजारी यांनी प. पू. दत्तमहाराजांचे निर्वाण समयी केलेली ही एक आरती स्वरूप श्रध्दांजली.

## ॥ जयदेवा गुरुवरा ॥

जयदेवा गुरुवरा सद्गुरु दत्त कवीश्वरां
नित्यनेमे नमितो ध्यातो निज सर्वेश्वरां ॥ध्रु.॥
वैदिक शास्त्री पंडित होऊनी ज्ञानदीप उजळिला
विद्यावाचस्पती-ब्रह्मश्री महामहोपाध्याय झाला

श्रीमद्‌भागवत पुराण कथुनी मान्य सुरवरां
जीर्णोध्दारे संतुष्टविले प्रभू अमरेश्वरां ।।१।। जयदेवा ।।
दीक्षित स्वामी गुरु वरुनी योगिराज झालां
योगसाधनानुष्ठानें करुनी देहही झिजविला
वामनगुरुंचे शिष्य उत्तर अधिकारी झालां
अनेक शिष्या-गुरु होऊनी कृतार्थही झालां ।।२।। जयदेवा. ।।
वासुदेव निवासी येउनी भक्तीमार्ग दाविला
वासुदेव ग्रंथ प्रकाशने ज्ञानमार्ग उजळिला
शिष्या भक्तां ज्ञान देऊनी मोक्षगुरु झाला
इतुके स्मरुनी आरती करितो गुरु माऊलीला ।।३।। जयदेवा.।।

**रचना - श्री. अनिल नारायण पुजारी**
**सांगली**

७) **श्री गणेश वेद पाठशाला,**
मु. पो. देवरुख ता. संगमेश्वर जि. रत्नागिरी
(महा)-संस्थेतर्फे श्रध्दांजली. (अध्यक्ष भोपटकर).

८) श्री दत्त संस्था गरुडेश्वर व्हाया राजपिंपाळा- ३९३१५१
श्री. देव मॅने. ट्रस्टी, गरुडेश्वर यांचेकडून ५-३-९९.

श्री दत्तमहाराज यांना मृत्यू तर नाहीच परंतु त्यांनी पार्थिकदेह स्वतःच गुरुचरणी अर्पण करून सूक्ष्मदेही भक्तांना सदैव आशिर्वाद व कृपा करण्यासाठी पुन्हा अवतार घेतील असे म्हणता येईल. त्यांच्यासारख्या भोर त्रिभूतीचा संस्थेचा आधारस्तंभ हरपला.

९) धर्मभास्कर मासिक १ मे ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर विशेषांक प्रसिध्द करणार आहेत. धर्मभास्करचा चालू महिन्यातील अंकात सौ. लक्ष्मीबाई कवीश्वर यांचेवरील लेख प्रसिध्द केला आहे. श्रध्दांजली.

१०) सिध्द योग साधक मंडळ, बडोदा साधकवर्ग

सोमवारी १ मार्च ९९ रोजी प. पू. दत्तमहाराजांनी वयाच्या ९१ व्या वर्षी स्थूळ शरीराचा त्याग करून लीला आवरून घेतली. शिवस्वरूप सदगुरु सौ. लक्ष्मीबाई कैलासवासी झाल्यावर जणू काय त्या सहधर्म चारिणीने स्वतःचे पतीला आपल्याकडे बोलावून घेतले व ५० दिवसात दत्तमहाराजांनी कैलासगमन केले. आपल्या सर्वांचे सदगुरु गुळवणी महाराजांच्या सूक्ष्म रूपाने व ते स्वतः आपल्याजवळ राहून मार्गदर्शन करीत असावे हीच ईश्वरचरणी प्रार्थना. जयतु जयतु दत्तः सर्व शास्त्राधिकारी।। जयतु जयतु दत्तः शक्ती पाताधिकारी ।। जयतु जयतु दत्तो नाव

तायाः सुमूर्ति । जयतु जयतु रनो देह भृत श्रीशदनः' ॥ अरुणोदय जानी, शहापूरकर, अरगडे, पडेगावकर, वाळावडकर इ. अनेक प्रतिनिधींकडून

११) **श्री दत्तोपासक व त्रिपदी मंडळ,** कारंजाचौक, बुलढाणा

प. पू. दत्तमहाराजांना गुरुवारी ११/३/९९ सायंकाळी दत्त संप्रदाय व त्रिपदी मंडळातर्फे श्रध्दांजली समर्पित केली. श्री. बाळा साहेब कुलकर्णी, श्री. अन्वेकर, सखाराम जोशी, श्रीकांत जोशी , श्री. सौ. कस्तुरे, विवेक घाडे इ. भावपूर्ण श्रध्दांजली. बहुसंख्येने लोक उपस्थित होते.

त्रिपदी महिला मंडळाचे सौ. उषाताई कुलकर्णी, सौ. नंदाताई सराफ, श्रीमती शीलाताई कुलकर्णी इत्यादींनी सदगुरु गीतगायनाने सभेची सांगता केली.

१२) प. पू. श्री लोकनाथ तीर्थ स्वामी महाराज महायोग ट्रस्ट, जळगाव ४२५००१.

श्री. ना. राव अध्यक्ष दि. १५/३/९९.

जळगाव शहरातील व जिल्ह्यातील साधकांतर्फे भावपूर्ण श्रध्दांजली देण्यात आली.

✤ ✤

**करणे का न करणे । हे आघवे तोचि जाणे**

**असे ज्ञानराज म्हणतात कारण कोणते कर्म करावे आणि कोणते कर्म करू नये हे आपल्याला समजत नाही. त्याचे ज्ञान फक्त परमात्म्याला आहे. तो ज्ञानसंपन्न - सच्चिदानंद घन आहे.**

**मूळ विचार असा आहे की कर्तृत्त्व माझे नाही. त्याच्या कर्तृत्त्वाने सर्व काही हाते.**

**– श्रीदत्त महाराज**

# सदा संतापासी जावे

## श्री. नारायणराव दाते

प. पू. श्रीमहाराजांचे महानिर्याण वयाच्या ९० व्या वर्षी १ मार्च १९९९या दिवशी झाले. 'आचारः प्रथमो धर्मः ।' या तत्त्वाला त्यांच्या जीवनात अनन्यसाधारण महत्व होते; मग ते नित्यकर्म असो अगर नैमित्तिक असो ! श्री महाराजांच्या जीवनातील अनेक लहानमोठ्या प्रसंगांमध्ये आपल्याला आचारधर्माबरोबरच साधेपणा, अमानित्व, लीनता, स्थितप्रज्ञता, प्रसिध्दीपराङ्मुखता, वक्तृत्व हे गुण प्रकर्षाने अनुभवण्यास मिळतात.

**कमालीचा साधेपणा :** प. पू. श्रीदत्तमहाराजांनी आपल्या शरीराची वाजवीपेक्षा जास्त काळजी कधीही घेतली नाही. शनिवार पेठेतील वर्तक वाड्यातील आपल्या घरापासून श्री वासुदेव निवासापर्यंत भरदुपारी ते अनवाणी येत असत; अंगावर देखील धोतर आणि उपरणे एवढीच वस्त्रे असत. आश्रमात दुपारी विश्रांती घेताना देखील नेहेमीचे उपरणे पांघरूण आपल्या बैठकीच्या लहानशा गादीवर अंग दुमडून झोपत असत. पावसाळा असो, उन्हाळा असो, अथवा हिवाळा, त्यांचा पोषाख ठरलेला-धोतर आणि उपरणे !

कुठेही परगावी जायचे असो, त्यांचे सामान अत्यंत आटोपशीर असे. हातात एक लहानशी पिशवी व बोचक्यासारखी लहानशी वळकटी ! त्यामध्ये एखादी दुसरी शाल, नित्य लागणारी वस्त्रे व उपकरणे एवढेच सामान असे. त्यांच्या या कमालीच्या साधेपणामुळे लोक त्यांना एक सामान्य याज्ञिकी करणारा ब्राह्मण असे समजत असत.

**अमानित्व** - अंदाजे १९७८ सालाचा हा प्रसंग. आश्रमात शिकवण्यासाठी दोन तीन विद्यार्थी होते. प. पू. श्रीदत्तमहाराज रोज भोजन आटोपून साधारण एकच्या सुमारास त्यांच्या राहत्या घरातून आश्रमात विश्रांतीसाठी येत असत श्रीमहाराज वरच्या खोलीत बसत. त्या दिवशी महाराजांचा एक साधक दुपारी दोनच्या सुमारास आश्रमांत आला. त्याला श्रीमहाराजांच्या पत्रदीक्षा झालेली होती. तो सरळ जिना चढून वरती गेला. त्याने सरळ प. पू. श्रीदत्तमहाराजांनाच विचारले, "दत्तमहाराज कुठे आहेत ?" प. पू. दत्तमहाराजांनी त्या गृहस्थाचे नांव, गांव, विचारले, व भोजन झालेले आहे का? नसल्यास खाली जाऊन भोजन करा असे सांगितले. ते गृहस्थ खाली आले, पण खाली कुणीच न दिसल्याने ते पुन्हा वरती आले व त्यांनी श्रीमहाराजांना सांगितले, " खाली कुणी नाही. " श्रीमहाराज

म्हणाले, '' चला, मी आलो .'' असे म्हणून उपरणे सावरून खाली आले. पाट मांडून तांब्याभांडे ठेवले व शर्ट काढून त्यांना पाटावर बसण्यास सांगितले. आपण स्वतःच त्यांना वाढण्यास सुरूवात केली. ओट्यावरील भांड्यांचा आवाज ऐकून, तळघरातून श्री. कृष्णा आर्वीवर बाहेर आले. त्याने पाहिले तर प्रत्यक्ष श्रीमहाराजच त्या गृहस्थांना वाढत आहेत. विद्यार्थी कृष्णा आर्वीकर पुढे आला व त्याने श्रीमहाराजांना सांगितले - '' मी वाढतो, आपण बसा.'' हे सगळे भोजन करणाऱ्या त्या गृहस्थाने पाहिले. त्याने कृष्णा आर्वीकरला विचारले, '' हे कोण आहेत? '' श्री कृष्णाने, '' हे श्रीदत्तमहाराज आहेत,'' असे सांगताच, ते गृहस्थ अवाक् झाले. त्या गृहस्थांनी काही म्हणण्या आधीच श्रीमहाराज आपल्या खोलीत गेले देखील ! केवढे हे अमानित्व !

प. पू. श्रीदत्तमहाराज जेव्हा जेव्हा वाडीला जात, तेव्हा तेव्हा औरवाडला आवर्जून जात असत. त्या ठिकाणी प. प. श्रीदीक्षितस्वामींच्या शिष्या गं. भा. यमुताई राहात असत. प. पू. श्रीमहाराज त्यांना भेटून त्यांची मोठ्या आस्थेने विचारपूस करीत; त्यांनी वाढलेल्या कण्या मोठ्या प्रेमाने मनापासून खात असत.

१९८० साल श्रीदत्तमहाराजांच्या अमृतमहोत्सवाचा दुसरा दिवस. महाप्रसादाकरिता श्रीवासुदेव निवासात बरीच गर्दी झाली होती. लोक पाने धरण्यासाठी गडबड करीत होती. एका पंक्तीत दोन चार पाने शिल्लक होती;त्यातील एका पानावर श्रीदत्तमहाराज येऊन बसलेदेखील ! एका सामान्य भक्ताप्रमाणे सामान्यांच्या पंक्तीत बसलेले श्रीदत्तमहाराज, आपल्या कृतीने बरेच काही सांगून गेले. सांगता समारंभामध्ये मोठे हार घालून ज्यांच्या सत्कार केला, ज्यांना लाखाचा निधी दिला, ज्यांचा गुणगौरव केला अशी महान व्यक्ती आपल्या पंक्तीत बसलेली आहे, हे कित्येकांना कळलेदेखील नाही; त्यामुळे प. पू. श्रीमहाराजांचे भोजन होण्याआधीच काही मंडळी हात धुण्यासाठी उठली देखील ! स्वतःचे मोठेपण झाकून घेण्याची केवढी ही कुशलता, खबरदारी !

याच पद्धतीने दीक्षा देताना देखील श्रीदत्तमहाराज वागत असत. त्यांनी कुणालाही कधीही असे सांगितले नाही, की मी तुम्हाला दीक्षा देतो. दीक्षा पत्राद्वारे असो किंवा प्रत्यक्ष असो, ते सांगत – '' श्री महाराजांच्या (प. पू. श्रीगुळवणी महाराज) फोटोला हार घाला. फोटोपुढे नारळ ठेवा, पेढे ठेवा आणि श्रीमहाराजांना प्रार्थना करा की, माझ्यावर अनुग्रहाची कृपा करा. श्रीमहाराज तुमच्यावर कृपा करतील. नंतर तो नारळ फोडून घरच्या सर्वांनी खावा.'' याप्रमाणे दीक्षा झाल्यानंतर साधक जेव्हा प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या दर्शनास जात आणि सांगत – ''महाराज, खाण्यापिण्याचे नियम (कांदा लसूण) इतके काटेकोरपणे पाळणे, आम्हाला कठीण वाटते.'' तेव्हा श्रीमहाराज म्हणत-'' ठिक आहे, काळजी करू नका. हळूहळू

आपल्या सवयी कमी करत जा, पुढे या सर्व गोष्टी आपोआपच बंद होतील.'' भक्ताची आर्तता पाहून त्यांचे अंतःकरण विरघळून जायचे.

प. पू. श्री दत्तमहाराजांची बसण्याची ढब वेगळीच असे; तसे ते मुद्दामच बसत असावेत. त्यांची पाउले मांडीच्या इतक्या आत त्यांनी घेतलेली असत, की त्यांच्या पावलांच्या अंगठ्यांना सहसा कुणाला स्पर्श करता येत नसे. खुर्चीवर बसले असले तरीसुध्दा ते त्यांची पाउले इतकी मागे घेत असत, की त्यांच्या पावलांना स्पर्श करणे अशक्य होत असे. 'अलौकिक नोहावें लोकांप्रती' अशी श्रीदत्तमहाराजांची कृती होती.

**परमेश्वर चरणी लीनता, नम्रता :** १९९० सालच्या आधी औरवाड येथे प. पू. श्री दत्तमहाराजांचा भागवत सप्ताह ठरला. औरवाड येथे स्नानाची व अन्य विधींची सोय नव्हती. तेथील गैरसोयी श्रीमहाराजांना सांगताच श्रीमहाराज म्हणाले, ''देवाचे अन्य सेवेकरी जसे राहतात, तसेच आम्ही राहू.'' स्वतः इतके मोठे असूनदेखील सामान्य सेवेकऱ्यांच्या सारखेच स्वतःला मानणे व वागणे हे किती कठीण आहे! ८० च्या घरात स्वतःचे वय असूनदेखील श्रीमद् भागवत सेवेपुढे त्यांना स्वतःला होणाऱ्या त्रासाची बिलकुल फिकीर वाटली नाही.

श्रीदत्तमहाराजांचे श्रीमद् भागवतावर अलोट प्रेम होते. एका वर्षी श्रीवासुदेव निवासात श्रीमद् भागवतावर विवेचन करताना श्री महाराजांना ताप असून देखील त्यांनी विवेचन चालूच ठेवले; शेवटी आरतीच्या वेळी श्रीमहाराजांना पुष्कळ थंडी भरून आली, त्यामुळे त्यांना उभेदेखील राहता येईना. परंतु आरती होईतोपर्यंत श्रीमहाराज मोठ्या नेटाने तसेच उभे राहिले.

साधू, संत व संन्यासी यांच्याबद्दलचा श्रीमहाराजांचा आदरभाव वाखाणण्याजोगा होता. करवीर पीठाधिपती प. प. विद्याशंकर भारती आश्रमात आले होते. त्यांचे व श्रीमहाराजांचे आसन शेजारी शेजारी मांडले होते. पीठाधिपती आसनस्थ होताच, श्रीमहाराज त्यांच्यासमोर खाली जमिनीवर बसले. नेमके असेच भोजनाच्या वेळी घडले. पीठाधिपतींच्या शेजारी श्रीमहाराजांचे पान मांडले होते; हे पाहताच श्रीमहाराजांनी एक शब्दही न बोलता आपले पान उचलले व विश्वस्तांच्या ओळीत जाऊन बसले. यावेळी यात कुणालाही दोषी न ठरविता, संन्याशाशी कसे वागावे, हे आपल्या कृतीतून दाखवून दिले.

**प्रसिद्धीपराङ्मुखता :** १९८० सालच्या अगोदर प. पू. श्रीदत्तमहाराजांचा आश्रमात कोठेच मोठा फोटो नव्हता. म्हणून विश्वस्तांनी मोठा फोटो तयार करून घेऊन, तो वरील दिवाणाच्या खोलीत ठेवला. श्री दत्तमहाराजांना ही गोष्ट आवडली नाही; श्री. महाराजांनी तो फोटो श्री. कोंढरेंना तिसऱ्या मजल्यावरील आतील खोलीत

ठेवण्यास बऱ्याच वेळा सांगितले. परंतु विश्वस्तांच्या सांगण्यावरून श्री. कोंढरेंनी त्याकडे दुर्लक्ष केले. श्रीदत्तमहाराज दौऱ्यावर गेले असताना, विश्वस्तांनी तो फोटो फ्रेम करून, दिवाणावरील भिंतीवर बसवून टाकला. ही गोष्ट श्रीदत्तमहाराजांना बिलकुल आवडली नाही. त्या दिवसापासून श्री दत्तमहाराजांनी त्या खोलीत कामाशिवाय जाणेच बंद करून टाकले.

**व्यवहारदक्ष :** प. पू. श्रीदत्तमहाराज साक्षात्कारी असूनदेखील अत्यंत व्यवहारदक्ष होते. पत्रव्यवहार करण्याकरिता श्रीमहाराजांना कार्डे, पाकिटे लागत असत. त्याकरिता व्यवस्थापकांच्या जवळ पन्नास शंभर रुपये देऊन, त्यांच्याकडून कार्डे, पाकिटे आणून घेत; पण आश्रमातील कार्डे, पाकिटे त्यांनी कधीही वापरली नाहीत. भक्त-मंडळींना लग्न-मुंजीकरता आहेर पाठविताना देखील कमिशनसकट मनीऑर्डरचे पैसे व्यवस्थापकांच्या जवळ ते देत असत.

कांची-कामकोटीचे प. प. श्रीशंकराचार्यांनी (जयेंद्र सरस्वती) काही कारणास्तव पीठाचा त्याग केला होता व तपश्चर्या करण्याकरिता ते निघून गेले होते. त्यांच्याबद्दल द्वारकापीठाधीश स्वरूपानंद सरस्वती यांनी वर्तमानपत्रात जाहीरपणे अनुद्गार काढले होते. द्वारकापीठाधीशांच्या हस्ते प. पू. श्रीदत्तमहाराजांचा सत्कार होणार होता. परंतु श्रीदत्तमहाराज त्या सत्काराला गेले नाहीत, कारण द्वारकापीठाधीशांचे हे बोलणे श्रीमहाराजांना आवडले नव्हते. त्यांनी आपली नाराजी तिथे न जाण्याने व्यक्त केली; फक्त श्रीदत्तमहाराज एवढेच म्हणाले, की थोरामोठ्यांनी सामान्यांचा असा बुद्धिभेद करू नये.

**महान त्याग :** कोठेही जाहिरात न केल्यामुळे प. पू. श्रीदत्तमहाराजांनी केलेल्या असीम त्यागाची कल्पना कोणालाही नाही. श्रीक्षेत्र नृसिंहवाडी येथील त्यांचे वडिलोपार्जित घर प. पू. धुंडिराज महाराजांनी देऊळगावराजाच्या ट्रस्टला जोडून टाकले. पुण्यातील श्रीवामन निवास ही वास्तू म्हणजे श्रीमहाराजांच्या अथक प्रयत्नांचे व असीम त्यागाचे चालते बोलते उदाहरणच आहे. ही वास्तू उभारण्याकरिता गावोगावी श्रीमद्भागवत सप्ताह करून आलेले सर्व पैसे श्री महाराज विश्वस्तांच्या हवाली करत. हे त्यांचे कार्य दोन-चार वर्षे चाललेले होते. पण श्रीमहाराजांनी या कार्याची लोकांना जरासुद्धा कल्पना येऊ दिली नाही. श्रीमहाराजांचे प्रत्येक कार्य इतके अबोलपणे व अलिप्तपणे चालायचे की, त्यांच्या महान कार्याची कोणालाही कल्पनाच येत नसे. श्रीदत्तअमरेश्वर जीर्णोद्धाराच्या वेळी श्रीमद् भागवत सप्ताह व श्रीगुरुपौर्णिमा यातून मिळालेली सर्वच्या सर्व रक्कम न मोजता श्रीमहाराज जीर्णोद्धार मंडळाकडे देत असत. दोन तीन वर्षांमध्ये प. पू. श्रीमहाराजांनी जवळ जवळ तीनचार लाख रुपये सहजरीत्या श्रीदत्तअमेश्वरकरिता दिले. अशीच गोष्ट

काशीयात्रेच्या वेळी घडली. तिथे दानधर्म करण्याकरिता त्यांनी शेकडोंनी वस्त्रे, उपवस्त्रे व अन्य गोष्टी घेतल्या होत्या. परंतु स्वतः मात्र आठ वारी साधे धोतर व करवतकाठी उपरणे याशिवाय काहीही परिधान केले नाही. यासंबंधी कोठेही वाच्यता नाही.

**दुसऱ्याला मोठेपणा देणे, स्वतःची स्तुती स्वतःच्या कानाने न ऐकणे.** १९८० साल प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या अमृत महोत्सवाचा सांगता समारंभ सुरू होता. प्रमुख व्यक्तींची भाषणे झाली. नंतर प. पू. वै. श्री धुंडामहाराज देगलूरकर यांचे अध्यक्षीय भाषण सुरू झाले. प्रास्ताविक संपताच श्रीधुंडामहाराजांनी प. पू. श्रीमहाराजांची स्तुती करण्यास सुरवात केली. ती स्तुती ऐकताच श्रीदत्तमहाराज पटकन उठले आणि त्यांनी श्रीधुंडामहाराजांच्या हातातील माईक आपल्या हातात घेतला व बोलण्यास सुरुवात केली - " आपण सर्व भक्तमंडळी व साधक प. पू. योगीराजांच्या अतिशय प्रेमातील आहोत; याशिवाय येथे जमलेली विद्वान मंडळी, सत्पुरुष व श्री धुंडामहाराजांची आपल्या सर्वांवर असीम कृपा व प्रेम आहे. त्यांचे असेच प्रेम आपल्यावर राहावे, अशी आपण त्यांना प्रार्थना करू या. असे बोलून त्यांनी सभा संपविली. लोकांना वाटले, श्रीदत्तमहाराजांना कामाची घाई असावी म्हणून त्यांनी सभा संपविली असावी. परंतु प्रत्यक्षात मात्र श्रीधुंडीमहाराजांनी केलेली आपली स्तुती श्रीदत्तमहाराजांना स्वतःच्या कानाने ऐकायची नव्हती व दुसऱ्यांना ऐकवायची नव्हती. प. पू. श्रीमहाराजांच्या स्वभावाचे एक खास वैशिष्ट्य होते. दुसऱ्याचा अगदी लहानसा गुण देखील ते मोठा करून सांगत असत, व त्याचे मनापासून कौतुक करीत. श्रीमहाराजांनी केलेले कौतुक तोंडदेखले कधीच नसायचे. एखाद्याने केलेली कविता, प्रसंग किंवा तक्रार ते नीट वाचून बघत असत, व त्या व्यक्तीला समाधानकारक उत्तर देत असत.

आश्रमाचा एक माजी विद्यार्थी श्री. राजाराम कुलकर्णी, याने पंधरा वर्षांपूर्वी प. पू. श्रीमहाराजांच्या प्रेरणेने अग्निहोत्र घेतले. आधानाच्या वेळेस श्री महाराजांचे प्रवचन झाले. या तत्त्वाचे विवेचन करताना ते म्हणाले - " आम्ही नुसतेच शब्दपंडित आहोत. श्रौत कर्माचे फळ कसे महान आहे हे मीमांसा शास्त्राने सांगत बसतो, पण करत मात्र काही नाही. कारण श्रौत कर्म किती कठीण असते हे ते करणाराच जाणतो. येथे श्रीमहाराजांनी वे. मू. राजाराम कुलकर्णी याला मोठेपण दिले व स्वतःला केवळ शब्दपंडित म्हणवले, केवढे हे विशाल मन! दुसऱ्यांला मोठेपण देण्याची श्रीमहाराजांची सहजवृत्ती होती.

**क्षमाशीलता :** १९९० साल. प. पू. श्री महाराजांचा सहस्र चंद्रदर्शन शांती महोत्सव ठरला आणि श्री महाराजांची प्रकृती एकाएकी बिघडली. काय झाले, हे श्रीमहाराजांना कळले होते. पण कोणालाही न सांगता सर्व त्रास शांतपणे ते सहन

करीत होते. डॉक्टरी उपचार चालू होते, पण थोडासुद्धा फरक पडत नव्हता. महोत्सवाच्या आधी पंधरा दिवस कुडली पीठाचे शंकराचार्य श्रीवासुदेव निवासात आले होते. त्यांच्या कानावर महाराजांच्या प्रकृतीसंबंधी सर्व हकीगत घातली गेली. तेव्हा ते म्हणाले – "काय आहे ते मी पाहतो." असे म्हणून त्यांनी आपल्या खोलीचे दार बंद करून घेतले. अर्ध्या पाऊण तासाने स्वामी महाराजांनी दार उघडले. आपल्या पायांकडे स्वामींनी बोट करून दाखविले. तेव्हा दिसून आले, की त्यांच्या पायाला सूज आली आहे. ते म्हणाले – "श्री महाराजांवर प्रयोग झालेला आहे; हा प्रयोग उलटवावयाचा का ? ते श्रीमहाराजांना विचारा." प. पू. श्रीमहाराज म्हणाले - "प्रतिकार करू नका, उलटवू नका. कारण प्रयोग करणाऱ्या व्यक्तीला त्रास होईल. फार फार तर प्रतिबंध करा." केवढी ही दयाबुद्धी !

प. पू. श्रीमहाराजांच्या मोतीबिंदूचे ऑपरेशन १९८० सालच्या आधी झाले. डॉक्टारांच्या हलगर्जीपणामुळे आणि अति कडक वागण्यामुळे ते ऑपरेशन बिघडले. श्रीमहाराजांना कमी दिसू लागले; तरीदेखील श्रीमहाराजांनी डॉक्टरांना दोष न देता, आपले प्रारब्ध म्हणून शांत बसले. केवढे हे उदार अंतःकरण !

प. पू. श्रीदत्तमहाराजांनी गोखले नगरचे आपले स्वतःचे घर एका अडलेल्या गरजू व्यक्तीला रहावयास दिले होते. पण पुढे त्या व्यक्तीने आपला शब्द फिरवला; जागा सोडली नाही, उलट श्रीमहाराजांना त्रास देण्यास सुरुवात केली. परंतु क्षमाशील - श्रीमहाराज त्याच्यावर रागावले नाहीत. त्याला असे न वागण्याबद्दल उपदेशपर सुंदर पत्र लिहिले; त्या पत्राचा शेवट असा केला – "परमेश्वराच्या दरबारी आपण एका गरीब ब्राह्मणाला निष्कारण का छळले - याचे उत्तर देण्याची वेळ आपणावर येऊ नये व आपणांस परमेश्वराकडून शिक्षा होऊ नये, अशी श्री परमेश्वरचरणी आम्ही हात जोडून कळकळीची प्रार्थना करतो." काय हा करुण भाव ! केवढी ही क्षमाशीलता !!

साधारण १५ वर्षांपूर्वीचा काळ असेल. प. पू. श्रीमहाराज आश्रमात उत्सव महोत्सवाच्या वेळी नित्यप्रसादास थांबत असत. त्यावेळी प. पू. श्री टेंबेस्वामी महाराजांच्या फोटोखाली त्यांचे पान असे व त्यांच्या उजव्या हातास वयस्कर व परिचित व्यक्तींची पाने असत. त्या दिवशी सर्व मंडळी आपआपल्या पानावर बसली होती. प. पू. श्रीमहाराज आपल्या जागेवर बसले; पण त्यांच्या शेजारचे पान रिकामे होते. त्या पानावरील व्यक्ती आमंत्रण न गेल्यामुळे रागावून प्रसादास आली नव्हती. प. पू. श्रीमहाराजांना ते समजले; परंतु कोणतीही वाच्यता न करता ते शांतपणे पानावर बसले. संकल्प होताच पानाभोवती पाणी फिरविण्याचा, आहुत्या घालण्याचा इतका सुंदर अभिनय केला, की लोकांना वाटले, श्रीमहाराज जेवायलाच बसले. सर्व

मंडळींनी भोजनास सुरुवात करताच श्रीमहाराज एकदम उठले; तेव्हा लोकांना समजले की, श्रीमहाराजांनी जेवणाचा अभिनय केला होता. प. पू. श्रीमहाराज आपले ताट घेऊन स्वयंपाकघरात आले. तिथे आपले व त्या व्यक्तीचे पान मांडले व त्या व्यक्तीला बोलावणे पाठविले. ती व्यक्ती येईतोपर्यंत प. पू. श्रीमहाराज खिडकीजवळ उभे होते. ते दिसताच "या बसा" असे म्हणून त्यांना पाट दाखविला. ती व्यक्ती बसताच त्यांच्याशेजारी श्रीमहाराज जेवायला बसले व सावकाश होऊ द्या, असे म्हणाले. याप्रमाणे अनेक भक्तमंडळींचे लहानमोठे अपराध पोटात घालून त्यांना उदार अंतःकरणाने श्रीमहाराजांनी क्षमा केली.

एकदा एक व्यक्ती तावातावाने वरच्या खोलीत गेली व प. पू. श्रीमहाराजांना ओरडून म्हणाली –"तुम्हाला गादीवर कोणी बसविले आहे? तिथे मला बसायचे आहे." प. पू. श्रीदत्तमहाराज शांतपणे त्यांना म्हणाले –"तुम्ही बसा, आमची काहीही हरकत नाही; खाली देवापुढे चला, तिथे आपण प्रार्थना करू या."

असेच एकदा प. पू. श्रीदत्तमहाराज वरच्या खोलीत बसले होते; समोर बरीच भक्तमंडळी बसली होती. एक प्रतिष्ठित व्यक्ती मोठ्या घुश्श्यातच श्री महाराजांच्या समोर जाऊ त्यांना रागाने बोलू लागली – "तुम्हाला काय समजतंय का?" श्री महाराज शांतपणे म्हणाले – "तुम्ही म्हणता आहात ते अगदी बरोबर आहे; आम्हाला खरंच काहीही कळत नाही. आम्ही अजाण आहोत."

वरील दोन्ही प्रसंगातील उर्मट वक्तव्यावर जराही न रागवता, शांत व दयाळू अंतःकरणाच्या श्रीमहाराजांनी त्या व्यक्तींनाच मोठेपण दिले. केवढे हे उदार, क्षमाशील अंतःकरण!

**योग्य शब्दांत समाधान करण्याची हातोटी –** दहा बारा वर्षांपूर्वी, श्रीवामन निवासमध्ये एक सद्गृहस्थ 'स्पिरीच्युअल हिलिंग' या शास्त्राने रोग्यांचे राग बरे करीत असत. लोकांना बरे वाईट अनुभव येत असत. ते गृहस्थ खाण्या-पिण्याबाबत काळवेळ (ग्रहण) इत्यादिबद्दल कोणताच विधीनिषेध पाळत नसत. त्यांच्याबद्दल प. पू. श्रीमहाराजांकडे तक्रारी गेल्या व त्यांचे हे उपचार बंद करण्याविषयी श्री महाराजांना लोकांनी विनंती केली. तेव्हा श्रीमहाराजांनी त्या गृहस्थांना असा निरोप पाठविला, "आजपर्यंत तुम्ही पुष्कळ रोग्यांवर उपचार केले आहेत; त्यामुळे तुमच्या कार्याची माहिती बऱ्याच जणांना झाली आहे. त्या कार्याचा प्रचारही पुरेसा झालेला आहे. तेव्हा यापुढील कार्य तुम्हास घरी करण्यास हरकत नाही."

तसाच प्रसंग दोन तीन वर्षांपूर्वी पुण्यात घडला. गणपती दूध पितो, अशी वार्ता सगळीकडे वाऱ्यासारखी पसरली. प. पू. श्रीमहाराज खाली हॉलमध्ये बसले होते समोर बरीच भक्तमंडळी बसली होती. एक महिला श्रीमहाराजांना तावातावाने सांगू लागली– 'महाराज, गावातले सर्व गणपती दूध पीत आहेत, तर आपल्या देव्हाऱ्यातील गणपती दूध पितो का, हे पहा. कोणाला तरी सोवळे नेसून देवघरांत

जायला सांगा." प. पू. श्रीमहाराजांनी त्या महिलेचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतले आणि तिला म्हणाले –"तुमच्या देव्हाऱ्यात गणपती आहे ना, त्याला प्रथम तुम्ही दूध पाजा. तुमचा गणपती दूध प्याला की आम्ही आमच्या देव्हाऱ्यातील गणपतीला दूध पाजू." प्रश्नकर्त्या माणसाला न दुखवता, त्याचे समाधान करून त्याला परत पाठविण्याची प. पू. श्रीमहाराजांची हातोटी काही वेगळीच होती.

**वक्तृत्त्व :** प. पू. श्रीदत्तमहाराजांनी विषयविवेचन करण्याची शैली समोरच्या श्रोतृवृंदावर अवलंबून असे. विषयांतर न करता प्रसंग वेळ ठिकाण बघून श्रीमहाराज बोलत असत. त्यामुळे समोरचे श्रोते विषयाशी पूर्णपणे एकरुप होऊन जात असत. सिंहगडच्या पायथ्याशी कोंढणपूर म्हणून एक गाव आहे; तेथील दत्तमंदिराचा कळस प. पू. श्रीगजानन स्वामी महाराज यांच्या हस्ते बसविण्यात आला तेव्हा प. पू. श्रीमहाराजांचे समोरच्या लोकांना उद्देशून भाषण झाले. त्या भाषणात नरवीर तानाजी मालुसरे, शिवाजी महाराज, संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराज व रामदास स्वामी यांचे राष्ट्रप्रेम व धर्मप्रेम कसे होते, हे निरनिराळ्या उदाहरणांद्वारे श्रीमहाराज लोकांना सांगत होते, हे सांगताना तुकाराम महाराजांचे अभंग व रामदास स्वामींच्या दासबोधातील ओव्याच्या ओव्या श्रीमहाराज म्हणून दाखवीत होते. धर्मावर निष्ठा असली म्हणजे आपोआपच देशप्रेम निर्माण होते, हे विचार अतिशय साध्या व सोप्या भाषेत श्री महाराजांनी लोकांना पटवून दिले.

याउलट, श्रीगुरुदेव रानडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त 'ट्रेनिंग कॉलेज फॉर मेन' या संस्थेच्या हॉलमध्ये श्रीमहाराजांचे व्याख्यान होते. व्याख्यानाला सर्व विद्वान मंडळी जमली होती. त्यावेळी न्याय, वेदांत व तत्त्वज्ञान यांचे दाखले देत देत, श्रोत्यांना 'श्रीगुरुदेव रानडे यांचे तत्त्वज्ञान' हा विषय श्रीमहाराज समजावून देत होते. संपूर्ण भाषण म्हणजे विद्वत्तेचे व विषयाचे सखोल ज्ञान असल्याचे एक द्योतक होते.

महान पंडित असूनही कोंढणपूरच्या भाषणात श्रीमहाराजांनी आपल्या पांडित्याची जरासुद्धा लोकांना कल्पना येऊ दिली नाही, तर ट्रेनिंग कॉलेजमध्ये मात्र पंडितांच्यासमोर पांडित्यपूर्ण भाषेत विषय विवेचन केले.

**आचारनिष्ठा :** प. पू. श्रीदत्तमहाराजांनी आयुष्यभर कटाक्षाने पाळलेली आचारनिष्ठा शेवटच्या क्षणापर्यंत सोडली नाही. अखेरच्या आजारात देखील प्रकृती अस्वास्थ्यामुळे श्रीमहाराजांना संध्या करणे अशक्य होते; तेव्हा पाणीही घेत नसत. यथाशक्ती स्नान्हीक करीत होते. अशा प्रकारे जीवनाचे अखेरपर्यंत ते आचार धर्माचे निग्रही होते. पुढे संध्या करणे अशक्य झाले. त्या दिवसापासून शेवटच्या क्षणापर्यंत श्रीमहाराजांनी अन्न घेतले नाही; मौन धारण केले. डोळेही उघडले नाहीत. केवढा हा आचार पालनाचा निश्चय! प. पू. श्रीदत्तमहाराजांचे जीवन आचार धर्माचा मूर्तिमंत आदर्श होता. सद्गुरु श्रीदत्तमहाराजांना कोटी प्रणाम!

# ब्रह्मर्षि दत्तमहाराज कवीश्वर यांस

# श्रद्धांजली

वेदान्तमर्मसंपृक्ता लोकसन्मार्गदायिका।
श्रीदत्तसद्गुरोर्नित्यं पावकाऽसौ सरस्वती ॥१॥

समुज्ज्वलं च सत्कर्म लोकसंग्रहकारकम्।
सद्धर्मप्रेरकं शुद्धं श्रीदत्तस्य कृपान्वितम् ॥२॥

सम्पूर्णं जीवनं यस्य चारुचन्दनसान्निभम्।
समर्पितं परार्थे तत् सर्वसन्तुष्टिदायकम् ॥३॥

भक्तानां विनयाधानाद् रक्षणाद् भरणादपि।
स पिता सद्गुरुर्दत्तः वन्दनीयः पुनः पुनः ॥४॥

संयमी कुशलः शान्तः भर्ता बन्धुः पिता तथा।
दत्तः कवीश्वरः श्रीमान् वत्सलः करुणान्वितः ॥५॥

चरितं पावनं यस्य श्रीदत्तस्य महात्मनः।
नास्ति तस्य यशःकाये जरामरणजं भयम् ॥६॥

नमस्ते भगवन् दत्त सदानन्द स्वयंप्रभ।
अस्माकं हृदये नित्यं भवत्स्थानं हि शाश्वतम् ॥७॥

**सौ. उमा देशपांडे**
५, मंगलवाडी, सोसायटी
२ - ब - देसाई मार्ग
बडोदे - ३९०००१

# प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज यांच्या महानिर्याणानंतर

## विविध वृत्तपत्रातून आलेले

# वृत्तविशेष

**सकाळ - दि २/३/९९**

पुणे ता. १ – वेदविद्येचे आणि संस्कृतचे गाढे अभ्यासक, दत्तोपासक क्षेत्रातील थोर तपस्वी आणि सतरा हजारांहून अधिक प्रवचनांद्वारे भाविकांत परमार्थाची शिकवण रुजविणारे थोर वेदांती पंडित दत्तात्रेयशास्त्री धुंडिराज कवीश्वर (वय ८९) यांचे आज सकाळी 'रेणुकानिवास' येथे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या मागे तीन मुलगे आणि तीन मुली आहेत.

दत्तमहाराजांचे अवघे जीवनच एखाद्या व्रतस्थ तपस्व्याचे होते. विमल चारित्र्य, नैष्ठिक आचरण आणि कमालीची ऋजुता ही त्यांची वैशिष्ट्ये होती. प्रवचने व ज्ञानसत्रे यांच्या निमित्ताने सदैव संचार असे. अलीकडील २/३ वर्षे त्यांना प्रकृती ठीक नसल्याने भ्रमण थांबवावे लागले.

दीड महिन्यापूर्वी त्यांच्या पत्नी सौ. लक्ष्मीबाई यांचे निधन झाले. नंतर त्यांची प्रकृती ढासळत गेली. गेल्या आठ दहा दिवसांपासून त्यांना ताप आणि श्वसनाचा त्रास जाणवू लागला. त्यातच त्यांचा श्वासोच्छ्वास क्षीण होत गेला आणि एखादी दीपज्योत मंदावत जाऊन विझावी त्याप्रमाणे त्यांचे देहावसान झाले.

दत्तमहाराज यांचा जन्म २ मार्च १९१० रोजी नृसिंहवाडी येथे झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण आणि वेदाध्ययनाचा प्रारंभ तेथे झाला. दत्तमहाराज यांचे वडील धुंडिराजमहाराज आणि आजोबा वक्रतुंडमहाराज हे प्राचीन विद्या–उपासना आणि भक्तिसंपन्न 'महाराज' संज्ञेचे अधिकारी प्रवचनकार होते. श्रीवासुदेवानंद सरस्वतींचे एकमेव दण्डी शिष्य श्रीदीक्षितस्वामी यांनी अमरापूर (औरवाड) येथे स्थापन केलेल्या श्रीवासुदेवानंद सरस्वती पीढात दत्तमहाराजांनी - श्रीदीक्षित स्वामींच्या आज्ञेनुसार - त्यांचेसमोर - त्याच्या १६ व्या वर्षी पहिला भागवत् सप्ताह केला. तो पुढे चाळीस वर्षे सुरू होता,

दत्तमहाराजांचे अध्ययन नृसिंहवाडी, सांगली आणि धारवाड येथे झाले. धारवाडला न्याय आणि वेदान्तशास्त्राचे अध्ययन पं. नागेशशास्त्री यांचेकडे केले. 'न्याय रत्न' आणि 'न्यायचूडामणी' या पदव्या संपादन केल्या. पुण्यातील मीमांसा विद्यालयात पं. सुब्बाशास्त्रींचे जवळ मीमांसाशास्त्राचा अभ्यास केला. काशीच्या पं.

राजराजेश्वरशास्त्री द्रवीड यांचेही मार्गदर्शन लाभले.

इ. स. १९४५ पासून पुण्यातील शांकरपीठात काही काळ अध्यपक होते. इ. स. १९४५ पासून टिळक महाराष्ट्र विद्यापीठात अध्यापन सुरू केले. दत्तमहाराज यांनी ब्रह्मसूत्रावरील आचार्य निम्बार्क यांच्या "वेदान्त पारिजात सौरभ" भाष्यावर संशोधनपर प्रचंड ग्रंथ लिहिला. तो १९६५ मध्ये प्रकाशित झाला. दत्तमहाराज यांची कीर्ती देशभर पसरली. आचार्य पीठ, संस्कृत पीठ, केंद्र सरकारकडून मान्यता व सन्मान लाभले. भारताचे पहिले राष्ट्रपति डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी त्यांना 'विद्यावाचस्पती' आणि व्ही. व्ही. गिरी यांनी 'राष्ट्रीय संस्कृत पंडित' तर डॉ. शंकरदयाळ शर्मा यांनी राजपत्र देऊन त्यांचा सन्मान केला. याप्रमाणे तिघा राष्ट्रपतींकडून सन्मान मिळण्याचा अपूर्व योग दत्तमहाराजांना लाभला. द्वारकापीठाच्या शंकराचार्यांनी 'महामहोपाध्याय' ही पदवी दिली. कांची पीठाकडून त्यांना सुवर्णकंकणाचा बहुमान आला. त्यावेळी त्यांची कन्या शोभा ही फ्ल्यूच्या साथीत बळी गेली. हा प्रसंग त्यांनी विपदा आणि संपदा सारख्याच मापाने तोलून आपली स्थितप्रज्ञ वृत्ती कायम ठेवली.

योगिराज वामनरावजी गुळवणी महाराजांच्या निर्वाणानंतर श्रीवासुदेव निवासाचे ते उत्तराधिकारी झाले. श्रीवासुदेवानंद सरस्वतींच्या समग्र वाङ्मयाचे शुद्ध स्वरूपात प्रकाशन व अमरापूर क्षेत्राचा जीर्णोद्धार ही त्यांच्या जीवनातील फार मोठी कार्ये त्यांनी समर्थपणे पार पाडली. ते सतत अंतर्मुख शांत अवस्थेचे आदर्श जीवन जगले. ते म्हणजे 'चालता बोलता वेदान्त' 'संचरिष्णु ब्रह्म' होते. त्यांचे शिष्यही भारतभर संस्कृत क्षेत्रातील उच्च पदव्यांनी विभूषित झालेले आहेत. दत्तमहाराजांचे लेखनकार्यही विपुल आहे.

दत्तमहाराज हे सात्त्विक्र ज्ञानयोगी होते, 'विद्या विनयेन शोभते' हे त्यांच्या जीवनदर्शनाचे वैशिष्ट्य होते. भक्तीच्या वातावरणात पोसलेला त्यांचा पिंड कधीही अहंकार-परनिंदा-क्रोध-द्वेष यांना शिवला नाही हीच त्यांची अपूर्व सात्त्विकता होती. त्यांच्या विद्वत्तेचे तेज दिपवून टाकणारे नव्हते, तर निरांजनाच्या ज्योतिप्रमाणे अखंड आणि प्रसन्न करणारे होते. श्रीमद्भागवत हा त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग होता. त्यांच्या विद्वत्तेला लोकमान्यता, राजमान्यता आणि विद्वन्मान्यता होती, चारही आचार्य-पीठांकडून त्यांचा सन्मान झाला होता. सर्वांना ते आपलेच वाटत असत. त्यांच्या निधनाने अनेकांचा आपलेपणाचा ठेवा हरपला आहे.

**दै. केसरी - दि. २ मार्च १९९९**

दत्तात्रेयशास्त्री कवीश्वर हे संस्कृतचे प्रकांड पंडित होते. वेदान्त पारिजात सौरभ - सर्वदर्शन संग्रह - दत्तकरुणार्णव असे अनेक ग्रंथ त्यांनी लिहिले. श्रीवासुदेव

निवास-आनंदाश्रम-इ. संस्थांचे ते अध्यक्ष होते. विनम्र शांत व निर्गवी स्वभावामुळे ते सर्व स्तरांत स्नेहपूर्णतेने सन्मानित झाले होते (केसरीने त्यांचा संक्षिप्त जीवनपटही दिला आहे.)

**लोकसत्ता - दि. २ मार्च ९९**

अत्यंत साधी रहाणी, विनम्र, शांत, निगर्वी स्वभाव, सोपे वक्तृत्त्व, अनेक विषयांचे व्यासंगी आणि गाढे पंडित ही त्यांची जीवनवैशिष्ट्ये होती.

(लोकसत्तेने त्यांचा संक्षिप्त जीवनपटही दिला आहे.)

**सामना - २ मार्च ९९**

गेल्या ६५ वर्षापासून दत्तमहाराजांनी सुरू केलेल्या भागवत सप्ताहाला राज्यभरातून भाविकांची उपस्थिती असावयाची. 'वेदान्त पारिजात सौरभ' हा सुमारे १००० पानी ग्रंथ शास्त्री-पंडित-विद्वानांमध्ये आदराचा विषय बनला. या ग्रंथाची दत्तमहाराजांची प्रस्तावना आणखी एक अभ्यासाचा विषय ठरला. या प्रस्तावनेत चार्वाकदर्शन, मीमांसादर्शन, सांख्यदर्शन आणि योगदर्शन यांचा घेतलेला परामर्श हे या प्रस्तावनेचे विशेष आहे.

(अल्प परिचय दिलेला आहे.)

याशिवाय या सप्ताहात सकाळमधून दत्तमहाराजांच्या जीवनावर प्रकाश टाकणारे विस्तृत लेख पं. वसंतराव गाडगीळ आणि श्री. अजित कुलकर्णी यांचेही आलेले होते.

**संसार बंधन सोडणे याचा अर्थ संसार सोडून देणे,**
**घरदार सोडून देणे, असा होत नाही.**
**अन्तःकरणात पूर्ण निवृत्ती साधणं महत्त्वाचे आहे.**
**बाहेर प्रवृत्ती दिसली तरी**
**अन्तःकरणात निवृत्त असले पाहिजे.**
**म्हणज संसार बंधन सुटते.**
**मनात संसार नको. असा मनुष्य जीवनमुक्तच असतो.**
**– श्रीदत्तमहाराज**

# मान्यवरांची भावपूर्ण श्रद्धा सुमने

**मा. ना. महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री,**
**मुंबई - (प्रतिनिधी - पुण्याचे पोलिस आयुक्त इ.)**

पू. दत्तमहाराज यांच्या पार्थिव देहावर, महाराष्ट्र शासनाच्या वतीने पुष्पचक्र समर्पण करून, एका महान पंडिताला आपले राज्य दुरावले असून, महाराष्ट्र शासनाला व व्यक्तिशः मला तीव्र दुःख होत आहे हे व्यक्त केले.

❖ ❖

**मा. सुधीर जोशी शिक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई**

राष्ट्रीय पंडित दत्तात्रेयशास्त्री कवीश्वर यांच्या निधनामुळे महाराष्ट्र राज्य एका थोर संस्कृत विद्वानास मुकले आहे .. महाराष्ट्र शासनाला त्यांच्या कार्याचे सदैव स्मरण राहील.

❖ ❖

**मा. प्रमोद नवलकर, सांस्कृतिक कार्यमंत्री महाराष्ट्र राज्य, मुंबई**

पंडित कवीश्वर घराण्याचे धार्मिक क्षेत्रातील योगदान महाराष्ट्राला व देशाला विसरता येणार नाही. विसाव्या शतकातील महाराष्ट्र देशाला लाभलेले हे एक वरदान आहे. अनेक वर्षे सातत्याने तेवत असलेला हा नंदादीप कायमचा विझला याचे तीव्र दुःख मला होत आहे.

❖ ❖

**मा. शरदरावजी पवार-विरोधी पक्षनेते, लोकसभा,**
**भारतीय संसद, माजी मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

वेदविद्येचे आणि संस्कृतचे गाढे अभ्यासक, दत्तेपासना क्षेत्रातील थोर तपस्वी दत्तमहाराज कवीश्वर यांच्या निधनाने मला अतिशय दुःख होत आहे.

न्यायशास्त्र, मीमांसा, आणि श्रीमद्‌भागवताचे अभ्यासक म्हणून त्यांची ख्याती होती. यांनी आपले जीवन एका व्रतस्थ तपस्वीप्रमाणे व्यतीत केले. विमल चरित्र, नैष्ठिक आचरण, कमालीची ऋजुता ही दत्तमहाराजांची वैशिष्ट्ये होती.

त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हीच परमेश्वर चरणी प्रार्थना.

❖ ❖

**आचार्य किशोरजी व्यास-अध्यक्ष, महर्षि वेदव्यास प्रतिष्ठान**

प्रातःस्मरणीय पू. ब्रह्मर्षि दत्तमहाराज कवीश्वर यांचे महानिर्वाण म्हणजे देशाच्या व विशेषतः महाराष्ट्राच्या आध्यात्मिक व सांस्कृतिक विश्वावर फार मोठा

आघात आहे. विद्वत्तेबरोबर आत्यंतिक विनम्रता, सचोटीचे साधुत्व, नव्हे नव्हे शास्त्रात व संत साहित्यात प्रतिपादिलेली सर्वच संत लक्षणांचा अपूर्व संगम असलेला हा महापुरुष एक आदर्श महामानव होता. यांच्या प्रयाणाने देशातील भाविक जनता अत्यंत दुःखी झाली असून, साश्रुनयनांनी श्रद्धांजली वाहत आहे.

❖ ❖

**अजित कुलकर्णी (प्रवचनकार)**
**श्रीगुरुचरित्र अखंड पारायण संस्था, आनंदाश्रम,**
**वै. देशमुख दिंडी नं. ४, ज्ञानेश्वर पालखी सोहळा,**
**शेडगे पंच मंडळी नं. ४ व इतर ट्रस्टच्या वतीने श्रद्धांजली वाहता –**

महाराष्ट्राचे-देशाचे एक ऋषितुल्य व आदर्श व्यक्तिमत्त्व आज काळाचे उदरात गेले. प्रगल्भ ज्ञानाचा जणू हिमालय उद्धवजींच्या रूपाने शुकाचार्यांच्या कार्याप्रमाणे साकार झालेली ही निजज्योत होती.

अलीकडच्या काळातील एक संतावर आरूढ झालेली व्यक्ती होती. त्यांचे कार्य एखाद्या अबोलीच्या झाडाप्रमाणे अबोल राहून आणि मोगऱ्याच्या गंधाने सर्वांच्या मनाला चैतन्य-प्रेरणा देणारे महाराजांचे व्यक्तिमत्त्व होते. नाथांची शांतीब्रह्म सेवन केलेली थोर विभूती ! त्यांचे विचारधन साधकांना, विद्यार्थ्यांना, भक्तांना सदैव मार्गदर्शक राहील व त्यांचे जीवन व कार्य सर्वांना दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक ठरणार आहे. त्यांनी आखून दिलेल्या विचारांच्या अनुषंगाने आचरणात राहणे ही त्याना खरी श्रध्दाजंली ठरेल.

❖ ❖

**डॉ. व. दि. कुलकर्णी**

आध्यात्मिक व वेदवाङ्मयाचा अभ्यासक असणारे शिस्तप्रिय, निगर्वी आणि अबोल असे दत्तमहाराजांचे व्यक्तिमत्त्व होते. भक्तीची जोड, त्यांच्या वागण्यात व विचारात असल्याने विद्यार्थ्यांना त्यांनी ज्ञानग्रहणाबरोबर भक्ती उपासनेची गोडी लावली.

❖ ❖

**प्राचार्य अनिरुध्द देशपांडे**

संस्कृतच्या प्रांगणात दत्तमहाराजांचे योगदान मोलाचे होते. संस्कृत प्रसाराच्या माध्यमाने संस्कृतीचा प्रसार त्यांनी केला. आज-काल संस्कृतीचा ऱ्हास होताना जो दिसतो, अशा वेळी या महापुरुषांच्या निधनाने सामाजिक हानी होते. त्यांच्या कार्याची धुरा पुढे चालविण्याची प्रेरणा अनेकांना मिळत राहो, ही श्रध्दांजली !

**प्रा. गं. ना. जोगळेकर**

पंडित कवीश्वर हे महाराष्ट्रातील एक थोर विद्वान, देशात व परदेशात संस्कृत पंडित म्हणून त्यांची ख्याति फार मोठी होती. आध्यात्मिक क्षेत्रात मूकपणे कार्य-मग्न असणारे असे थोर व्यक्तिमत्त्व होते. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या वतीने मी श्रध्दांजली वाहतो.

❖ ❖

**डॉ. सरोजनी वैद्य**

पू. कवीश्वरांचा संस्कृतीचा गाढा अभ्यास व लेखन हा साहित्य महाराष्ट्र वाङ्मायांचा अमोल ठेवा आहे. महाराष्ट्र विकास कार्यात एकोप्याचे कार्य त्यांनी करुन महामंडाळाची एकांगी सेवा करून आम्हांस उपकृत केले आहे. मंडळाच्या वतीने मी श्रध्दांजली वाहते.

❖ ❖

**श्री. द. ग. श्री नृसिंह सरस्वती स्वामी**
**दत्तदेव संस्थान, नृसिंहवाडी**

पू. दत्तमहाराजांच्या निधनाने नृसिंहवाडीतील सर्व जनतेला अतिशय दुःख झाले आहे. पू. महाराजांनी वाडीवर जिवापाड प्रेम केले. त्यांनी धार्मिक, आध्यात्मिक या विषयात अभ्यास करून वाडीचे कीर्तीत भर घातली. त्यांच्या निधनाने आध्यात्मिक क्षेत्रातील एक दिव्य व्यक्तिमत्व हरपले आहे.

❖ ❖

**श्रीकसबा गणपती सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, कसबा पेठ, पुणे.**
**अध्यक्ष, वि. के. पंढरपुरे**

पू. दत्तमहाराज एक थोर विभूती होती. त्यांच्या विद्वत्तेला आणि व्यासंगाला लोकमान्यता व राजमान्यता लाभलेली होती. एक व्रतस्त जीवन जगले. विमल चारित्र नैतिक आचरण, कमालीची ऋजुता व शांत सौम्य व मृदू स्वभावाची जनमानसात वेगळीच प्रतिमा ठसली होती. मंडळाच्या वतीने भावपूर्ण श्रध्दांजली वाहतो.

❖ ❖

**नासिक प्राच्य विद्यापीठ, श्री भद्रकाळी मंदिर, नाशिक**

पू. दत्तमहाराजांचे निधन म्हणजे फार मोठा व्रजघात असून भारत देश एका अप्रतिम विद्वानाला मुकला आहे. त्याचे संस्कृत वाङ्मयाचे कार्य, वामनाश्रम पोरका झाला.

सर्वांनी अशा शब्दात श्रध्दांजली वाहिली आहे.

❖ ❖

●●●

॥ श्रीगुरुःशरणम् ॥

दि: ७/३/१९९९

# " श्रद्धांजली "

**पां. रा. लेले**

प. पू. श्रीदत्तमहाराजांना दि. १/३/१९९९ रोजी देवाज्ञा झाली. सबंध भारतभर पसरलेल्या सर्व भक्तांना अत्यंत दुःख झाले. आमचा सर्वांचा आधार नाही सारखा झाला. अनेक भक्तगण अंत्यदर्शनासाठी आले होते. दुःख आवरणे कठीण होते. परंतु नियतीपुढे कोणाचे चालणार ?

गेली २-२॥ वर्षे प. पू. श्रीदत्तमहाराज आजारीच होते. अशक्तपणा खूपच जाणवत होता, तरी पण त्यांच्या नित्य आन्हिकांत खंड पडला नाही. संध्याकाळी ते अर्धा तास बाहेर येऊन बसत व साधकांचे समाधान करीत. ६॥ वाजल्यानंतर सर्वांना दर्शन खुले ठेवले होते. लोकही कोणताही आग्रह न धरता मिळेल तेवढेच दर्शन घेऊन समाधान मानीत. त्यांना वार्धक्यामुळे होणाऱ्या त्रासाची कल्पना सर्वांनाच होती. तरी पण लांबून आलेल्या साधकांना, भक्तांना या वेळेव्यतिरिक्त दर्शन देऊन ते समाधान करीत. लोकसुध्दा समाधान मानीत हल्ली हल्ली त्यांना उठून बसणेही कष्टदायक वाटे, परंतु शेवटपर्यंत त्यांना ऊठबस करावीच लागत होती. शेवटी दि: १/३/१९९९ रोजी सकाळी त्यांनी देहत्याग केला व ते श्रीदत्त स्वरूपी लीन झाले.

वर्तमानपत्रांत त्यांच्याबद्दल लिहून आलेले आहेच. जगद्‌गुरु शंकराचार्यांच्या चारही पीठात त्यांना फार वरच्या दर्जाचे स्थान होते. अनेक मानसन्मान व पुरस्कार त्यांना मिळाले. राष्ट्रपतींकडूनही त्यांना मानपत्रे मिळाली. पण त्यांचा साधेपणा टळला नाही. विनम्र वृत्तीत बदल झाला नाही. उच्चनीच भावनांचा त्यांना कधीही स्पर्श झाला नाही. तसेच लहान-मोठा असा भेदभाव त्यांच्याकडून झाला नाही. अनेकांनी या सर्व गोष्टींचा अनुभव घेतला आहे. अनेक वर्षे त्यांनी भागवत सप्ताहाद्वारा ज्ञान-दान केले. ते राष्ट्रीय पंडित, निपुण नैयायिक, विद्यावाचस्पती, ब्रह्मर्षी पदव्यांनी

विभूषीत होते. अशा महापुरुषाचा आशीर्वाद आजपर्यंत सर्वांना मिळत राहिला. त्यांनी अनेक भक्तांचे जीवन फुलविले व त्यांचे कल्याण केले.

प. पू. श्रीगुळवणी महाराजांच्या बददूल त्यांना अत्यंत आदर होता. त्यांच्या पश्चात उत्तराधिकारी म्हणून त्यांनी जवळ जवळ २५ वर्षे " श्री वासुदेव निवास " आश्रमाची धुरा उत्तम तऱ्हेने सांभाळली व श्री गुरुमहाराजांच्या अनुपस्थितीची जाणीव कधी भासू दिली नाही. त्यांचे कार्य अत्यंत आनंदाने चालविले. पण आज अशा थोर पुरुषाला आपण अंतरलो आहोत. त्यांच्याबददूल कितीही लिहिले तरी थोडेच आहे. ते इतके महान आहेत की, साधनरूपानें ते आपल्यांतच आहेत.

प. पू. श्रीदत्त महाराज यांच्या सहधर्मचारिणी सौ. आईसाहेब यांनाही अहेवपणी सौभाग्याचे मरण आले. खरोखर त्यांच्या जीवनाचे सोने झाले. लगोलगच प. पू. श्रीदत्तमहाराजांनीही आपली जीवनयात्रा संपविली व ते श्रीदत्त चरणी लीन झाले. माता, पित्याचे प्रेमळ छत्र हरवल्यामुळे त्यांच्या घरांतील सर्व मंडळींना झालेल्या अतीव दुःखात आम्ही सर्व साधक भक्त सहभागी आहोत.

आपल्याला मिळालेली साधना नित्य करीत राहणे हीच खरी त्या उभयतांना श्रध्दांजली आहे. तरीपण आपले कर्तव्य म्हणून उभयतांना श्रध्दांजली वाहून आपले भाव व्यक्त करूया.

**" श्रीगुरुदेवदत्त "**

**पां. रा. लेले**
७३, "महावीर सुख,"
(इस्माईल बिल्डिंग)
डॉ. आंबेडकर मार्ग,

**" आर्जवं ब्रह्म उच्यते "**

**– महाभारत**

**आर्जव म्हणजे ऋतुजा,**
**ऋजुतेलाच ब्रह्म असे म्हणतात.**
**हे ब्रह्म जगाच्या कल्याणासाठी प्रगट होते**
**तेव्हा ऋजुताच स्थूलरूप धारण करते.**
**पू. श्रीदत्तमहाराज हे ऋजुतेचेच चालते बोलते**
**प्रतीक होते. म्हणजेच परब्रह्माचेच प्रतीक होते.**

# कवीश्वरकुलातील रांगते बाळ !

## श्री. धुं. कवीश्वर

"लहान मुलाचे पाय पाळण्यात दिसतात." ही उक्ती, संस्मरणीय व मंगल स्वरूपात सार्थ ठरणाऱ्या थोर पुरुषांपैकी, 'विद्यावाचस्पति' कै. पं. दत्तमहाराज धुंडिराजमहाराज कवीश्वर हे एक होते. **'सा विद्या या विमुक्तये', 'विद्या परं दैवतम्', 'विद्ययाऽमृतमश्नुते'** अशा विद्याविषयक / ज्ञानविषयक महतीचे मूर्तिमन्त प्रतीक म्हणजे, दि. १ मार्च ९९ रोजी, ब्रह्मस्वरूप झालेले, हजारो अनुग्रहीत भक्तांचे 'दत्तमहाराज', कवीश्वर कुलातील 'दत्तात्रेय', योगिराज वामनराव गुळवणी महाराजांचे खासगीतील 'दत्ता' व आमचे (खरे म्हणजे 'माझे'- पाच बन्धूपैकी, आता तिच एकटा आहे !) ती. 'दादा' हे होत !

मोठेपणी, न्याय - वेदान्त मीमांसादी शास्त्रे रसनाग्रनर्तकी असलेल्या विद्यास्वरूप / ज्ञानस्वरूप दादांचे 'रम्य ते बालपण' कसे उद्‌बोधक होते याविषयी आमच्या आईने (कै. सौ. सरस्वती धुंडिराजमहाराज कवीश्वर) मला सांगितलेली बोलकी आठवण, सर्वांच्याच हृदयात सात्त्विक आनन्दाचे निधानस्वरूप अशी ठरेल.

आम्ही पाच भाऊ व एक बहीणपैकी बहीण श्रीमती पद्मावती हरिभाऊ कुलकर्णी व मी (श्रीपाद) असे सध्या दोघेच "आमचा राम राम घ्यावा" असे जीवनमान असलेल्या अवस्थेत आहोत.

ती. दादाविषयी, आम्हा चौघा भावांना (कै. डॉ. दिगंबर (अण्णा), कै. वासुदेव (नाना), मी (श्रीपाद/अप्पा) व कै. गजानन) उद्देशून आई वारंवार म्हणत असे - ".... दत्ताची सर तुम्हा कोणातही नाही !...." यावर एकदा मी आईला विचारले, "आई, तू असे का म्हणतेस ?" यावर आईने सांगितलेली आपल्या लाडक्या 'दत्ता'ची रम्य गोष्ट अशी ------

सौ. सरस्वती - धुंडिराज यांचे पहिले अपत्य 'दत्तात्रेय' या रांगत्या बाळाचा पहिला वाढदिवस मोठया प्रमाणात, दत्तमहाराजांचे जन्मस्थान नरसोबावाडी येथे साजरा झाला. गावातील सुवासिनी, प्रतिष्ठित पुरुष व बाल-बालिका दत्ताच्या पहिल्या वाढदिवसास हजर होत्या. सुंदर आरास तयार करण्यात आली होती. विविध गोड खाद्य पदार्थ, फळे, रंगीबेरंगी खेळणी व ..... एका काहीशा अवघड जागी 'गीतेचे छोटे पुस्तक' ...... अशी ती मनमोहक आरास होती. सर्वांसमक्ष

सुन्दर वेषभूषा केलेल्या, अलंकार ल्यालेल्या, सर्वांच्या कुतूहलाच्या आनन्दी नजरा लागलेल्या व तीट लावलेल्या आपल्या हसतमुख रांगत्या बाळाला (चि. दत्ताला) आईने त्या सुंदर आराशीपुढे सोडले. रांगते बाळ मधुर आवाज करीत, आराशीकडे पुढे, पुढे रांगत सरकू लागले. सर्वांच्या आनन्दी नजरा कुतूहलाने, त्या रांगत्या बाळावर खिळून राहिल्या.

"..... ते बघ, आता ते बाळ पेढा घेणार, .... नाही ग, ते केळ घेणार बघ...." अशी सुवासिनींमध्ये कुजबूज सुरू होती. तोच त्या रांगत्या बाळाने, मिठाई पालथी घातली, रंगीबेरंगी खेळणी इकडे तिकडे आपल्या चिमुकल्या हातांनी सरकवून दिली. "हे काय ? विचित्रच दिसतेय हे बाळ ! खाऊ नको, रंगीबेरंगी खेळणी नको, मग या बाळाला हवे तरी काय ?' "रडत तर मुळीच नाही, उलट वेड लावणारे त्या बाळाचे मधुर हास्य वाढतच आहे.........."

अशी सर्वांची उत्सुकता वाढीस लागलेली असतानाच, कवीश्वर - घरण्यातील त्या मनमोहक रांगत्या बाळाने, सौ. सरस्वती - धुंडिराजांच्या लाडक्या पहिल्या अपत्याने, प. पू. वासुदेवानन्द सरस्वती टेंबे स्वामी महाराजांच्या मते, दत्तमहाराजांचे आजोबा कै. वक्रतुण्डबुवा (अण्णा) यांच्या अवतारी बालकाने आपल्या चिमुकल्या सुंदर हातात काय पकडले ? तर त्या आराशीत एका अवघड जागी ठेवलेले (फारसे कोणाच्या लक्षातही न येणारे) गीतेचे छोटे पुस्तक ! एकदम सर्वांनीच आनन्दाने जल्लोश केला. आईला तर आपल्या दत्ताला कोठे ठेवू वा कोठे ठेवू नको, असे झाले. आईने कडेवर घेतलेल्या, चिमुकल्या हातात विश्ववन्द्य भगवन्ताची गीता असलेल्या त्या दृष्ट लागलेल्या रांगत्या बाळाचे गोड गोड पापे घेण्याची एक झुंबडच उडाली !

बालसुलभ स्वाभाविक मधुर खाद्य पदार्थांची पर्वा नसलेले, आकर्षक रंगीबेरंगी खेळणीही अस्ताव्यस्त करून, भावी जीवनातील विश्ववन्द्य विद्योपासक व्रताची साक्ष देणारी ती गीतेची प्रतच फक्त आपल्या चिमुकल्या हातात पकडणारे ते कवीश्वर घराण्यातील रांगते बाळ म्हणजेच अन्य दुसरे कोणी नसून 'ब्रह्मर्षि', 'विद्यावाचस्पति', राष्ट्रीय संस्कृत पण्डित' 'महा - राष्ट्रास ललामभूत संस्कृत पाण्डित्याचे तेजोभास्कर' सर्वांचे परमादरणीय गुरुवर्य, ब्रह्मस्वरूप झालेले पं. दतमहाराज धुंडिराजमहाराज कवीश्वर हेच होत ! नमः शान्ताय तेजसे ।

॥ श्री श्रीगुरवे नमः ॥

## सर्व गुरुभक्त साधकांना हार्दिक प्रार्थना आणि कार्योन्मुख - संकल्पात्मक - श्रध्दांजली

**— ना, य. ढेकणे**

परम पूजनीय, विद्यावाचस्पती, ब्रह्मश्री, राष्ट्रीय पंडित, श्री दत्तमहाराज कवीश्वर - १ मार्च १९९९ रोजी सकाळी ८-३० वाजता ब्रह्मचैतन्यात विलीन झाले.

त्यांचे उत्तुंगत्त्व आणि पावनत्त्व सर्व दृष्टीने प्रस्थापित असून सर्वश्रुतही आहे. त्यांचे वर्णन कितीहि ग्रंथ लिहून केले तरी 'दशांगुले उरला' या प्रमाणाने ते अपुरेच ठरणार आहे.

तसेच माझे अनभिज्ञ सानपणही कोणीही कितीही वर्णन केले तरी ते एका अर्थाने अपुरेच ठरणारे आहे.

### 'पङ्गुं लङ्घयते गिरीम्' असे कर्तृम - अकर्तृम - अन्यथा कर्तृम्

सामर्थ्य असलेल्या माहात्म्यांच्या जीवनाचा प्रभाव सर्व जगाच्या दृष्टिपथात आला. तो प्रभाव माझ्यासारख्या अत्यंत, अति सामान्य जीवाला पुढे करून प्रकट व्हावा असे नियतीने ठरविलेले दिसते. अतएव श्री वासुदेव निवास आणि तत्संबधित सर्व कार्य मला अग्रेसर करून सर्व विश्वस्तांच्या सहकार्याने करण्याचे अज्ञापित केले आहे. ते कार्य त्या माहात्म्यांच्या परम कारुणिक कृपेने पुढे चालू राहील. या कार्यक्षेत्रात श्रीवासुदेव निवास, पुणे; श्रीवामन निवास, पुणे; आणि श्रीक्षेत्र नृसिंहवाडी येथील 'श्रीगुरुनिवास' यांचा स्पष्ट समावेश आहे.

या कार्यास सर्व गुरुभक्तांनी व साधकांनी उत्स्फूर्त सहकार्य करून चालू असलेले कार्य पुढे नेण्यासाठी सहाय्यभूत व्हावे ही नम्र प्रार्थना आहे.

**श्रीवासुदेव निवास येथील कार्य :**

(१) श्रीदत्तचैतन्य प्रभू

(२) अत्यंत श्रेष्ठ परमहंस स्वामी प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराज आणि

(३) प. प. श्रीलोकनाथ तीर्थ स्वामीमहाराज

(४) जगाला आदर्शभूत असलेले आचारसंपन्न लोकोत्तर गुरुद्वय प. पू. योगिराज श्री वामनरावजी गुळवणी महाराज आणि

(५) प. पू. ब्रह्मश्री, ज्ञानयोगी श्रीदत्तमहाराज कवीश्वर अशा पंचमुखी परमेश्वराच्या संकल्पनेनुसार आपणा सर्वांकडून करवून घेतले जाणार आहे.

श्रीवासुदेव निवास हे असे मूळ पीठ आहे की जेथे कर्म आणि योग यांचा आदर्श समन्वय झालेला आहे. जीवनाला कृतार्थ करण्यासाठी सर्व संबंधित संस्थांतील गुरुभक्त-साधकांनी आदर्शभूत असावे अशी उपनिर्दिष्ट पंचमुखी परमेश्वराचीही इच्छा आहे. श्री - दत्तप्रभू, स्वामी - श्रीवासुदेवानंद सरस्वती आणि श्रीलोकनाथतीर्थ आणि महाराज - श्रीगुळवणीमहाराज आणि श्री दत्तमहाराज असे सदैव अन्तःकरणात असते. एकभाव नसून सर्वभाव असतो.

आपण सर्वांनी अन्तःकरणाची सरलता (ऋजुता) सर्वांना आधारभूत वाटणारी अन्तःकरणाची आर्द्रता व सर्वांच्या अन्तःकरणात प्रेम उत्पन्न करणारी मृदुवाणी, तसेच कोणाला दुःख–शोकादि भावांचा शब्दानेही स्पर्श होणार नाही अशा प्रकारची समचित्त वृत्ती ठेवू या. त्यासाठीच नराचा नारायण बनविणारे असे अंतर्बाह्य शुध्दी करणारे साधन आपणा सर्वांना सद्गुरु रूपी परमेश्वरच्या कृपेने प्राप्त झाले आहे.

हे प्रभो ! हे सद्गुरुरूपी परमेश्वरा ! कवीश्वर कुलभूषणा, श्रीदत्तमहाराजा! वर वर्णन केलेले सर्व सद्गुण - गुणसमुच्चय सर्वही साधकांच्या अन्तःकरणात शाश्वत स्वरूपात राहतील असा आमचा दृढ संकल्प, ही आमची आपल्या चरणी श्रध्दांजली अर्पितो.

**श्रीस्वामीमहाराज अंकित**
**ना. य. ढेकणे.**

॥ श्री गुरुःशरणम् ॥ (१९९९-२००० वर्षासाठीचे) ॥ ॐ श्रीराम सद्गुरु ॥

# वासुदेव निवास आश्रमाचे वार्षिक उत्सव

**चैत्र वद्य ३०, प. प. श्रीनारायण स्वामी महाराज पुण्यतिथी ७ दिवस**
शनिवार १० एप्रिल ते शुक्रवार १६ एप्रिल ९९

**आषाढ शुद्ध १, प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वती टेंबे स्वामी महाराज पुण्यतिथी ७ दिवस**
बुधवार ७ जुलै ते मंगळवार १३ जुलै ९९

**आषाढ शुद्ध ५, प. प. गुरुपौर्णिमा १ दिवस**
बुधवार २८ जुलै ९९

**श्रावण वद्य ५, प.प. श्रीवासुदेवानंद सरस्वती टेंबे स्वामी महाराज जयंती ५दिवस**
शुक्रवार २७ ऑगस्ट ते मंगळवार ३१ ऑगस्ट ९९

**भाद्रपद शुद्ध १५ (प्रोष्ठपदी पौर्णिमा) भागवत सप्ताह ७ दिवस**
रविवार १९ सप्टेंबर ते शनिवार २५ सप्टेंबर ९९

**मार्गशीर्ष शुद्ध १५, श्रीदत्तजयंती ७ दिवस**
गुरुवार १६ डिसेंबर ते बुधवार २२ डिसेंबर ९९

**मार्गशीर्ष वद्य १३, प. पू. योगिराज श्रीगुळवणी महाराज जयंती १ दिवस**
मंगळवार ४ जानेवारी २०००

**पौष वद्य ८, प. पू. योगिराज श्रीगुळवणी महाराज पुण्यतिथी ७ दिवस**
शनिवार २२ ते शुक्रवार २८ जानेवारी २०००

**माघ वद्य ३, प. प. श्रीलोकनाथतीर्थ स्वामीमहाराज पुण्यतिथी ७ दिवस**
बुधवार १६ ते मंगळवार २२ फेब्रुवारी २०००

**माघ वद्य ६, प. पू. दत्त महाराज कवीश्वर वर्धापनदिन १ दिवस**
शुक्रवार २५ फेब्रुवारी २०००

**• भक्तेभ्योऽर्पितं भक्ताऽभिन्न श्रीदत्ततुष्टये •**

---

प. पू. श्री गुळवणी महाराज व प. पू. श्री दत्त महाराज यांनी ठरवून दिल्याप्रमाणे खालील उत्सव श्री वासुदेव निवास आश्रमाचे केले जातात. अन्य कार्यक्रम शिबीर इ. त्या श्री वासुदेव निवासामध्ये केले जाणार नाही.

---


॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥

# श्री. प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वती टेंबे स्वामी महाराज व
# श्री प. प. श्रीलोकनाथतीर्थ स्वामी महाराज



## स्मारक ट्रस्ट

रजिस्टर नं. ए १२१२



'श्री वासुदेव निवास,' ४२-१७, कर्वे पथ, पुणे - ४११ ००४

**संस्थापक - प. पू. श्री. गुळवणी महाराज**
**संवर्धक - प. पू. श्री दत्तमहाराज कवीश्वर**

प. पू. श्री दत्तमहाराज कवीश्वर यांचे ९० व्या वर्षी–१ मार्च, १९९९ रोजी देहावसान झाले. श्री वासुदेव निवास आश्रमात बदल करण्याविषयी दि. १५/३/१९९९ रोजी सभा आयोजित केली.

**या ट्रस्टचे बदल खालीलप्रमाणे :**

१. श्री. रा. नारायण यशवंत ढेकणे, नाशिक - प्रधान विश्वस्त.
२. श्री. रा. लक्ष्मण व्यंकटेश वाकडे, पुणे - विश्वस्त
३. श्री. रा. श्रीपाद पांडुरंग आघारकर, पुणे - विश्वस्त
४. श्री. रा. सुभाष अनंत दामले, पुणे - विश्वस्त
५. श्री. रा. अशोक दत्तात्रेय कवीश्वर, पुणे -विश्वस्त

विश्वस्त मंडळ

श्री वासुदेव निवास,
४२/१७, एरंडवणे, पुणे - ४.

# शिव आणि शिवशक्तीला श्रध्दांजली

# अवघ्या ५० दिवसात सात्त्विक अन्त:करणांना व्यथित करणारे दोन धक्के बसले.



प. पू. योगिराज वामनरावजी गुळवणी महाराज यांच्या २५ व्या पुण्यतिथी महोत्सव सांगते नंतर दुसरे दिवशी दि. १० जानेवारी १९९९ रोजी सायंकाळी ६ वाजता. सौभाग्याचे लेणे घेऊन पू. सौ. लक्ष्मीबाई कवीश्वर - सर्वांच्या आईसाहेब - श्रीदत्तचरणी लीन झाल्या. त्यानंतर अवघ्या ५० दिवसात अगाध ब्रह्मशक्तीचा नंदादीप - अद्वैत वेदांत शिरोमणी - वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांच्या कृपाकटाक्षांनी आणि करकमलांनी आपल्या अंकावर घेऊन वात्सल्याने कुरवाळिलेले - योगिराजांच्या शक्तिपात पीठाचे उत्तराधिकारी यांचे मोक्षयोगावर, उत्तरायणात, परमशांत स्थितीत, ब्रह्मशांतीमध्ये महानिर्याण झाले.

श्रीवासुदेव निवास परिवाराच्या या माता-पित्यांना त्यांच्या पुत्रपौत्रांची भावपूर्ण श्रध्दांजली.

REGD. BY : REGISTRAR OF NEWSPAPERS : REGD. NO. R. N. 31921/77



प. पू. दत्तमहाराज कवीश्वर

अनंताची वाटचाल करणारा, अंतर्लक्षी स्थितप्रज्ञ